ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४६ अंक १ पाने ५६ ऑगस्ट २०१८ मूल्य २२रु.

## सामाजिक सबलीकरण

सामाजिक न्याय आणि सबलीकरण
नीलम साव्हनी

उच्च शिक्षणाद्वारे सक्षमीकरण
एस. श्रीनिवास राव आणि सुंदरेशा डी.एस.

दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास
राजकुमार बडोले

दिव्यांगांसाठी सामाजिक सक्षमीकरण
डॉ. संध्या लिमये

विशेष लेख
आर्थिक सर्वसमावेशकतेतून कमकुवतांचे सक्षमीकरण
डॉ. मुनीराजू- एसबी


फोकस
दुर्बल घटकांसाठी उद्योजकतेचा विकास कार्यक्रम
डॉ. सुनिल शुक्ला



मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४६ ❖ ❖ अंक १ ❖ ❖ ऑगस्ट २०१८ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ■ सामाजिक न्याय आणि सबलीकरण | नीलम साव्हनी | ५ |
| ■ पंचायतराज संस्थांतील दुर्बल समुदायांचे सबलीकरण | डॉ. ब्रम्हानंदम व डॉ. के. व्ही. श्रीनिवास | ९ |
| ■ उच्च शिक्षणाद्वारे सक्षमीकरण | एस. श्रीनिवास राव आणि सुंदरेशा डी.एस. | १७ |
| ■ दुर्बल घटकांसाठी उद्योजकतेचा विकास कार्यक्रम (फोकस) | डॉ. सुनिल शुक्ला | २२ |
| ■ आर्थिक सर्वसमावेशकतेतून कमकुवतांचे सक्षमीकरण (विशेष लेख) | डॉ. मुनीराजू- एसबी | २६ |
| ■ दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास | राजकुमार बडोले | ३१ |
| ■ दिव्यांगांसाठी सामाजिक सक्षमीकरण | डॉ. संध्या लिमये | 34 |
| ■ आधारभावात वाढ - एक आश्वासक पाऊल | रमेश पाध्ये | ३८ |
| ■ माता मृत्यू प्रमाणात आश्वासक घट | मनिषा वर्मा / पूजा पस्सी | ४१ |
| ■ उत्पादक वृद्धत्व | डॉ. शैलु श्रीनिवासन | ४४ |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# चला, एकत्र पुढे जाऊया

समाजातील प्रत्येक व्यक्ती सक्षम झाल्यानंतरच देशाचा विकास वेगाने घडू शकतो. मात्र, सक्षमीकरणाचा अर्थ व्यक्तीसापेक्ष आहे. एखादा व्यक्ती सक्षम झाल्यानंतर त्याचं त्याच्या आयुष्यावर नियंत्रण असते. समाजाच्या सक्षमीकरणानंतर समाजातील विविध घटकांना त्यांची प्रगती साधण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेता येवू शकतात. तरुणांसाठी सक्षमीकरण म्हणजे समाजाच्या प्रथा आणि परंपरा याची पर्वा न करता जगणे हा असतो. वृद्धांसाठी त्यांचे उर्वरित आयुष्य आत्मसन्मानाने जगणे म्हणजे सक्षमीकरण. पुरुषांसाठी आर्थिक स्वावलंबन म्हणजे सक्षमीकरण तर स्त्रियांसाठी लिंग भेदापासून स्वातंत्र्य म्हणजे सक्षमीकरण

विविध जाती आणि जमातींच्या सक्षमीकरणानंतर देशाची प्रगती होते. सरकारची धोरणे आणि योजनांचे एकत्रिकरण केल्यानंतर प्रत्येक समाजातील घटकाला विकासाची संधी दिल्यानंतरच प्रगतीची दारे खुली होतात. त्यासाठी सरकार समाजातील सर्व घटकांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करत आहे.

महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षमता वाढवणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. स्त्रियांचा विकास सर्वाधिक महत्वाचा असून यामुळे सर्वकष विकासाला गती येते. त्यामुळेच देशाच्या विकासात स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुसार, एक स्त्री सक्षम झाल्यानंतर संपूर्ण कुटुंब सक्षम होते. परंतु दुर्दैवाने भारतात स्त्रियांना सक्षमीकरणासाठी जन्मापासूनच संघर्ष करावा लागतो. स्त्री अर्भकाला त्याच्या जन्मासाठीही संघर्ष करावा लागतो. समाजातील ही सत्यपरिस्थिती पाहून सरकारने स्त्री सबलीकरणासाठी सर्वोच्च प्रधान्य दिले आहे आणि त्यासाठी विविध योजना आणि अभियानांची अंमलबजावणी देखील करण्यात येत आहे. मुलगी वाचवा,मुलगी शिकवा,सुकन्या समृद्धी योजना,पंतप्रधान वंदना योजना यासारख्या योजनांमुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावत आहे.

गरीब आणि मागास जाती उदाहरणार्थ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गियांना प्रत्येक गोष्टीसाठी सक्षम करावे लागते. प्राथमिक शिक्षण, चांगले जगण्यासाठी रोजगार आणि विकासाची संधीही त्यांना मिळत नाही. त्यामुळेच समाजातील वंचित घटकांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी सरकारने नोकरीत आणि शिक्षणात आरक्षण दिले आहे. यासोबतच पंतप्रधान जनधन योजना, मुद्रा योजना, स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया, स्कील इंडिया ( पंतप्रधान कौशल्य योजना) यासारख्या योजनांच्या पुढाकाराने वंचित आणि शोषित घटकांना समान विकासाची संधी उपलब्ध झाली आहे.

ज्येष्ठ नागरिकांची बदलती जनसांख्यिकी रचना व सामाजिक-आर्थिक गरजा लक्षात घेता, ज्येष्ठ नागरिकांसाठी नवीन राष्ट्रीय धोरण तयार करण्यात येत आहे. वृद्ध नागरिकांकरिता सर्वसमावेशक कार्यक्रम देखील सुरु केला आहे. ज्येष्ठ नागरिक अनुभवाचे आणि ज्ञानाचे भांडार आहेत. आयुष्याच्या उत्तरार्धात ते उपेक्षिताचे जीवन जगतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी सरकारने राष्ट्रीय व्यवक्षी योजना,अटल पेंशन योजना, व्यव वंदन योजनांची सुरुवात केलीय. त्यामुळे वरिष्ठ नागरिक स्वयंपूर्ण होऊन सन्मानाने जीवन जगत आहेत.

दिव्यांग व्यक्ती हा समाजातील महत्वाचा घटक आहे.मात्र, समाजाला त्यांचे ओझे वाटते. त्यांच्याही गरजा आहेत आणि दिव्यांग व्यक्तींच्या गरजा ओळखून त्यांच्या सबलीकरणासाठी योजना आखल्या आहेत. दिव्यांगांसाठी तांत्रिक प्रकल्प राबवण्यात येत आहेत. शिक्षणाची संधी, दीनदयाल उपाध्याय अपंग पुनर्वसन योजनांमुळे अंपगाचे जीवनमान उंचावत आहे.

आदिवासी जमातींचा जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला जातो. त्यामुळे आदिवासींसाठी सक्षमीकरणाची सुरुवात जगण्याच्या हक्कापासून होते. राष्ट्रीय धोरणात आदिवासींना वगळण्यात येत असल्याची त्यांची भावना आहे. आदिवासी विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे यासाठी केंद्र सरकारच्या आदिवासी विभागाकडून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. उच्च शिक्षणासाठी असलेल्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. व्यावसायिक शिक्षण, गौण वन उत्पादनासाठी हमीभाव, पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्यता ) यामुळे आदिवासींचे आर्थिक आणि सामाजिक जीवनमान उंचावत आहे.

विकासात प्रत्येक व्यक्तीचा वाटा मोलाचा आहे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे सबलीकरण गरजेचे आहे. सरकारने विविध योजना आणि धोरणाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाच्या समतोल विकासाठी पावले उचलली आहेत.

■■■

विश्लेषण

# सामाजिक न्याय आणि सबलीकरण

- नीलम साव्हनी



**देशाच्या मनुष्य बळामध्ये योगदान देणाऱ्या समावेशक समाजाची,संविधानाचा आदर राखून निर्मिती, हे सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाचे उद्दिष्ट आहे. समाजातल्या अनुसूचित जाती,इतर मागास वर्ग आणि इतर वंचित घटकांचे आर्थिक,शैक्षणिक आणि सामाजिक सबलीकरण करणे हे आपले उद्दिष्ट आहे.सरकारच्या सर्व कार्यक्रम आणि धोरणात वंचित वर्गाच्या हक्काबाबत जागरूक राहून त्यांच्या चिंतांची दखल घेण्याबाबत दक्ष राहणे हे या विभागाचे मुख्य काम आहे.**

समाजातल्या वंचित आणि मागास वर्गाला प्रतिष्ठेचे, सन्मानाचे जीवन लाभून देशाच्या मनुष्य बळामध्ये योगदान देणाऱ्या समावेशक समाजाची,संविधानाचा आदर राखून निर्मिती, हे सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाचे उद्दिष्ट आहे. समाजातल्या अनुसूचित जाती,इतर मागास वर्ग आणि इतर वंचित घटकांचे आर्थिक,शैक्षणिक आणि सामाजिक सबलीकरण करणे हे आपले उद्दिष्ट आहे.सरकारच्या सर्व कार्यक्रम आणि धोरणात वंचित वर्गाच्या हक्काबाबत जागरूक राहून त्यांच्या चिंतांची दखल घेण्याबाबत दक्ष राहणे हे या विभागाचे मुख्य काम आहे.

सरकारची धोरणे आणि कार्यक्रम प्रामुख्याने समाजाचा हा वर्ग समोर ठेवून आखली जातात.ग्राम स्वराज अभियान,महत्वाकांक्षी जिल्हे कार्यक्रम,मिशन अंत्योदय या सारख्या सध्या सुरु असलेल्या देशव्यापी अभियानांमध्ये याची प्रचीती आपल्याला येते.

### विवक्षित लोक संख्याविषयक आकडेवारी

२०११ च्या जनगणनेनुसार देशाच्या लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची टक्केवारी १६.६ %. देशातल्या ५२२ जिल्ह्यांपैकी ४६८५९ गावात ५०% पेक्षा जास्त अनुसूचित जाती लोकसंख्या आहे.

स्वातंत्र्यानंतर इतर मागासवर्गाची गणती करण्यात आली नाही.मंडल आयोगाच्या अनुमानानुसार इतर मागासवर्गाची लोकसंख्या ५२% तर एनएसएसओ चा अंदाज ४१.७ % (२००९-१०) जेष्ठ नागरिकांची संख्या १०.३६ कोटी इतकी होती.

### अनुसूचित जाती विकास

अनुसूचित जाती वर्गाच्या शैक्षणिक सबलीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या विभागाच्या निधीचा मोठा भाग शिष्यवृत्तीसाठी ठेवला जातो. नियोजित घटकांमधे या शिष्यवृत्तीचे लाभ पोहोचवण्यात लक्षणीय यश प्राप्त झाले आहे. या विभागाच्या योजने अंतर्गत,अनुसूचित जातीतल्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर स्कॉलरशिप (पीएमएस - एससी) देण्यात येत असून अनुसूचित जातीतल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी केंद्र सरकारचे हे मोठे अभियान आहे.मॅट्रिक नंतर अगदी पीएचडी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सुमारे ५५ लाख विद्यार्थ्यांना याचा लाभ होत आहे. २०१४ ते २०१८ या कालावधीत २,२९,३०,६५४ विद्यार्थ्यांनी या स्कॉलरशिपचा लाभ घेतला असून त्यासाठी १०,३८८ कोटी रुपयांच्या निधीचा वापर करण्यात आला. ज्या घटकांना समोर ठेऊन हे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते,त्या घटकांमधल्या साक्षरतेच्या प्रमाणावर

याचा निश्चितच सकारात्मक परिणाम झाला.त्याच बरोबर उच्च शिक्षणात या घटकांचा सहभाग वाढला आणि शिक्षण घेतानाच्या गळतीचे प्रमाणही घटले. यामुळे उत्तम परिणाम साध्य होण्याबरोबरच राष्ट्रहितासाठी मानवी संसाधन उभारण्यासाठीही त्याचा निश्चितच सकारात्मक परिणाम झाला. केंद्रीय मंत्रिमंडळाने या संदर्भातल्या थकीत रक्कमेपोटी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांकरिता नुकतीच ८७३७ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे आणि २०१८-१९ या वर्षासाठी ३००० कोटी रुपये मंजूर केले आहेत. याशिवाय मॅट्रिक पूर्व स्कॉलरशिप, अव्वल शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीची शैक्षणिक योजना आणि विद्यापीठ अनुदान आयोगासमवेत चालवली जाणारी राष्ट्रीय फेलोशिप योजना या आणखी काही योजना,अनुसूचित जातीतल्या विद्यार्थ्यांसाठी राबवल्या जातात.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती वर्गाच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी महत्वाचा कायदा आहे तो म्हणजे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९. या सरकारने १४.०४.२०१६ पासून तो अधिक बळकट केला आहे. यामध्ये अनुसूचित जाती -जमातीसंबंधी च्या ४७ गुन्हयाबाबत पीडितांना मिळणाऱ्या मदतीच्या तरतुदीसंदर्भात सुधारणा, मदतीच्या संदर्भात सुसूत्रीकरण, गुन्हयाच्या तीव्रतेनुसार, मदतीच्या रकमेत ८५,००० वरून ८,२५,००० रुपयांपर्यंत वाढ, मदतीच्या रकमेचे सात दिवसांच्या आत वाटप, खटला वेळेवर दाखल व्हावा यासाठी, ६० दिवसात तपास पूर्ण करून आरोप पत्र दाखल,या तरतुदींचा समावेश आहे.

योजनांची थेट अंमलबजावणी करण्याबरोबरच अनुसूचित जातीच्या कल्याणासाठीच्या निधी वाटपाचा (एडब्लूएससी)लेखा जोखा ठेवते. एडब्लूएससी हे अनुसूचित जातीसाठीच्या उप आराखड्याचे नवे नाव आहे.अनुसूचित जाती-जमातीच्या विकासासाठी नियोजित संसाधनांचा योग्य ओघ राहावा यासाठी अनुसूचित जातीसाठी,विशेष घटक आराखडा(एससीपी),ही संकल्पना १९७९-८० पासूनच अस्तित्वात आहे.मागील नियोजन आयोगाने जारी केलेल्या अनुसूचित जाती उप आरखड्याच्या (एससी एसपी) मार्गदर्शक तत्वानुसार, सर्व राज्ये,मंत्रालये, खात्यांनी, देशातल्या/ राज्यातल्या अनुसूचित जातीच्या टक्केवारीच्या प्रमाणात आपल्या आराखड्यात एससीएसपी अंतर्गत निधी राखून ठेवणे

**आणखी एका घटकाच्या प्रगतीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तो घटक म्हणजे मागास वर्ग.मागास वर्गाच्या कल्याणासाठी २०१८-१९ मध्ये तरतूदीत ४१.०३% वाढ करत, २०१७-१८ च्या १२३७.३० कोटी रुपयांवरून २०१८-१९ मध्ये ही तरतूद १७४७ कोटी रुपये करण्यात आली.मागास वर्गासाठीही, मॅट्रिक पूर्व, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, राष्ट्रीय फेलोशिप यासारख्या शिष्यवृत्तीवर मुख्य भर राहिला आहे.**

आवश्यक आहे. याचे नाव २०१७ मध्ये बदलून अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी तरतुद (एडब्लूएससी) असे करण्यात आले. एडब्लूएससी साठीची तरतुद २०१५-१६ मध्ये ३०८५०.८८ कोटी वरून ५६,६१८.५० कोटी रुपये करण्यात आली म्हणजेच ८३.५२% वाढ करण्यात आली. विविध मंत्रालयांकडून आणि खात्यांकडून, वित्तीय आणि परिणाम दर्शक ऑनलाइन माहिती गोळा करण्यासाठी आणि नीती आयोगाने आखलेल्या आराखड्यानुसार देखरेख ठेवणारी मानके असलेले वेब पोर्टल (e- utthaan.gov.in) खात्याने विकसित केले आहे.वित्तीय देखरेख आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन यंत्रणा यांची सांगड घालण्यात आली आहे, यामुळे वास्तवदर्शी देखरेख शक्य होते. पोर्टलवर थेट माहिती देता यावी यासाठी, सर्व नोडल अधिकाऱ्यांना लॉग इन आणि पासवर्ड देण्यात आले आहेत.

शिक्षणाशिवा, या विभागाने, विभागवार अनुसूचित जाती वसतिस्थाने डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या शिक्षण, आरोग्य, पोषण, कौशल्य विकास यावर लक्ष केंद्रित केले आहे. अनुसूचित जाती मोठ्या संख्येने असणाऱ्या खेडयांचा, केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची सांगड घालून, जिथे उणीव आहे ती भरून काढण्यासाठी मदतीचा हात पुरवून त्याद्वारे एकात्मिक विकास साधण्याचे प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेचे उद्दिष्ट आहे.अनुसूचित जातीची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असणाऱ्या खेड्यात हा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या विभागाकडे असलेली संसाधने आणि इतर विभाग आणि मंत्रालये यांच्याकडून सुरु असलेले प्रयत्न एकवटण्यासाठी हे खाते काम करत आहे.

### मागासवर्ग विकास

आणखी एका घटकाच्या प्रगतीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तो घटक म्हणजे मागास वर्ग.मागास वर्गाच्या कल्याणासाठी २०१८-१९ मध्ये तरतूदीत ४१.०३% वाढ करत, २०१७-१८ च्या १२३७.३० कोटी रुपयांवरून २०१८-१९ मध्ये ही तरतूद १७४७ कोटी रुपये करण्यात

आली.मागास वर्गासाठीही, मॅट्रिक पूर्व, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, राष्ट्रीय फेलोशिप यासारख्या शिष्यवृत्तीवर मुख्य भर राहिला आहे.

कौशल्य विकास हे महत्वाचे अभियान, राष्ट्रीय मागास वर्ग आणि विकास महामंडळामार्फत राबवण्यात येत आहे. या घटकामध्ये उद्योजकत्वाच्या क्षमता विकसित करणे आणि परिणामी रोजगार निर्मिती साधणे हा पुढचा टप्पा आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्हेंचर कॅपिटल फंड निर्माण करण्याचा विचार आहे.

**सामाजिक संरक्षण**

महत्वाचा आणि बरेचदा दुर्लक्षित राहणारा घटक म्हणजे वरिष्ठ नागरिक. या नागरिकांचे वृद्धावस्था अवलंबित्व प्रमाण वाढत चालले आहे. लोकसंख्येचे बदलते चित्र,जेष्ठ नागरिकांच्या सामाजिक-आर्थिक गरजा, सामाजिक मूल्य व्यवस्था आणि तंत्रज्ञानाची प्रगती लक्षात घेऊन जेष्ठ नागरिकांसाठी सुधारित धोरण आखण्यात येत आहे. जेष्ठ नागरीकांसाठीच्या सध्याच्या एकात्मिक कार्यक्रम योजनेअंतर्गत, एप्रिल २०१५ पासून खर्च निकष ११०% पर्यंत वाढवण्यात आला. १/४/२०१५ पूर्वीचा हा निकष २८८% वाढवण्यात आला. (५.४२ लाखांपासून ते २१.६ लाखापर्यंत, वृध्दाश्रमांसाठी). या योजने अंतर्गत फिजिओ थेरपिस्ट आणि योग शिक्षक यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. वरिष्ठ नागरीकांसाठीच्या घराची नोंदणी प्रमाणीकरण आणि दर्जा देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

वृद्धांसाठी सहाय्यक उपकरणे पुरवणाऱ्या राष्ट्रीय वयोश्री योजनेसाठी २९२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली. ५२ जिल्ह्यात निर्धारण कॅम्प घेण्यात आले आणि ३९ जिल्ह्यात वितरण कॅम्प आयोजित करण्यात आले त्याचा ४३८६५ जेष्ठ व्यक्तींना लाभ झाला.दारिद्र्य रेषेखालच्या ज्येष्ठ नागरिकांना एकूण ९९४३१ उपकरणे पुरवण्यात आली.

नशा बंदी योजनेअंतर्गत, व्यसन मुक्ती केंद्रासाठी, एप्रिल २०१८ पासून खर्चाचे निकष ३०% वाढवण्यात आले. या केंद्रांना स्वयंपाकी,पूर्णवेळ डॉक्टर, आणि अतिरिक्त चौकीदारही पुरवण्यात आला आहे.

अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या व्यक्ती हुडकून काढण्यासाठी प्रथमच राष्ट्रीय सर्वेक्षण घेण्यात आले. १८५ जिल्ह्यात १.५ लाख घरे आणि ६ लाख व्यक्तींचा या सर्वेक्षणात समावेश आहे. हे सर्वेक्षण सुरु असून लवकरच ते पूर्ण होईल.

**राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि जागृतीवर भर देणार आहे. १०००० स्वच्छता कामगारांना आणि कचरा वेचकांना सुरक्षित, आरोग्याची काळजी आणि यांत्रिक स्वच्छतेबाबत प्रशिक्षण देण्यासाठी रिकग्निशन ऑफ प्रायर लर्निंग कार्यक्रम राबवण्यात येईल. मानवाने मैला वाहून नेण्याचे काम करण्याला प्रतिबंध करणाऱ्या आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासंदर्भातला २०१३ च्या कायद्यातल्या तरतुदीबाबत जागृती करण्यावरही भर देण्यात येत असून**

**मैला वाहून नेणाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी योजना आणि त्यांचे राष्ट्रीय सर्वेक्षण**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून मैला वाहुन नेणाऱ्यांनी झेललेला अन्याय आणि अप्रतिष्ठा दूर करण्यासाठी आणि त्यांना प्रतिष्ठेचे जीवनमान पुरवण्यासाठी हा विभाग कटिबद्ध आहे.त्यांना प्रतिष्ठीत आयुष्य लाभावे या दृष्टीने १८ राज्यातल्या १७० विवक्षित जिल्ह्यात या व्यक्तींचे राष्ट्रीय सर्वेक्षण करण्यात आले.राज्य सरकार आणि सामाजिक संघटनांच्या सहकार्याने राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळाने यावर देखरेखही ठेवली. १२५ जिल्ह्यात सर्वेक्षण कॅम्प घेण्यात आले असून ५३६५ व्यक्ती मैला वाहून नेणाऱ्या असल्याचे आढळून आले आहे.अशा व्यक्तींना वन टाइम कॅश असिस्टन्स म्हणजे एकरकमी एकदाच ४०००० वित्त सहाय्य देण्यात येणार असून योग्य त्या उपाय योजनांद्वारे त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल.

याशिवाय हे राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि जागृतीवर भर देणार आहे. १०००० स्वच्छता कामगारांना आणि कचरा वेचकांना सुरक्षित, आरोग्याची काळजी आणि यांत्रिक स्वच्छतेबाबत प्रशिक्षण देण्यासाठी रिकग्निशन ऑफ प्रायर लर्निंग कार्यक्रम राबवण्यात येईल.मानवाने मैला वाहून नेण्याचे काम करण्याला प्रतिबंध करणाऱ्या आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासंदर्भातला २०१३ च्या कायद्यातल्या तरतुदीबाबत जागृती करण्यावरही भर देण्यात येत असून यासाठी महानगरपालिकांमध्ये, पालिका अभियंते,स्वच्छता निरीक्षक,कॉन्ट्रॅक्टर यांच्यासह संबंधितांच्या कार्यशाळाही आयोजित करण्यात येत आहे.

या योजनेसाठी महापालिकांचीही मदत घेण्यात येत आहे.स्वच्छताविषयक साहित्य आणि वाहने खरेदी करण्यासाठी पंचायत आणि महानगर पालिकांशी करार करण्यात येत आहेत.अशी वाहने आणि साधने खरेदी करण्यासाठी स्वच्छता कामगारांच्या स्वयंसहायता गटांना कर्जही पुरवण्यात येत आहे. यामुळे या कामगारांना, मानवाकरवी

केल्या जाणाऱ्या स्वच्छतेमुळे उदभवणाऱ्या असुरक्षितता आणि अनारोग्यापासून संरक्षण मिळणार आहे.

**महामंडळे**

या खात्याला तीन वित्तीय महामंडळे आहेत, एनबी सीएफडीसी (राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ), एनएसकेएफडीसी आणि एनएस एफडीसी (राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ).

विशिष्ट गटांना डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या आर्थिक उन्नती आणि विकासाला चालना देऊन त्यांचे जीवन मान उंचावण्याचे या महामंडळांचे उद्दिष्ट आहे. सरकारचा हा मदतीचा आणखी एक हात आहे.

**डॉ आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र (डीएआयसी) आणि डॉ. आंबेडकर नॅशनल मेमोरियल (डीएएन एम)**

डॉ बाबासाहेबांची शिकवण आणि विचारांचा प्रसार करण्यासाठी या विभागाने १५ जनपथ नवी दिल्ली इथे,डॉ आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र (डीएआयसी) स्थापन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ७ डिसेंबर २०१७ रोजी या आंतरराष्ट्रीय केंद्राचे उदघाटन झाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि शिकवण यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी हे केंद्र महत्वाची भूमिका बजावेल. त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक मुद्द्यांवर संशोधन करण्याचे महत्वाचे केंद्र ठरणार असून समावेशक विकास आणि सामाजिक-आर्थिक मुद्दयांबाबत थिंक टॅंक म्हणून काम करेल.

डॉ. आंबेडकर नॅशनल मेमोरियल (डीएएनएम) चे अलीपुर रोड, नवी दिल्ली इथे माननीय पंतप्रधानांच्या हस्ते १३ एप्रिल २०१८ रोजी उदघाटन झाले. डॉ बाबासाहेबांचा जीवनपट दर्शवणारे हे संग्रहालय पाहायला दररोज अनेक जण या संग्रहालयाला भेट देतात.

| अ. क्र | योजनेचे नाव/प्रकल्प | २०१४-२०१८ | |
|---|---|---|---|
| | | वित्तीय रुपये/कोटी | लाभार्थी |
| १ | राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ: | | |
| | (i) **पत आधारित योजना** | १७२९.०७ | ३३३२४५ |
| | (ii) **कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम** | ५२.१२ | ६२१५९ |
| | **एकूण :** | **१७८१.१९** | **३९५४०४** |
| २ | **राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ** | | |
| | (i) **सर्वसाधारण कर्ज योजना** | ४४०.८८ | ४१६४५ |
| | (ii) **लघु वित्त योजना** | १७६.९१ | ४२८९० |
| | (iii) **कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम** | ५०.३६ | ३५०१७ |
| | **एकूण :** | **६६८.१५** | **११९५५२** |
| ३ | राष्ट्रीय मागास वर्ग वित्त आणि विकास महामंडळ: | | |
| | (i) **सर्वसाधारण कर्ज योजना** | ७३२.५८ | १३२१२४ |
| | (ii) लघु वित्त योजना | ७३४.५० | ५३१८७० |
| | (iv) **कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम** | ५९.७८ | ५७२७४ |
| | **एकूण :** | **१५२६.८६** | **७२१२६८** |

**निष्कर्ष**

संविधानाच्या ३८ व्या कलमात जनतेच्या कल्याणासाठी योग्य सामाजिक स्थिती राखण्याचे वचन पूर्ण करण्यासाठी हा विभाग कटिबद्ध असून 'सबका साथ सबका विकास' हे या सरकारचे मार्गदर्शक तत्व अनुसरत हा विभाग वाटचाल करत आहे. समाजातला उपेक्षित आणि शोषित वर्ग आपल्या खऱ्या क्षमता साकारण्यासाठी सबल होईल तेव्हाच, या विभागाने ठेवलेले उद्दिष्ट साध्य होणार आहे.

■■■

*लेखका केंद्रीय सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाच्या सचिव आहेत..*

*ई मेल: secywel@nic.in*

दृष्टीक्षेप

# पंचायतराज संस्थांतील दुर्बल समुदायांचे सबलीकरण

- डॉ. ब्रम्हानंदम व डॉ. के. व्ही. श्रीनिवास



**सबलीकरणाच्या सामाजिक संदर्भातील निर्णय प्रक्रियेत व त्यानुषंगाने आवश्यक सत्तापरिवर्तनात-विशेषत: काही विशिष्ट सामाजिक घटक त्यांच्या ऐतिहासिक सामाजिक व सांस्कृतिक पाश्वर्भूमीमुळे नेहमीच निर्णय प्रक्रियेपासून वंचित राहतात. अशावेळी या दुर्लक्षित समूदायांना निर्णप्रक्रियेत आणण्यासाठी राजकीय हस्तक्षेप आवश्यक व अटळ असतो.**

सबलीकरण ही एक व्यापक संकल्पना असून विविध प्रकारच्या सामाजिक आणि मानसिक बदलांच्या संदर्भात ही संज्ञा वापरली जाते. लोकांच्या क्षमता व निवडी यांची विकासात्मक वाढ म्हणजे सबलीकरण अशी या संकल्पनेची व्याख्या करण्यात आली आहे. यामध्ये क्षमतांचा विकास होताना लोकांना त्यांच्या प्राथमिक गरजा सहजसाध्य असतील व क्षुधा, इच्छा व वंचित राहिल्यामुळे होणारे नुकसान या पलिकडे जाऊन विकासाच्या संधी उपभोगता येण्याची व जीवनाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आवश्यक निर्णय घेण्याची अनुकूल परिस्थिती असणे अपेक्षित असते. सबलीकरणाची अशी विस्तृत व्याख्या मांडताना या संकल्पनेच्या विविध सामाजिक विषयांचा संदर्भ गृहीत धरण्यात आला आहे. मानवी हक्क, आर्थिक असुरक्षितता तसेच सामाजिक लाभांपासून वंचित मानवी समूदायांचा सर्वसामान्य सामाजिक क्षेत्राशी संपर्क व त्यानुषंगाने त्यांच्या क्षमतांचा व कौशल्यांचा विकास व निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त होण्याची क्षमता किंवा निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळून जीवनातील महत्वाच्या घडामोडीं स्वयंनियंत्रणात राहून योग्य दिशा मिळेल अशी परिस्थिती संबोधण्याच्या संदर्भात सबलीकरणाची संकल्पना लागू केली जाते. सिध्दांतिकदृष्ट्या, सबलीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीबाबत जागरूकता निर्माण होउन ती परिस्थिती सुधरवण्यासाठी योग्य उपाययोजना व कृती करणे व समस्येवर संपूर्ण नियंत्रण राहिल यासाठी सतत पाठपुरावा करणे.

सबलीकरणाच्या सामाजिक संदर्भातील निर्णय प्रक्रियेत व त्यानुषंगाने आवश्यक सत्तापरिवर्तनात-विशेषत: काही विशिष्ट सामाजिक घटक त्यांच्या ऐतिहासिक सामाजिक व सांस्कृतिक पाश्वर्भूमीमुळे नेहमीच निर्णय प्रक्रियेपासून वंचित राहतात. अशावेळी या दुर्लक्षित समूदायांना निर्णप्रक्रियेत आणण्यासाठी राजकीय हस्तक्षेप आवश्यक व अटळ असतो. लोकशाही व्यवस्थेत सक्षमीकरणामुळे सर्व स्तरातील लोकांना सत्तेत प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होऊन लोकांना आपल्या समस्या व बाजू व्यक्त करून त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या बाबींसंदर्भातील निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व बहिष्कृत समूदायांचे राजकिय क्षेत्रात प्रतिनिधित्व वाढल्यास या घटकांना सत्तेत सहभागी राहता येऊन त्यांच्या विकासाच्या बाबतीत इतर पुढारलेल्या वर्गाप्रमाणे निर्माण होणाऱ्या विविध संधींचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक निर्णय अधिकृतता मिळू शकेल. यानुसार राजकिय दृष्ट्या सबलीकरण म्हणजे, राजकियक्षेत्रात सहभागी

होण्याची अनुकूलता. यामध्ये विशिष्ट वर्गाचे राजकारणातील प्रतिनिधित्वाचे प्रमाण व त्यानुषंगे त्यांना महत्वाच्या निर्णय प्रक्रियेत सामील होण्याचा त्यांना मिळालेला अधिकार होय.

### दुर्बल घटक

भारताची लोकसंख्या १.३ अब्ज एवढी असून लोकसंख्येची सरासरी आर्थिक वाढ ६ ते ७ टक्के एवढी आहे. यापैकी एक चतुर्थांश लोकांचे जीवनमान अत्यंत बिकट आहे. भारत हा खेड्यांचा देश मानला जातो कारण आजही देशातील दहा पैकी सात लोक ग्रामीण व खेडे गावात राहतात. या सर्वांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत खालावलेली आहे. कारण भारतात गरिबांचे आर्थिक जीवनमान, समानता व सामाजिक हक्क हे सामाजिक जडणघडणीतच निश्चित झालेले दिसून येतात. त्यामुळे मागासलेले व गरिब लोक सहज वेगळे दिसून येतात. भारतातील समाजरचनेत पारंपारिक विभिन्नतेने नटलेली आर्थिक व जातीनिहाय अनेक स्तर असलेली समाजाची जडणघडण आहे. साक्षरतेचे कमी प्रमाण, हालाखीची गरिबी, गुंतागुंतीचे सामाजिक व पारंपारिक वातावरण, गरिबीने आलेली असहायता व असुरक्षितता पिढ्यानपिढ्या भोगलेल्या दडपशाहीमुळे गरिब व मागासलेला वर्ग कायम विकासापासून वंचित राहिलेला आहे. संविधानाने मागासलेल्या जाती-जमातींना विशेष संरक्षणात्मक तरतूद केली असून विकासाच्या समान संधी, समान हक्क व मानसन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. आरक्षणाच्या स्वरूपात शैक्षणिक संस्था व सार्वजनिक क्षेत्रात सकारात्मक संधी मिळतील अशीही तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच सांविधानिक कायद्यानुसार कोणत्याही व्यक्तीला समाजात वाईट किंवा भेदभावाची वागणूक, शारिरिक इजा किंवा कोणत्याही संधी किंवा विकासापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवणे इ. वर कायदेशीर प्रतिबंध ठेवण्यात आला आहे. पंचायतराज संस्था या ग्रामीण प्रशासकिय कारभार चालवणाऱ्या सार्वजनिक संस्था आहेत. लोकशाहीची प्राथमिक पायरी किंवा लोकशाही व्यवस्थेचा पाया म्हणजे या संस्था. ग्रामीण स्तरावरील प्रशासन हे तेथील सर्वसामान्यांच्या जीवनाशी थेट निगडीत असते. या संस्थांच्या कारभारात गावाखेड्यात वसलेल्या

**ग्रामीण स्तरावरील प्रशासन हे तेथील सर्वसामान्यांच्या जीवनाशी थेट निगडीत असते. या संस्थांच्या कारभारात गावाखेड्यात वसलेल्या गरिब व मागासवर्गीय लोकांचा सहभाग लोकशाहीला भक्कम करणारा ठरतो. परंतु अनेक सामाजिक बंधनांमुळे व उच्चवर्गीयांच्या दबावतंत्रामुळे मागासवर्गीयांचा पंचायतराज व्यवस्थेत सहभाग फारसा समाधानकारक नाही. भारतीय राजकारणाचा शिरकावाचा मार्ग हा ग्रामीण प्रशासनातून होतो.**

गरिब व मागासवर्गीय लोकांचा सहभाग लोकशाहीला भक्कम करणारा ठरतो. परंतु अनेक सामाजिक बंधनांमुळे व उच्चवर्गीयांच्या दबावतंत्रामुळे मागासवर्गीयांचा पंचायतराज व्यवस्थेत सहभाग फारसा समाधानकारक नाही. भारतीय राजकारणाचा शिरकावाचा मार्ग हा ग्रामीण प्रशासनातून होतो. मागासवर्गीय समाजाचा राजकारणावर पकड असणाऱ्या उच्च वर्गाशी आर्थिक व राजकिय संपर्काच्या अभावामुळे राजकारणातील सहभाग सहजसाध्यपणे होऊ शकत नाही.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातल्या पंचायतराज व्यवस्थेला मजबूती देण्याची मुख्य जबाबदारी भारत सरकारवर येऊन पडली. लोकशाहीचा विस्तार ग्रामीण भारत व देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत करताना गावाखेड्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या कामात पंचायत राज संस्थांची भूमिका महत्वाची ठरली. महात्मा गांधीजींचा ग्राम स्वराज या संकल्पनेवर दृढ विश्वास होता. गांधीजींच्या मते, गावांचे प्रशासन हे गावकऱ्यांनीच चालवले पाहिजे व गावे स्वयंपूर्ण झाली पाहिजेत तरच गावांचा खऱ्या अर्थाने विकास होईल. परंतु, संविधानाच्या मसुद्यात कोठेही ग्रामपंचायतींचा उल्लेख नव्हता. गांधीजींच्या हस्तक्षेपामुळे राज्य धोरणांच्या निर्देशक तत्त्वांच्या कलम ४० मध्ये पंचायतराज व्यवस्थेबाबत धोरणे मांडण्यात आली. सुरूवातीच्या काळात पंचायतराज व्यवस्था म्हणावी तितकी लोकप्रिय झाली नाही. ग्रामीण लोकांनीही ही व्यवस्था स्वीकारण्यात किंवा समजून घेण्यात फार उत्साह दाखवला नाही. १९५६ मध्ये नियोजन आयोगातर्फे बलवंत राय मेहता यांच्या नेतृत्वाखाली पंचायतराज व्यवस्थेचा पुनरावलोकन करण्यासाठी एक अभ्यासगट नेमण्यात आला. या अभ्यासगटाने मांडलेल्या शिफारसींनुसार स्थानिक पातळीवरील नेतृत्व स्थानिक लोकांना जोडणारा दुवा म्हणून देशाच्या सर्व ग्रामीण भागांत त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्वाची ठरते. १९६० च्या मध्यापर्यंत पंचायतराज व्यवस्था भारतातील जवळजवळ सर्व भागांत स्थापन झाली. याबरोबरच ग्रामीण भागातील जनतेलाही ही व्यवस्था आपलीशी वाटू लागली व आपले स्थानिक प्रश्न सोडवण्यात ही व्यवस्था प्रभावशाली काम करते आहे,

असा विश्वास तयार झाला. परंतु, दोन वर्षांच्या अंतराने या व्यवस्थेच्या विस्ताराचा वेग मंदावला. तज्ज्ञांच्या मते, सांविधानिक मंजूरी आणि स्पष्टता नसल्यामुळे बहुतांश पंचायती स्वयंसेवी संस्थेऐवजी सरकारी प्रतिनिधी म्हणून काम करतात. माथुर यांच्या मते, या व्यवस्थेकडे लोकसहभागाला प्रोत्साहन देत व लोकशाहीची पाळेमुळे दृढ करणारी प्रशासनयंत्रणा या दृष्टीकोनातून पाहिले न जाता केवळ राष्ट्रीय धोरणांची अंमलबजावणी सुलभ करणारी माध्यमे या संकुचित दृष्टीकोनातून पाहिले जात असल्यामुळे या व्यवस्थेचे यश मर्यादित राहिले.

**७३ वा सांविधानिक दुरूस्ती कायदा**

सप्टेंबर १९९१ मध्ये पंचायती राज विधेयक मांडण्यात आले व १९९२ मध्ये ७३ वा सांविधानिक दुरूस्ती कायदा म्हणून पारित करण्यात आले. काही किरकोळ बदल करून २४ एप्रिल, १९९३ मध्ये हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्याचे प्रमुख वैशिष्ट असे की, या कायद्यामुळे पंचायत राज संस्थांना सांविधानिक दर्जा मिळाला व सर्व राज्य सरकारांना या कायद्याची अंमलबजावणी करणे अनिवार्य बनले. दुरूस्ती कायद्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचनेत व अधिकृत कार्यक्षेत्रात एकसूत्रता आली. तसेच यामुळे पंचायत राज संस्थांना सामाजिक व आर्थिक विकास व ग्रामीण जीवनमानात सुधारणा आणण्यासाठी चालना दिली. सर्वसामान्य ग्रामीण जनतेचा सत्ता व प्रशासन चालवण्यातील थेटसहभाग असलेली पंचायत राज संस्थांची निर्मिती ही कदाचित भारतीय लोकशाही व्यवस्थेतील सर्वात मोठे परिवर्तन आहे. गाव, तालुका व जिल्हा अशा तीन स्तरांवर पंचायत राज संस्थांचे काम चालते. या कायद्याप्रमाणे प्रत्येक गावात ग्राम सभा असली पाहिजे. या कायद्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व पंचायतींमध्ये, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या असून एकूण जागांच्या एक तृतीआंश जागा महिलांसाठी राखून ठेवल्या आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामसभा अध्यक्षांच्या पदासाठी देण्यात आलेल्या आरक्षणामुळे देशाच्या सामाजिक-राजकीय संरचनेमध्ये मूलगामी बदल घडवून आणण्याची क्षमता निर्माण झाली आहे. या आरक्षण धोरणानुसार अनुसूचित जातींसाठी १८.५१ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ११.२६ टक्के आणि देशातील २,३९,५८२ पंचायतमध्ये महिलांसाठी ३६.८७ टक्के निवडण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

**सर्वसामान्य ग्रामीण जनतेचा सत्ता व प्रशासन चालवण्यातील थेटसहभाग असलेली पंचायत राज संस्थांची निर्मिती ही कदाचित भारतीय लोकशाही व्यवस्थेतील सर्वात मोठे परिवर्तन आहे. गाव, तालुका व जिल्हा अशा तीन स्तरांवर पंचायत राज संस्थांचे काम चालते. या कायद्याप्रमाणे प्रत्येक गावात ग्राम सभा असली पाहिजे. या कायद्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व पंचायतींमध्ये, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या असून एकूण जागांच्या एक तृतीआंश जागा महिलांसाठी राखून ठेवल्या आहेत.**

सद्यस्थितीत पंचायती राजच्या सर्व स्तरावर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले जात आहे. आलोक यांच्या मते, २०१३-१४ मध्ये देशभरातील एकूण २७,७०,७५५ ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जातींमध्ये १५ टक्के, अनूसुचित जमाती १९.२८ टक्के आणि महिलांपैकी ४३ टक्के प्रतिनिधी अनिवार्य आरक्षणाने निवडून आले आहेत. ह्यामुळे लोकशाहीत एक आभासी स्वरूपाची क्रांती घडून येण्याची किमया प्रत्यक्षात येताना दर पाच वर्षांच्या कालावधीत ५० लक्षांहून अधिक स्थानिक पातळीवर निवडून येत आहेत. त्यापैकी १३ लाख महिला आहेत आणि ५.५ लाखांपेक्षा अधिक अनुसूचित जाती आहेत. ५.५ लक्ष अनुसूचित जातींमध्ये मोठ्या संख्येने महिला अध्यक्ष आणि विभाग सदस्य म्हणून निवडून येत आहेत. (तपशीलासाठी, पान क्रमांक ४६ वरील सारणी पहा.)

मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शक्य ते प्रयत्न करणे हा मुद्दा देशाच्या विकासाच्या नियोजनाच्या दृष्टीकोनात फार महत्वाचा ठरतो. मानवी हक्कांसंबंधी जाणीवा दृढ होण्याबरोबर पंचायत राज व्यवस्थेच्या नव्या पिढीत मागसवर्गीय समाजातील लोक नेतृत्वासाठी पुढे येऊन पंचायत राज व्यवस्थेत सहभागी होऊ लागले आहे. शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायांसाठी कमी व्याजाचे कर्ज उपलब्ध करून देणे, रस्ते,पिण्याचे पाणी, व सार्वजमिक दिव्याची योग्य सोय अशा सारख्या आवश्यक बाबींवर मागासवर्गीय नेतृत्व पुढाकाराने कृती कार्यक्रम राबवत आहेत. आपला आजूबाजूचा परिसर, आपले लोक, गावपातळीवर विकास अशा काही मुद्यांबाबत मागासवर्गीय नेते आग्रही असल्याचे निरिक्षण नोंदवण्यात आले आहे. (वेंकट रवी व सुंदर राज यांनी आंध्र प्रदेशातील नल्लोर जिल्ह्याच्या स्थानिक प्रशासन संस्थेच्या कारभाराबाबत केलेल्या अभ्यास नोंदी नुसार)

**सारणी – दुर्बल घटक व महिलांचे पंचायत राज संस्थांमधील प्रतिनिधीत्व**

(१ एप्रिल २०१४ आकडेवारीनुसार )

| क्र. | राज्य | महिलांचे प्रतिनिधीत्व | | मागसवर्गीय जातींचे प्रतिनिधीत्व | | मागासवर्गीय जमातींचे प्रतिनिधीत्व | | एकूण खुला वर्ग धरून |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नंबर | आरक्षण (%) | नंबर | आरक्षण (%) | नंबर | आरक्षण (%) | नंबर |
| १. | आंध्र प्रदेश | १२९०२८ | ५०.० | ४८७२० | १८.८८ | २३६१० | ९.२ | २५७,०५५ |
| २. | अरूणाचल प्रदेश | ३८८९ | ३३.० | NA | NA | ९३७२ | ९९ | ९,३७२ |
| ३. | आसाम | ९९०३ | ५०.० | १३४४ | ४.६६ | ८८६ | ३.६ | २६,८४४ |
| ४. | बिहार | ६८०६६ | ५०.० | २२२०१ | १६.३६ | १०५३ | ०.८ | १३६,१३० |
| ५. | छत्तिसगढ | ८६५३८ | ५०.० | १९७५३ | ११.०० | ६३८६४ | ३२.० | १५८,७७६ |
| ६. | गोवा | ५०४ | ३३.० | NA | NA | ९२ | ८.० | १,५५९ |
| ७. | गुजरात | ४००१५ | ३३.० | ८२४७ | ७.०० | २५९६७ | १४.० | १२०,०४८ |
| ८. | हरयाणा | २४८७६ | ३३.३ | १४६८४ | २०.०० | NA | NA | ६८,१५२ |
| ९. | हिमाचल प्रदेश | १३९४७ | ५२.६ | ७४६७ | २४.७० | १२९९ | ६.६ | २७,८३२ |
| १०. | जम्मू व काश्मिर | ९९०५ | ३३.० | २७०८ | ८ | ३७२३ | ११.० | ३३,८४७ |
| ११. | झारखंड | ३११५७ | ५०.० | ५८७० | ११.०० | १८१३६ | ३४.१ | ५३,२०७ |
| १२. | कर्नाटक | ४१५७७ | ५०.० | १७७२३ | १८.४६ | १०२७५ | ९.६ | ९५,३०७ |
| १३. | केरळ | ९९०७ | ५०.० | ८६७ | ५.०० | १८७ | १.७ | १९,१०७ |
| १४. | मध्य प्रदेश | २०४१११ | ५०.० | ६०७२६ | १५.०० | ११३६४२ | २७.५ | २०३,२२१ |
| १५. | महाराष्ट्र | १०१५६९ | ५०.० | २२२०१ | ११.२५ | ३०२३६ | १४.१ | ३९६,९१८ |
| १६. | मणिपूर | ८३६ | ५१.० | ३९ | १.९६ | ३६ | २.६ | १,७२४ |
| १७. | ओडिशा | ७८४८२ | ५०.० | १६३९० | १६.२५ | २२२४० | २२.१ | १००,८६३ |
| १८. | पंजाब | ३३४८४ | ३३.० | ३०९२३ | २५.७९ | NA | NA | ९६,५७६ |
| १९. | राजस्थान | ६०३५१ | ५०.० | १९५४२ | १७.२० | १५३४२ | १२.६ | १२०,७२७ |
| २०. | सिक्कीम | ५४९ | ५०.० | ७७ | ७.०० | ४१८ | ३८.० | १,०९९ |
| २१. | तमिलनाडू | ४००७५ | ३५.० | ३०२७० | २४.०० | १८४१ | १.० | ११९,३९९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२. | त्रिपूरा | २०४४ | ५०.० | १५०८ | २७.११ | ३०९ | ५.१ | ५,६७६ |
| २३. | उत्तराखंड | ३४४९४ | ५०.० | १२२३० | १९.८० | २०६७ | ३.१ | ६१,४५२ |
| २४. | उत्तरप्रदेश | ३०९५११ | ३९.० | १८५१५९ | २४.० | NA | NA | ७७३,९८० |
| २५. | पश्चिम बंगाल बंगालबंगाल | १९७६२ | ५०.० | १७६०५ | ४१.६७ | ४१६८ | १४.३ | ५८,८६५ |
| **केंद्रशासित प्रदेश** | | | | | | | | |
| २६. | अंदमान व निकोबार | २८९ | ३३.८ | NA | NA | NA | NA | ८७६ |
| २७. | चंदिगढ | ५७ | ३४.४ | २८ | १८.६६ | NA | NA | १४९ |
| २८. | दादरा नगर हवेली | ४७ | ३६.९ | ३ | २.०० | ११२ | ८१.८ | १२५ |
| २९. | दमण दिव | ४१ | ३३.० | ४ | १.०० | १६ | ११.० | १११ |
| ३०. | लक्ष्यद्विप | ४१ | ३३.० | NA | NA | ११० | १०० | ११० |
| ३१. | पॉडुचेरी | ३७० | ३६.२ | २३९ | २१.०० | NA | NA | १,०२१ |
| | **भारत** | **१३५५४२५** | **४३.००** | **५४६५२८** | **१५.००** | **३४९००१** | **१९.२८** | **२९५०१२८** |

*स्त्रोत: राज्य सरकारांनी दिलेल्या माहितीनुसार राज्य सरकारांच्या प्रायोगिक मूल्यांकन २०१३-१४, भारतीय सार्वजनिक प्रशासकिय संस्था. टिप: मेघालय, मिझोरम, व नागालँड ही तीन राज्ये ७३ व्या सांविधानिक दुरूस्ती कायद्याच्या कार्यक्षेत्रातून वगळण्यात आली आहेत.*

दुर्बल घटकांना लोकशाही यंत्रणेत थेट सहभागी होता येण्याची संधी पंचायत राज व्यवस्थेतील घटनात्मक तरतूदींमुळे निर्माण झाली. कलम २४३ डी नुसार पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणूकींसाठी सर्व मतदारसंघात मागासवर्गीय व दुर्बल घटकांसाठी राखीव जागा असणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले आहे. या कायद्याने एकाच मतदारसंघातून दुसऱ्या खेपेला निवडणूक लढवता येण्याची मुभा दिलेली नसली तरिही या शेजारी मतदारसंघातून राखीव जागांवरून निवडून येण्याची परवानगी दिलेली आहे.

कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, राजस्थान व सिक्कीम इ. राज्यांतील ग्रामीण भागात स्वयंपूर्ण विकासाबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली आहे. या राज्यांतील ग्रामसभा अत्यंत प्रभावीपणे कार्यरत असून ग्रामसभांतून घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबाजावणी यशस्वी करण्यासाठी विशेष पुढाकार घेऊन लोकसहभागाला उत्तेजन दिले जात आहे. स्वयंप्रशासनाची अनुकलनीय पायंडे पाडण्यात पंचायत राज व्यवस्थेची नवी पिढी यशस्वी ठरत आहे.

पंचायती राज व्यवस्थेतील महिलांबाबत आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, राजकीय सशक्तीकरणामुळे महिलांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली आहे. समतावादी आधारावर समाजाशी संबंधित सर्व बाबींमध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होण्यास सक्षम केले आहे. पंचायत सदस्यत्वामुळे महिलांचा सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील दर्जाही सुधारला आहे. आज महिला सदस्यांना पंचायत क्षेत्रातील सर्व सामाजिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते. पद्मनाभ भट यांच्या कर्नाटकमधील उडिपी गावाच्या अभ्यास लेखात या संदर्भातील सर्व निरिक्षणे देण्यात आली आहेत.

गेल्या दोन दशकात पंचायती राज संस्थेच्या कामकाजाच्या अनुभवावरून असे दिसून येते की, प्रशासकिय कार्यांच्या अंमलबजावणीत निश्चितता आणि निरंतरता प्राप्त होत आहे. तथापि, अनेक पंचायतराज अध्यक्ष व सदस्य जरी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निवडणुकीतून निवडून आलेले असले तरिही त्यांच्या स्थानिक प्रशासनामध्ये अर्थपूर्ण भाग नसल्यामुळे स्वत:ला कार्यहिन समजतात.

### मागासवर्गीयांसाठी प्रतिकूल ठरणारे घटक

आंध्र प्रदेश, हरयाणा,हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, ओडिसा, छत्तिसगड, महाराष्ट्र, व राजस्थान या राज्यांनी केवळ दोन आपत्य असलेल्यांनाच निवडणूक लढवता येईल, असा निकष जारी केला आहे. हा निकष स्त्री-पुरूष दोघांच्या विरोधात जात असला तरिही महिलांना विशेषत: अनुसूचित जाती जमातीतींल महिलांसाठी अधिक नुकसानकारक ठरला आहे. कारण यांपैकी बहुसंख्य लोक मोठे व एकत्र कुटुंब पध्दती स्वीकारण्यावर भर देतात. ग्रामीण भारतातील परंपरेने सत्तेवर असणाऱ्या प्रभावशाली गटांचे अजूनही कायम असलेले वर्चस्व आणि ७३ व्या दुरुस्तीच्या घटनात्मक तरतुदींमुळे विरोधी व विवादग्रस्त अशी परिस्थिती ग्रामीण भागात निर्माण केली आहे. ज्यामुळे हिंसा, रक्तपात आणि नुकसानासहित मोठ्या प्रमाणात मानवी हक्कांचे उल्लंघन जीवितहानी यांसारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. बऱ्याचशा राज्यांमध्ये पंचायत निवडणुका होण्याआधी व्यापक प्रमाणात हिंसा झाली आणि बऱ्याच जागा निवडणूक न लढताच जिंकल्या गेल्या. यावरून असे दिसून येते की सत्तेची रस्सीखेच ही फक्त राज्य आणि पंचायत यांच्यात नव्हे तर परंपरेने सत्तेवर असणाऱ्या प्रभावशाली गट आणि मागासवर्गीय जातींतून उदयास येणाऱ्या नवीन नेतृत्वांमध्येही आहे. उच्च प्रभावशाली सत्ताधारी गट नेहमी सर्व ताकदीनिशी दुर्बल वर्गाला विशेषत: अनुसूचित जाती-जमातींतील लोकांना त्यांचे सांविधानिक अधिकार जसे- मतदानाच्या प्रक्रियेत भाग घेणे, निवडणूक प्रचार करणे, निवडणूक सभांना उपस्थित राहणे, निवडणूक कार्यकक्ष उभारणे, आपल्या प्रतिनिधीसाठी प्रचार करणे, इत्यादींचा स्वतंत्रपणे वापर करण्याला विरोध दर्शवत आले आहेत.

---

**पंचायती राज व्यवस्थेतील महिलांबाबत आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, राजकीय सशक्तीकरणामुळे महिलांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली आहे. समतावादी आधारावर समाजाशी संबंधित सर्व बाबींमध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होण्यास सक्षम केले आहे. पंचायत सदस्यत्वामुळे महिलांचा सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील दर्जाही सुधारला आहे. आज महिला सदस्यांना पंचायत क्षेत्रातील सर्व सामाजिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते.**

---

### निष्कर्ष

७३ व्या सांविधानिक कायद्यातील तरतूदीत भारतातील मागासलेल्या समूहांना सबल करण्यासाठी शासनाच्या भूमिकेवर भाष्य करण्यात आले आहे. सुरूवातीच्या काळात या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे, जाती व वर्गनिहाय भेदाभेदांच्या उतरंडीची चिवट मानसिकता, पारंपारिक समाजधारणा, परकिय हस्तक्षेप, व मागासलेल्या समाजाची अत्यंत बिकट आर्थिक परिस्थिती, निरक्षरता इ. मुळे समान हक्काबाबत जागरूकतेचा अभाव या सर्व कारणांनी सामाजिक स्तरावरील मागासवर्गीय समाजाचा अपेक्षित विकास खुंटावलेला राहिला. परंतु, नंतरच्या काळात हे चित्र हळू हळू बदलताना दिसत आहे. आजच्या घडीला मागासवर्गीय समाजातील अनेक लोक समान हक्क मिळण्यासाठी व आपले जीवनमान सबल करण्यासाठी प्रतिनिधीत्व करण्यासाठी पुढे सरसावत आहेत. यामुळे काही सकारात्मक बदलांना सुरूवात झाली असली तरिही मागासवर्गीय समाजातील महिलांना विकासाच्या प्रक्रियेत सामील करून घेणे, महिलांचा सत्ताकारणात व त्यानुषंगाने निर्णय प्रक्रियेत समान सहभाग इ.सारख्या काही आवश्यक बाबीं अजूनही दुर्लक्षित राहिलेल्या आहेत. पंचायत राज संस्थांमध्ये मागासलेल्या महिलांना पुढे येता येईल अशी प्रोत्साहनात्मक परिस्थिती घडवणे व कालानुरूप या मुद्द्यांचे महत्व जाणून सकारात्मक प्रयत्न झाल्यास महिलांचे विशेषत: मागासवर्गीय गटातील महिलांचे सबलीकरण होण्यास मोठा हातभार लागेल.

सबलीकरणाची विस्तृत व्याख्या मांडतांना या संकल्पनेच्या विविध सामाजिक विषयांचा संदर्भ गृहीत धरला आहे. मानवी हक्क, आर्थिक असुरक्षितता तसेच सामाजिक लाभांपासून वंचित मानवी समूदायांचा सर्वसामान्य सामाजिक क्षेत्राशी संपर्क व त्यानुषंगाने त्यांच्या क्षमतांचा व कौशल्यांचा विकास व निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त होण्याची क्षमता किंवा निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळून जीवनातील महत्वांच्या घडामोडीं स्वयंनियंत्रणात राहून योग्य दिशा मिळेल अशी परिस्थिती संबोधण्याच्या संदर्भात सबलीकरणाची संकल्पना लागू केली जाते.

भारतीय संविधानाने मागासलेल्या जाती-जमातींना विशेष संरक्षणात्मक तरतूद केली असून विकासाच्या समान संधी, समान हक्क व मानसन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. आरक्षणाच्या स्वरूपात शैक्षणिक संस्था व सार्वजनिक क्षेत्रात सकारात्मक संधी मिळतील अशीही तरतूद करण्यात आलेली आहे.

पंचायतराज संस्था या ग्रामीण प्रशासकिय कारभार चालवणाऱ्या सार्वजनिक संस्था आहेत. लोकशाहीची प्राथमिक पायरी किंवा लोकशाही व्यवस्थेचा पाया म्हणजे या संस्था. ग्रामीण स्तरावरील प्रशासन हे तेथील सर्वसामान्यांच्या जीवनाशी थेट निगडीत असते. या संस्थांच्या कारभारात गावाखेड्यांत वसलेल्या गरिब व मागासवर्गीय लोकांचा सहभाग लोकशाहीला भक्कम करणारा ठरतो. परंतु अनेक सामाजिक बंधनांमुळे व उच्चवर्गीयांच्या दबावतंत्रामुळे मागासवर्गीयांचा पंचायतराज व्यवस्थेत सहभाग फारसा समाधानकारक नाही. भारतीय राजकारणाचा शिरकावाचा मार्ग हा ग्रामीण प्रशासनातून होतो. मागासवर्गीय समाजाचा राजकारणावर पकड असणाऱ्या उच्च वर्गाशी आर्थिक व राजकिय संपर्काच्या अभावामुळे राजकारणातील सहभाग सहजसाध्यपणे होऊ शकत नाही.

लोकशाहीचा विस्तार ग्रामीण भारत व देशाच्या कानाकोपऱ्या पर्यंत करताना गावाखेड्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या कामात पंचायत राज संस्थांची भूमिका महत्वाची ठरली.

संविधानाच्या मसुद्यात कोठेही ग्रामपंचायतींचा उल्लेख नव्हता. गांधीजींच्या हस्तक्षेपामुळे राज्य धोरणांच्या निर्देशक तत्त्वांच्या कलम ४० मध्ये पंचायतराज व्यवस्थेबाबत धोरणे मांडण्यात आली. सुरूवातीच्या काळात पंचायतराज व्यवस्था म्हणावी तितकी लोकप्रिय झाली नाही. ग्रामीण लोकांनीही ही व्यवस्था स्वीकारण्यात किंवा समजून घेण्यात फार उत्साह दाखवला नाही. १९५६ मध्ये नियोजन आयोगातर्फे बलवंत राय मेहता यांच्या नेतृत्वाखाली पंचायतराज व्यवस्थेचा पुनरावलोकन करण्यासाठी एक अभ्यासगट नेमण्यात आला. या अभ्यासगटाने मांडलेल्या शिफारसींनुसार स्थानिक पातळीवरील नेतृत्व स्थानिक लोकांना जोडणारा दुवा म्हणून देशाच्या सर्व ग्रामीण भागांत त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्वाची ठरते.

**पंचायतराज संस्था या ग्रामीण प्रशासकिय कारभार चालवणाऱ्या सार्वजनिक संस्था आहेत. लोकशाहीची प्राथमिक पायरी किंवा लोकशाही व्यवस्थेचा पाया म्हणजे या संस्था. ग्रामीण स्तरावरील प्रशासन हे तेथील सर्वसामान्यांच्या जीवनाशी थेट निगडीत असते. या संस्थांच्या कारभारात गावाखेड्यांत वसलेल्या गरिब व मागासवर्गीय लोकांचा सहभाग लोकशाहीला भक्कम करणारा ठरतो. परंतु अनेक सामाजिक बंधनांमुळे व उच्चवर्गीयांच्या दबावतंत्रामुळे मागासवर्गीयांचा पंचायतराज व्यवस्थेत सहभाग फारसा समाधानकारक नाही.**

सप्टेंबर १९९१ मध्ये पंचायती राज विधेयक मांडण्यात आले व १९९२ मध्ये ७३ वा सांविधानिक दुरूस्ती कायदा म्हणून पारित करण्यात आले. काही किरकोळ बदल करून २४ एप्रिल, १९९३ मध्ये हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्याचे प्रमुख वैशिष्ट असे की, या कायद्यामुळे पंचायत राज संस्थांना सांविधानिक दर्जा मिळाला व सर्व राज्य सरकारांना या कायद्याची अंमलबजावणी करणे अनिवार्य बनले. दुरूस्ती कायद्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचनेत व अधिकृत कार्यक्षेत्रात एकसूत्रता आली. तसेच यामुळे पंचायत राज संस्थांना सामाजिक व आर्थिक विकास व ग्रामीण जीवनमानात सुधारणा आणण्यासाठी चालना दिली.

सर्वसामान्य ग्रामीण जनतेचा सत्ता व प्रशासन चालवण्यातील थेट सहभाग असलेली पंचायत राज संस्थांची निर्मिती ही कदाचित भारतीय लोकशाही व्यवस्थेतील सर्वात मोठे परिवर्तन आहे. गाव, तालुका व जिल्हा अशा तीन स्तरांवर पंचायत राज संस्थांचे काम चालते. या कायद्याप्रमाणे प्रत्येक गावात ग्राम सभा असली पाहिजे. या कायद्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व पंचायतींमध्ये, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या असून एकूण जागांच्या एक तृतीआंश जागा महिलांसाठी राखून ठेवल्या आहेत.

मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शक्य ते प्रयत्न करणे हा मुद्दा देशाच्या विकासाच्या नियोजनाच्या दृष्टीकोनात फार महत्वाचा ठरतो. मानवी हक्कांसंबंधी जाणीवा दृढ होण्याबरोबर पंचायत राज व्यवस्थेच्या नव्या पिढीत मागसवर्गीय समाजातील लोक नेतृत्वासाठी पुढे येऊन पंचायत राज व्यवस्थेत सहभागी होऊ लागले आहे.

कलम २४३ डी नुसार पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणूकींसाठी सर्व मतदारसंघात मागासवर्गीय व दुर्बल घटकांसाठी राखीव जागा असणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले आहे. या कायद्याने एकाच मतदारसंघातून दुसऱ्या खेपेला निवडणूक

लढवता येण्याची मुभा दिलेली नसली तरिही शेजारी मतदारसंघातून राखीव जागांवरून निवडून येण्याची परवानगी दिलेली आहे.

कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, राजस्थान व सिक्कीम इ. राज्यांतील ग्रामीण भागात स्वयंपूर्ण विकासाबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली आहे. या राज्यांतील ग्रामसभा अत्यंत प्रभावीपणे कार्यरत असून ग्रामसभांतून घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबाजावणी यशस्वी करण्यासाठी विशेष पुढाकार घेऊन लोकसहभागाला उत्तेजन दिले जात आहे. स्वयंप्रशासनाचे अनुकलनीय पायंडे पाडण्यात पंचायत राज व्यवस्थेची नवी पिढी यशस्वी ठरत आहे.


**गाव, तालुका व जिल्हा अशा तीन स्तरांवर पंचायत राज संस्थांचे काम चालते. या कायद्याप्रमाणे प्रत्येक गावात ग्राम सभा असली पाहिजे. या कायद्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व पंचायतींमध्ये, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या असून एकूण जागांच्या एक तृतीआंश जागा महिलांसाठी राखून ठेवल्या आहेत.**

पंचायती राज व्यवस्थेतील महिलांबाबत आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, राजकीय सशक्तीकरणामुळे महिलांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली आहे. समतावादी आधारावर समाजाशी संबंधित सर्व बाबींमध्ये महिलांना पुरूषांच्याबरोबरीने सहभागी होण्यास सक्षम केले आहे. पंचायत सदस्यत्वामुळे महिलांचा सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील दर्जाही सुधारला आहे. आज महिला सदस्यांना पंचायत क्षेत्रातील सर्व सामाजिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते.

■■■

*डॉ. ब्रम्हानंदम हे सेंटर फॉर मल्टी डिसिप्लीनरी डेव्हलपमेंट व रिसर्च, धारवाड, कर्नाटक येथे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. के व्ही श्रीनिवास आंध्र प्रदेशातील आचार्य नागार्जुन विद्यापीठात पोस्ट डॉक्टरल फेलो आहेत.*


*इमेल: tdosamma@gmail.com*



उपाय

# अनुसुचित जाती-जमातींमध्ये उच्च शिक्षणाद्वारे सक्षमीकरण

- एस. श्रीनिवास राव आणि सुंदरेशा डी.एस.



**अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांच्या कल्याणासाठी नुकत्याच सरकारने केंद्रीय तसेच राज्यांच्या अर्थसंकल्पात काही उप-योजनांसाठी निधीची तरतूद केली आहे, या नव्या योजना सरकारच्या अनेक विभागांच्या एकत्रित सहकार्याने कार्यान्वित होणार आहेत. खरेतर, उप योजनांसाठी केलेल्या तरतुदींमुळे, गेल्या दशकात अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांमध्ये व्यवसाय आणि व्यापार करणाऱ्या वर्गाच्या निर्मितीला हातभार लागला.**

काही काही जाती आणि जमातींना इतरांपेक्षा जास्त विशेषाधिकार दिलेले आहेत हे सामाजिक सत्य आहे. याच न्यायाने इतर काही जाती आणि जमातींना त्यांच्यापेक्षा सामाजिकदृष्ट्या उच्च जाती आणि जमातींच्या तुलनेत कमी सवलती मिळाल्या आहेत, अनेक फायद्यांपासून ते वंचित आहेत. नेमके हेच विशिष्ट सामाजिक सत्य लक्षात घेऊन, कमी अधिकार मिळालेल्या किंवा अति वंचित गटांना न्याय दिला जावा म्हणून (अनेक वर्षे धार्मिक रितीभातींबाबतच्या परिस्थितीवर आधारित समाज व्यवस्थेमुळे वंचित राहिल्याबद्दल अनुसूचित जातींना आणि भौगोलिकदृष्ट्या समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अत्यंत लांब राहिल्यामुळे नागरी फायद्यांपासून वंचित राहिल्याबद्दल अनुसूचित जमातींना) घटनेने त्यांच्या हक्कांच्या विशेष सुरक्षिततेसाठी काही खात्रीशीर उपाययोजना केल्या आहेत. सामाजिक भेदभाव प्रतिबंधक, अत्याचार प्रतिबंधक आणि (अनुसूचित जातींकरिता) अस्पृश्यताविरोधी कायदा, (अनुसूचित जातींकरिता) जमीन मालकी आणि रहिवास हक्कांचे संरक्षण कायदा, (अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांसाठी) शिष्यवृत्त्यांचे नियोजन आणि शिक्षण तसेच नोकऱ्यांमध्ये आरक्षण यासारख्या अनेक सकारात्मक उपाययोजना सरकारने केल्या आहेत. अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांच्या कल्याणासाठी नुकत्याच सरकारने केंद्रीय तसेच राज्यांच्या अर्थसंकल्पात काही उप-योजनांसाठी निधीची तरतूद केली आहे, या नव्या योजना सरकारच्या अनेक विभागांच्या एकत्रित सहकार्याने कार्यान्वित होणार आहेत. खरेतर, उप योजनांसाठी केलेल्या तरतुदींमुळे, गेल्या दशकात अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांमध्ये व्यवसाय आणि व्यापार करणाऱ्या वर्गाच्या निर्मितीला हातभार लागला.

वाढत्या महत्त्वाकांक्षा आणि अपेक्षांना प्रोत्साहन देऊन नव-व्यावसायिक वर्गाचा छोटा भाग म्हणून उदयाला येताना, देशाने अनुसूचित जाती आणि जमातींमधील नव्या सुशिक्षित मध्यमवर्गाचा उदय होताना पाहिला. बंदिस्त सामाजिक चौकटीत हा बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण आणि रोजगारासंबंधीच्या सकारात्मक धोरणांनी जी भूमिका पार पाडली त्याचा अभ्यास केल्यावर ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते. निस्संशयपणे कोणीही असा दावा करू शकतो की उच्च शिक्षणातील तसेच सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण ह्यामुळेच स्वातंत्र्योत्तर भारतात अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये नवा सुशिक्षित मध्यमवर्ग निर्माण होऊ शकला. उच्च शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची कठोर अंमलबजावणी

झाल्यामुळेच अनुसूचित जाती आणि जमातींमधील नव्या पिढ्यांना समाज व्यवस्थेमध्ये असलेली जातीभेदांची पारदर्शक भिंत भेदणे शक्य झाले. त्यामुळे, सामाजिक,आर्थिक आणि राजकीय अशा सर्व पातळ्यांवर त्यांचे सक्षमीकरण सुलभ झाले. अशा सक्षमीकरणाचा परिणाम शैक्षणिक आणि सामाजिक पातळ्यांवर दिसून आला. एका अर्थी हे परिणाम चक्राकार आणि एकमेकांवर अवलंबून आहेत. राज्यांच्या धोरणांमुळे अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांना शिक्षण घेणे सोपे झाले, ह्या शिक्षणामुळे त्यांना त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे शक्य झाले आणि ह्या सुधारणांमुळे अधिक उच्च दर्जाच्या, उत्तम आणि अधिक विस्तारीत शैक्षणिक संधी उपलब्ध झाल्या.

सगळ्यात प्रथम, वंचित घटकांच्या सामाजिक सक्षमीकरणाचा महत्त्वाचा परिणाम हा झाला की सक्षमीकरण झाल्यामुळे, रोजगार किंवा नोकरीच्या उत्तम संधी मिळविण्यासाठी चांगले आणि काळाशी सुसंगत शिक्षण मिळविण्याची आकांक्षा वाढीला लागली.राज्य किंवा विभाग कोणताही असो, सगळ्याच क्षेत्रात अनुसूचित जाती आणि जमातींमधील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे.प्राथमिक शिक्षणासाठी नाव नोंदणी करणाऱ्यांची संख्यादेखील वाढलेली दिसत आहे. प्राथमिक शाळांमधून होणारी विद्यार्थ्यांची गळती रोखणे आणि त्यांना नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित करणे या गोष्टी अजूनही चिंतेचा विषय असला तरीही आता विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी झाले आहे आणि विद्यार्थ्यांची नियमित उपस्थितीदेखील वाढली आहे. प्राथमिक शिक्षणाकडून माध्यमिक शिक्षणाकडे वाटचाल आणि तिथून उच्च शिक्षणाकडे झेप घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. मात्र, या स्थित्यंतराच्या प्रवासात अजूनही खूप काही करण्यासारखे आहे.

### उच्च शिक्षणातील सहभाग आणि सक्षमीकरण

सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणामुळे अनुसूचित जाती आणि जमातींमधील विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणातील सहभाग वाढला आहे आणि हा वाढता सहभाग हा त्यांच्यासाठी उत्तम जीवनशैली, समाजातील पत आणि आर्थिक संधी वाढण्यासाठी एक चांगला मार्ग ठरत आहे. गेल्या पंधरा वर्षांत अनुसूचित जाती आणि जमातीमधील विद्यार्थांच्या सकल शाळा नोंदणी दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

**सगळ्यात प्रथम, वंचित घटकांच्या सामाजिक सक्षमीकरणाचा महत्त्वाचा परिणाम हा झाला की सक्षमीकरण झाल्यामुळे, रोजगार किंवा नोकरीच्या उत्तम संधी मिळविण्यासाठी चांगले आणि काळाशी सुसंगत शिक्षण मिळविण्याची आकांक्षा वाढीला लागली.राज्य किंवा विभाग कोणताही असो, सगळ्याच क्षेत्रात अनुसूचित जाती आणि जमातींमधील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. प्राथमिक शिक्षणासाठी नाव नोंदणी करणाऱ्यांची संख्यादेखील वाढलेली दिसत आहे.**

उदाहरणार्थ, अनुसूचित जातींमधील विद्यार्थ्यांनी २०१५मध्ये सकल शाळा नोंदणी दरात मोठी वाढ नोंदवत हे प्रमाण १९.१% इतके नोंदविले जे २००५-०६ मध्ये फक्त ८.४% होते. (तक्ता क्र. १) त्याच प्रकारे, अनुसूचित जमातींमधील विद्यार्थ्यांच्या नोंदणी दरात देखील सुधारणा झाली आहे.उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २००५-०६ मध्ये ६.६% होते ते सन २०१४-१५ मध्ये १३.७% पेक्षा जास्त झाले.

खरेतर, वर्ष १९९९-२००० पासूनच राज्यांच्या धोरणांचा दबाव आणि सरकारच्या पुढाकाराने सुरु झालेल्या काही योजनांमुळे नवीन सहस्त्रकाच्या पहिल्या दशकात उच्च शिक्षण क्षेत्रात संस्थात्मक बांधणीची दुसरी पायरी सुरु झाली.जर आपण अनुसूचित जातींसाठीच्या सकल नोंदणी दराचा विचार केला तर १९९९ ते २००० या काळात ५.०९%असलेले प्रमाण २०१४-१५ मध्ये जवळजवळ चौपट झालेले दिसते.अनुसूचित जमातींच्या बाबतीत मात्र ही वाढ फक्त दुप्पट झाली आहे.(१९९९-२००० या काळात ६.४३% तर २०१४-१५ या काळात १३.७%) (राव २०१७,१५९; भारत सरकार २०१६: पान क्रमांक २९ आणि ३१). या उलट आरक्षित नसलेल्या सर्व लोकसंख्येसह सर्व गटांसाठी हे प्रमाण २००५-६ मध्ये ११.६ होते ते २०१४-१५ मध्ये वाढून २४.३ झाले.

या माहितीवरून काही अनुमाने काढता येतील. सन २००० ते २०१५ या कालावधीत सर्व गटांमध्ये, विशेषकरून अनुसूचित जातींच्या बाबतीत, उच्च शिक्षणासाठीच्या नोंदणी दरात जास्त वेगाने वाढ झालेली दिसून येते.अनुसूचित जाती आणि जमातींमधील स्त्रियांना सुद्धा नव्या सुधारणांचा जास्त फायदा झालेला आहे. उदाहरणार्थ, अनुसूचित जाती आणि जमातींमधील स्त्रियांचा उच्च शिक्षणातील सहभाग २००५-६ मध्ये होता (अनुसूचित जातीमधील स्त्रियांसाठी ६.४ तर अनुसूचित जमातींमधील स्त्रियांसाठी ४.७) त्यापेक्षा २०१४-१५ मध्ये जवळजवळ तिप्पट (अनुसूचित जातीमधील स्त्रियांसाठी

तक्ता क्रमांक १ : उच्च शिक्षणासाठीचा सकल नोंदणी दर(२००५-६ ते २०१४-१५)

| वर्ष | सर्व गटांसाठी | | | अनुसूचित जाती | | | अनुसूचित जमाती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| २००५-०६ | १३.५ | ९.४ | ११.६ | १०.१ | ६.४ | ८.४ | ८.६ | ४.७ | ६.६ |
| २०१४-१५ | २५.३ | २३.२ | २४.३ | २०.० | १८.२ | १९.१ | १५.२ | १२.३ | १३.७ |

१८.२ तर अनुसूचित जमातींमधील स्त्रियांसाठी १२.३) झाला आहे हे तक्त्यावरून स्पष्ट होते. अनुसूचित जाती आणि जमातींमधल्या विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणासाठीच्या सहभागातली विशिष्ट वाढ हे आता सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल ते अधिकाधिक सजग होत असल्याचे द्योतक आहे.याचा अर्थ असाही होतो की अनुसूचित जाती आणि जमातींमधील सध्याची पिढी उच्च शिक्षण आणि त्यायोगे होणाऱ्या सामाजिक सक्षमीकरणाच्या प्रक्रियेच्या महत्त्वाबाबत योग्य अनुमान लावायला शिकली आहे. अनुसूचित जाती आणि जमातीमधील विद्यार्थी आता नागरी सेवांमध्ये उच्च पदे मिळवीत आहेत. त्याचबरोबर एकेकाळी खास व्यवसाय म्हणून गणल्या गेलेल्या अभियांत्रिकी,वैद्यकशास्त्र,विधी आणि विद्यापीठाचे प्राध्यापक यासारख्या क्षेत्रात देखील त्यांनी स्वत:ला सिध्द करून दाखवायची सुरुवात केली आहे. याचा परिणाम म्हणून नजीकच्या काळात या जाती आणि जमातीमधील मध्यमवर्ग तसेच व्यवसायविषयक पात्रतांची नव्याने मांडणी होऊ लागली. तथापि,आपल्या हे सुद्धा लक्षात येईल की मोठ्या प्रमाणातले चौथ्या दर्जाचे रोजगार उदाहरणार्थ,चौथ्या श्रेणीच्या सरकारी आणि खासगी क्षेत्रातील नोकऱ्या अनुसूचित जाती आणि जमातींमधील व्यक्तींनी कमावलेल्या आहेत, पण त्यामुळे, सध्याच्या आधुनिक, निधर्मी जगात पूर्वापार चालत आलेली वर्णव्यवस्थाच अजूनही


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

सुरु आहे असेच वाटते. शिक्षण अर्धवट ठेवून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांनी लवकर शाळा सोडत, औपचारिक रोजगार क्षेत्रात कमी दर्जाच्या नोकऱ्या स्वीकारल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.मात्र आतापर्यंत दिसून आलेल्या ह्या परिस्थितीची पर्वा न करता रूढी-परंपरागत कमी पातळीच्या जीवनशैलीकडून उच्च दर्जाच्या जीवनशैलीत आणि आधुनिक व्यावसायिक जगात प्रवेश केल्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये लक्षणीय सामाजिक बदल आणि प्रतिष्ठा निर्माण झाली. उदारमतवादी युगाच्या उदयानंतर अजून एक गोष्ट अशी दिसून आली की अनुसूचित जाती आणि जमातींमधील जास्तीत जास्त सुशिक्षित व्यावसायिक उच्च शिक्षण आणि नोकऱ्यांसाठी परदेशी जाऊ लागले आणि त्या त्या यजमान देशांमध्ये आपल्या देश आणि जातीबांधवांचा समूह तयार करू लागले

तक्ता क्रमांक २ : विविध क्षेत्रात रोजगार करत असलेल्या, ग्रामीण भागातील अनुसूचित जाती आणि जमातींमधील घरांचे एकंदर प्रमाण

| | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|---|
| ग्रामीण भागातील घरांची एकूण संख्या | ३३१६४०८५ | १९७३७३९९ |
| सरकारी | ३.९५% | ४.३६% |
| सार्वजनिक | ०.९३% | ०.५८% |
| खासगी | २.४२% | १.४८% |

*टीप: वर दिलेले प्रतिशत प्रमाण हे त्या त्या प्रकारांतील घरांच्या एकूण संख्येवरून मोजलेले आहे.*

*स्रोत : ग्रामीण विकास मंत्रालय, २०११.*

आहेत. देशातील वंचित नागरिकांचे जे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण घडून आले आहे त्याचेच हे निदर्शक आहे. याची विरुद्ध बाजू बघायची तर देशात मात्र आजदेखील अत्याचार आणि भेदभावाची अनेक प्रकरणे उजेडात येत आहेत. त्यामुळे सक्षमीकरणाचे सकारात्मक परिणाम थोडे कमी झालेले दिसतात.

**काही चिंताजनक बाबी**

एवढे सगळे प्रयत्न असले तरीही काही चिंता करण्यासारखे मुद्दे उरतातच. उच्च शिक्षणाच्या वाढत्या खासगीकरणाचा सामाजिकदृष्ट्या

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

वंचित विद्यार्थ्यांवर झालेला प्रतिकूल परिणाम लक्षणीयरीत्या समोर आला. कारण खासगीकरणामुळे परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती आणि जमातीतल्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक स्थलांतराच्या आकांक्षांना मर्यादा पडल्या.ह्याचे दोन परिणाम होऊ शकतील.एक म्हणजे २००० सालानंतर उच्च शिक्षण क्षेत्रातील बहुतांश वाढ ही खासगी व्यावसायिक उच्च शिक्षण क्षेत्रात झाली आणि भारतीय राज्यघटनेनुसार देण्यात आलेले आरक्षण खासगी क्षेत्रात उपलब्ध नसल्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातींमधील मोठ्या वर्गाला ते उच्च शिक्षण मिळणे सुकर नाही. ह्यामुळे, मोठ्या प्रमाणात अनुसूचित जाती आणि जमातींमधील विद्यार्थी सर्वसामान्य उच्च शिक्षणाकडे वळले आहेत. याचा अर्थ असा होतो की त्यांच्या रोजगाराच्या संधी अरुंद होत जात आहेत. दुसरे म्हणजे, सध्या ज्या खासगी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी उपलब्ध आहेत तिथे आरक्षण नसल्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातींमधील व्यक्ती स्पर्धेत मागे पडतात किंवा सुशिक्षित बेरोजगार होतात. हे जुळे मुद्दे,एका अर्थी, देशाच्या स्वातंत्र्यानंतर सुरु झालेल्या, वंचितांमधल्या सामाजिक बदलाच्या प्रक्रियेचा वेग कायम ठेवत आहेत. याशिवाय,सर्व गटांमध्ये विशेषत: अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये लिंग निरपेक्षता न पाळणे ही देखील गंभीर समस्या आहे.उच्च शिक्षणात स्त्रियांचा सहभाग वाढला असला तरी अजूनही त्या पुरुषांच्या कितीतरी मागे आहेत. आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अनुसूचित जाती आणि जमातीतल्या ज्या स्त्रिया शहरी भागात राहतात त्या ग्रामीण भागात राहणाऱ्या अनुसूचित जाती जमातीतल्या स्त्रियांपेक्षा शिक्षण क्षेत्रात जास्त सहभाग घेतात. याचाच अर्थ उच्च शिक्षण घेऊ शकल्यामुळे जो सामाजिक बदल स्त्रियांच्या जीवनात होऊ शकतो त्यापासून या गटांमधील स्त्रिया अजूनही मोठ्या प्रमाणात वंचित आहेत. हा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे की शहरी भागातील अनुसूचित जाती आणि जमातींमधील ज्या स्त्रिया उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेत आहेत त्या नव्या धोरणांच्या लाभार्थ्यांच्या दुसऱ्या पिढीच्या प्रतिनिधी आहेत.याचाच अर्थ असाही होतो की अनुसूचित जाती आणि जमातींमधील सर्वसामान्य घरांमधील आधीच्या पिढीतील नागरिक, विशेषत: या सर्वसामान्य घरांमधील स्त्रिया अजूनही सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणामुळे मिळणाऱ्या संधींच्या आवाक्याच्या आणि चौकटीच्या बाहेरच आहेत. हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी सर्वसामान्य रोजगार क्षेत्रातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या घरांची परिस्थिती तपासून पाहू.

तक्ता क्रमांक २ मध्ये जे रोजगार मिळवण्यासाठी काही प्रमाणात शिक्षित असण्याची पूर्व अट आहे अशा औपचारिक रोजगार क्षेत्रात ग्रामीण भागातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या नागरिकांची लोकसंख्या किती आहे याची आकडेवारी दिली आहे.विकास आणि सक्षमीकरणाच्या वाटेवर मार्गक्रमण करताना अनुसूचित जाती आणि जमातींमधील सर्वात वंचित लोकांपर्यंत पोहोचण्यात सरकारी धोरणे अपयशी ठरत आहेत त्याचेही चित्र यातून स्पष्ट होईल.

सुशिक्षित लोकांच्या रोजगारासंबंधीच्या या निराशाजनक चित्राचे अजून एक कारण असे आहे की स्वातंत्र्यानंतरच्या काळात खासगीकरणाकडे वाढता कल असल्यामुळे, सरकारी क्षेत्रातील रोजगारसंधी संकुचित होत गेल्या, त्यांचा विस्तार देखील होऊ शकला नाही. आणि खासगी क्षेत्रात आरक्षणाची सोय नसल्यामुळे,त्या क्षेत्रात अनुसूचित जाती आणि जमातींच्या सुशिक्षित उमेदवारांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया मंदावली, काही बाबतीत,अगदीच खुरटली. शिक्षित उमेदवारांबाबत रोजगार संधींच्या अभावामुळे अनुसूचित जाती आणि जमातींच्या मनात शिक्षणाबाबत निरुत्साह वाढीस लागेल अशी भीती आहे.

म्हणूनच, गेल्या काही दशकांमध्ये, अनुसूचित जाती आणि जमातींच्या बाबतीत अनेक गोष्टी परिणामकारकरीत्या सुधारल्या असल्या तरीही अजूनही सुधारणेला खूप वाव आहे. तथापि, बदल घडवून आणण्यासाठीची पायाभूत तयारी झाली आहे आणि अनुसूचित जाती आणि जमातींमधील नागरिकांना आता शिक्षणाचे महत्त्व पटू लागले आहे. या शिक्षणामुळेच सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देणारी, आरक्षण विरहित उच्च शिक्षण पद्धती आणि समाजव्यवस्था समजून घ्यायला त्यांना मदत होईल. सुलभतेने उच्च शिक्षण घेता येणे, ते शिक्षण चिकाटीने पूर्ण करणे आणि त्यातून रोजगाराच्या शाश्वत संधी उपलब्ध होणे हेच या ऐतिहासिकदृष्ट्या दुर्लक्षित गटांच्या सामाजिक सक्षमीकरणाचे योग्य मार्ग आहेत यात शंकाच नाही.

■■■

*एस. श्रीनिवास राव हे झाकीर हुसैन केंद्र, शैक्षणिक अभ्यास केंद्र, सामाजिक शास्त्र विद्यालय,जवाहरलाल नेहरू विद्यापीठ,नवी दिल्ली येथे समाजशास्त्राचे प्राध्यापक आहेत तर सुन्दरेशा डी.एस. हे त्याच संस्थेत डॉक्टरेटचे विद्यार्थी आहेत.*

*ई मेल: srinivas.zhces@gmail.com*
*dssundresh@gmail.com*

# दुर्बल घटकांसाठी उद्योजकतेचा विकास कार्यक्रम

- डॉ. सुनिल शुक्ला



**अनेक वेळा असे दिसून आले आहे की अल्पसंख्यांक समुदाय, दिव्यांग व्यक्ती आणि महिला यांच्यामध्ये त्यांच्यातील न्यूनगंडामुळे परकेपणाची भावना निर्माण होते. त्याच प्रमाणे सशक्त, सुदृढ समाजाला देखील निकृष्ट जीवन कंठावे लागत आहे. समाजातील विविध घटकांमध्ये भेदभाव वाढीला लागला आहे. त्याचप्रमाणे वंचितांच्या लोकसंख्येचा विचार करता समाजातील लिंगभिन्नता आणि अकुशलता यांमुळे विघटित झालेला समाज जर बाजूला काढला तर ही संख्या अधिक क्लेशदायक होईल.**

एका उभरत्या अर्थव्यवस्थेमध्ये सर्वसमावेशकता हवी. अशा व्यवस्थेमध्ये समाजातील सर्वच्या सर्व घटकांना समाविष्ट करुन घ्यायला हवे. गेल्या सत्तर वर्षांच्या कालावधीमध्ये भारताने जाणीवपूर्वक आर्थिक सुबत्ता आणण्याचे प्रयत्न केले. तशा संधी उपलब्ध करुन दिल्या. समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला. असे असून सुध्दा अजून खूप काही करणे बाकी आहे. तळागाळातील वंचिताना समाविष्ट करुन त्यांचा जीवनस्तर उंचावणे बाकी आहे. त्यात आर्थिक आणि सामाजिक प्रवाहात सामील करुन घेणे गरजेचे आहे.

अनेक वेळा असे दिसून आले आहे की अल्पसंख्यांक समुदाय, दिव्यांग व्यक्ती आणि महिला यांच्यामध्ये त्यांच्यातील न्यूनगंडामुळे परकेपणाची भावना निर्माण होते. त्याच प्रमाणे सशक्त, सुदृढ समाजाला देखील निकृष्ट जीवन कंठावे लागत आहे. समाजातील विविध घटकांमध्ये भेदभाव वाढीला लागला आहे. त्याचप्रमाणे वंचितांच्या लोकसंख्येचा विचार करता समाजातील लिंगभिन्नता आणि अकुशलता यांमुळे विघटित झालेला समाज जर बाजूला काढला तर ही संख्या अधिक क्लेशदायक होईल. आर्थिक प्रगती आणि आर्थिक स्वातंत्र्य यांना बराच काळ लोटला असला तरी स्त्रोत्रांच्या समान वाटप आणि समान संधीकरिता सर्वसमावेशक विकास गाठण्यास अपूरे ठरले आहे.

**अनुकुल सामाजिक समज :-**

प्रथम या संस्थेने नीती आयोगाकरिता एक अभ्यास अहवाल तयार केला होता. त्या अहवालात असे म्हटले आहे कि एकूण प्रतिसाद दिलेल्या जनतेपैकी ७० टक्के जनता निमशहरी किंवा ग्रामीण आहे आणि स्वयंरोजगार स्थापण्यास प्रोत्साहित झालेली आहे. हे लोक पूर्ण क्षमतेने त्यांच्या उद्योजकतेच्या बळावर उद्योग स्थापू इच्छितात (इंडियन एक्सपेस २०१६). यातून एक सिध्द होणारी एक नवी गोष्ट अशी की देशातील तरुण आणि त्यातही विशेषत: ग्रामीण भागातील तरुण नवीन उद्योग स्थापून बेरोजगारी व गरिबीवर मात करु इच्छित आहेत. भारत हा धाडसी युवा लोकांचा तथा उत्साहितांचा देश आहे. येथे आपल्याला असेही लक्षात येईल की हे तरुण कमकुवत समाजातून आलेले आहेत. त्यातही असा ग्रामीण समाजातून, तेथे स्त्रोतांची कमतरता आहे. परंतु त्यांच्यामधील उद्योगशीलता अति प्रेरित असून यशस्वी उद्योग स्थापून ते कार्य सिध्दीला नेण्यास ते सिध्द आहेत. नवीन उत्पादनाचा शोध आधुनिक कार्यपध्दतीने सामाजिक प्रश्नांची उकल आणि अविरत काम करण्याचे धोरण युवकांना प्रेरित करीत आहे. समाजाचे ते प्रेरक दूत म्हणून काम करुन इच्छितात आपल्याला फक्त


एवढेच करायचे आहे की त्यांना हवा तसा शाश्वत पाठिंबा देणे सुयोग्य मार्गदर्शन करणे आणि नवीन उद्योगासाठींच्या त्यांच्या कल्पना उचलून धरणे या माध्यमातून आपण यशस्वी उद्योजक घडवू शकू. जगभरातील उद्योग चक्रांचा अभ्यास करणारी सर्वात मोठी संस्था जेम अर्थात द ग्लोबल एंटरप्रिनियरशिप मॉनिटर यांनी २०१६-१७ च्या अहवालात असे नमुद केले आहे की, उद्योग उभारणीचा वेग जो २०१५-१६ साली ९% इतका होता तो सन २०१६-१७ साली १४.९ इतका झाला आहे. यात आश्चर्याची बाब अशी की उद्योगाबद्दलच्या भीतीचा आलेख (फियर ऑफ फेल्युअर) २०१५-१६ च्या ४४% वरुन सन २०१६-१७ मध्ये ३७.९% इतका घसरला आहे. जेमचा २०१६-१७ चा अहवाल असे सांगतो की प्रौढापैकी ४४% वयस्क, उद्योग सुरु करण्याच्या चांगल्या संधीची वाट पहात असतात. तर ४४% प्रौढांना उद्योग सुरु करण्याची क्षमता असते. एस्वे इंटरप्रिनरशिप इंडिया या संस्थेचा २०१५चा अहवालात असे दिसून आले आहे कि, प्रतिसाद देणाऱ्या २०% सर्वेक्षणातील व्यक्ती स्वत:चा उद्योग सुरु करण्याचा विचार करतात (हे सर्वेक्षण १०७६८ व्यक्तींमधले आहे. २१ राज्यातील या सर्वेक्षणांतून, उत्पन्न , शैक्षणिक पार्श्वभूमी तसेच स्त्री-पुरुष यांचा विचार करण्यात आला.) वरील दोन्ही अहवालांचा अभ्यास केला असता-असा निष्कर्ष निघतो की, उद्योगांबद्दलची आत्मियता भविष्याचा विचार करता चांगलीच आश्वासक आहे. त्याच प्रमाणे उद्योजगतेच्या विकासाच्या दृष्टीतून सुलक्षणच आहे.

**आव्हाने आणि संधी :**

वंचितांच्या मार्गातील प्रमुख अडथळा हा शिक्षणाचा अभाव आणि अकुशलता हा आहे. त्याचा परिणाम हा आत्मविश्वासातील कमतरता, आणि जबाबदारी झेलण्यासाठी असलेला कमकुवतपणा हा होय. ही बाब विशेषकरुन महिलांमध्ये अधिक प्रमाणात हे जाणवते. यावर मात करता येवू शकते. त्याकरिता उद्योगांसाठी प्रेरित करणे आणि योग्य ते प्रशिक्षण पुरवणे हा तो मार्ग होय. उद्योगांसाठीच्या कार्यशाळा आणि बैठका या काळाच्या कसोटीवर उतरण्याऱ्या आहेत. तरुणांमध्ये या मुळे आत्मविश्वास निर्माण होत आहे. नियोजनबध्द धोरणामधून ज्यामध्ये उद्योगधंदयाबद्दल प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सल्लामसलत करुन वंचित समाजाला स्वयंरोजगाराच्या नवनविन संधी उपलब्ध करुन देता येतील.

आर्थिक कमतरता, धोका पेलण्याचे भय, कार्यकारी साक्षरतेचा अभाव ही उद्योग क्षेत्रापासून स्वत:ला लांब ठेवण्याची प्रमुख कारणे आहेत. या पुढे जावून संशोधनातून असेही सिध्द झाले आहे की, कच्च्या मालाचा अपूरा पुरवठा, उद्योग भांडवालाची कमतरता, अपूरी पणन व्यवस्था, ही ग्रामीण उद्योजकतेमधील अडथळ्यांची कारणे आहेत. याशिवाय शिक्षणाच्या अभावामुळे ग्रामीण उद्योजक उपजत हुशारी आणि स्पर्धात्मकता आदी मध्येही मागे पडतात. त्याशिवाय त्यांना शहरांप्रमाणे मिळणाऱ्या सुविधाही मिळत नाहीत.(सक्सेना २०१२ पान २४) आदि कारणांमुळेच उद्योगव्यवसाय सुरु करण्याऐवजी स्वयंरोजगार प्राप्त करण्याऐवजी स्वत:ला रोजगाराच्या कामी जुंपून घेतात. ग्रामीण भारताकरिता वरील सर्व संदर्भ लक्षात घेता त्यातील आव्हाने आणि संधी याचा विचार करता, ग्रामीण भारतात उद्योग सुरु करण्यापूर्वी हे सारे संदर्भ लक्षात घ्यायला हवेत. ग्रामीण भारतातील उद्योग वाढींचे विकास कार्यक्रम ठरविताना तेथील नैसर्गिक स्थिती त्या

**उद्यमशीलतेच्या विकासाच्या माध्यमातून वंचितांसाठी सामाजिक आणि आर्थिक प्रगतीची दारे खुली करणे**



त्या भागातील गरजा यांचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर, बाजारातील अंतर्गत स्थिती आणि धोरणात्मक चौकट यांचाही विचार होणे आवश्यक आहे.

१९९० नंतरच्या आर्थिक बदलानंतर भारतामध्ये तुरळक प्रमाणात का होईना दलित उद्योजकांची सुरुवात झाली. परंतु प्रातिनिधिकदृष्टया उद्योगांची मालकी आणि त्यापासून निर्माण होणारे रोजगार याचे प्रमाण खूपच, निम्न स्तरावर असल्याचे जाणवते. (अय्यर खन्ना आणि वर्षांने २०११) अनुसूचित जातीतील उद्योजकांनी उभारलेल्या उद्योगामध्ये काम करणाऱ्यांचे प्रमाण कमी दिसते. अय्यर इत्यादीनी याची नोंद घेतली आहे. अनुसुचित जातीतील मालक अडथळयांवर मात करण्यात कमी पडत आहेत. इतर मागासवर्गीयांच्या ते पुढे जाऊ शकले नाहीत. त्याचप्रमाणे अनुसुचित जातीतील लोकांना व्यवसायवृध्दी करणे कठीण जात आहे. कारण स्पर्धात्मकदृष्टया त्यांची क्षमता दिसून येत नाही. त्याबरोबर हे लक्षात घेतले पाहिजे की इथेही त्यांना भेदभावांचा सामना करावा लागतो. दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री (DICCI) यांनी तळागाळातील वंचितातील तरुणांसाठी फार मोठया प्रमाणात पुढाकार घेतलेला आहे. वरील सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी केंद्रशासनाने खालील विधायक धोरणांसाठी पुढाकार घेतलेला आहे.

### अ) स्टार्ट अप इंडीया कार्यक्रम

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून केंद्र शासनाने १००० कोटी रुपयांचे संकलन केले आहे. हा निधि ४ वर्षात खर्च केला जाणार आहे. ही कृतीयोजना असन उदयोन्मुख उद्यमांना आश्वस्थ करणारा हा निधी आहे. SIDBI द्वारा या निधीचे वाटप होईल. सिडबी ला ६०० कोटी रुपये सुपर्त केले असून त्यापैकी ९०.६२ कोटी रुपयांचे प्रत्यक्ष वाटप देखील झाले आहेत. या मध्ये १७ पर्यायी गुंतवणुक निधीचा समावेश आहे. ७५ स्टार्ट अपस् युनिट साठी ३३७.०२ कोटींच्या निधीचा मार्ग मोकळा करुन ठेवलेला आहे. अशाच प्रकारच्या अहवालानुसार ७४ प्रकल्पांना आयकर कायदयाच्या कलम ८० च्या अंतर्गत सुट देण्यात आली आहे. या साऱ्या तरतुदी आपण केल्यामुळे स्टार्ट अप योजनेला उभारी येणार असून नवचैतन्य निर्माण होणार आहे. देशभर यामुळे उद्योगाचे वातावरण निर्माण होईल. परंतु यातील

**अनुसूचित जातीतील उद्योजकांनी उभारलेल्या उद्योगामध्ये काम करणाऱ्यांचे प्रमाण कमी दिसते. अय्यर इत्यादीनी याची नोंद घेतली आहे. अनुसुचित जातीतील मालक अडथळयांवर मात करण्यात कमी पडत आहेत. इतर मागासवर्गीयांच्या ते पुढे जाऊ शकले नाहीत. त्याचप्रमाणे अनुसुचित जातीतील लोकांना व्यवसायवृध्दी करणे कठीण जात आहे. कारण स्पर्धात्मकदृष्टया त्यांची क्षमता दिसून येत नाही. त्याबरोबर हे लक्षात घेतले पाहिजे की इथेही त्यांना भेदभावांचा सामना करावा लागतो.**

महत्वाचा मुद्या असा आहे की, देशातील नवतरुणांना यामुळे अधिक प्रोत्साहन मिळून ते सबलतेच्या दिशेन प्रवास करतील. असे असले तरी गेल्या दोन वर्षाच्या काळात यातील अत्यल्प निधीचा वापर झालेला दिसतो आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रोत्साहीत झालेल्यांसाठी एक आभासी उद्योजक (VIRTUAL HUB) केंद्र स्थापले गेले आहे. जेथे त्यांना या संदर्भातील संपूर्ण माहीती मिळेल. हे एक पोर्टल आहे. या पोर्टलच्या आधारे ७५६४३ शंकांचे समाधान झाल्याची प्राथमिक माहीती आहे. या पोर्टलसचे १५००० नोंदणीकृत सदस्य आहेत. शिका आणि विकास करा या कल्पनेचे एक मोडयुल या मध्ये आहे. या मोडयुल व्दारे १८९००० नुकत्याच अस्तित्वात आलेल्या उद्योजकांनी माहीती घेतली आहे. या योजनेअंतर्गत घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे यात शंका नाही परंतु परिणाम मात्र अत्यल्प दिसून येतो. एक बाब मात्र नमुद करायला हवी, ती म्हणजे विविध शासकीय खात्यानी या संदर्भात योग्य ती पावले उचलली असून उद्योजकांसाठी योग्य ते वातावरण निर्माण करता येईल. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न चालू आहेत.

### ब) स्टँड अप इंडीया पुढाकार -

उद्योग क्षेत्राला प्रोत्साहित करणारी ही एक योजना असून या मोहीमेच्या पुढाकारातुन देशभरातील १.२५ लाख बँक शाखांमधुन अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व महिला यांना मुख्यत्वे निधी वितरीत करण्याचा शासनाचा मानस आहे तथा देशामध्ये २.५० लाख नवे उद्योजक तयार करणे असा आहे. या मागची भुमिका अशी कि १० लाखा पासून १०० लाख पर्यंतचे कर्ज वितरण, बँकांच्या शाखांमधुन एकातरी अनुसुचित जाती/ जमाती किंवा महीला यांना वितरीत करावे. अशा लोकांमध्ये असलेल्या उद्योजकतेला प्रोत्साही करण्यासाठी, स्टँड-अप कार्यक्रम राबवला जात आहे. ही योजना, जुन्या व नव्या योजनांमधील दुवा आहे. समाजवंचित घटकांपर्यंत पोहोचण्याचा मानस असून मनोऱ्यातील शेवटच्या माणसाचा विचार यामध्ये केला आहे. सुमारे २.५ लाख लाभार्थींना त्याचा फायदा होईल. योजना तयार करताना याचा मुळे उद्देश हाच होता की रोजगार निर्मिती सह आर्थिक सबलीकरणातून तळागाळातील वंचिता

पर्यंत पोहोचता यावे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ६०७९५ अर्ज प्राप्त झाले आहेत. याव्दारे १३२१७ कोटींचे कर्ज वितरीत होऊ शकते. राष्ट्रीय दृष्टया विचार करता १०३ बँकाच्या १३३२३६ शाखांमधून स्टँड अपची योजना कार्यरत आहे. त्याच प्रमाणे या योजनेकरिता १००८४ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असुन त्यापैकी २९०८ कर्जाकरिता पात्र ठरले आहेत.

**क) मुद्रा योजना (प्रधानमंत्री मुद्रा योजना, एपीएमवाय)**

स्टँड अप योजनेचाच मुद्रा योजना हा एक भाग आहे. मुद्रा हे एक कार्यकारी मंडळ आहे. लघुविकास घटक आणि पुन:र्वितपुरवठा हा या मंडळांचा मूळ उद्देश्य आहे. देशाअंतर्गत लहान लहान उद्योग घटकांना वित्तपुरवढा करणाऱ्या आर्थिक संस्थाना वित्त सहाय्य करणे हा मुद्रा योजनेचा उद्देश आहे. लघु घटकांसाठी 'क्रेडीट गॅरंटी फंड' सुरु करण्यात आला होता याव्दारे लघु घटकांना वित्त पुरवठा करणाऱ्या बँका एनबी एफसी, एमएफआय, आणि इतर वित्त संस्था यांना पतपुरवठा करण्यासाठी या निधीचा उपयोग केला जातो. शिशु, किशार आणि तरुण अशी वर्गवारी लघु घटकांसाठी करण्यात आली असुन त्या-त्या उद्योगाच्या प्रगती प्रमाणे विविध पातळीवर आर्थिक गरजा पाहून कर्ज पुरवठा केला जातो. प्रधान मंत्री मुद्रा योजने अंतर्गत १२ कोटी लाभार्थीना ६ ट्रीलीयन कर्जाचे वाटप झाले आहे. या १२ कोटी लाभार्थी पैकी २८% म्हणजे ३.२५ कोटी लाभार्थी हे पात्र ठरलेले उद्योजक होते. यातील प्रथमत: नोंद घेण्यासारखा भाग म्हणजे ७४% लाभार्थी म्हणजे सुमारे ९ कोटी लाभार्थी या महिला उद्योजक होत्या. त्याचप्रमाणे ५५% लाभार्थी हे अनुसुचित जाती, जमाती तसेच इतर मागासवर्गीय होते. गेल्या तीन वर्षाच्या काळात तळागाळातील सामान्य जनतेचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न झाला आहे. असे असुनही अजून बरेच कार्य करणे बाकी आहे.

योग्य तो पाठपुरवठा आणि उद्योग शाळेसाठी सुयोग्य वातावरण यामुळे शाश्वत उद्दीष्ट गाठता येईल. शासनाला अधिकाधिक रोजगार निर्मितीकरता उद्योगांचा आलेख उंचावता येईल.

**स्टार्ट अप व्हिलेज एंटरप्रिनशिप प्रोग्रॅम (एसव्हीइपी)**

सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ग्रामीण उद्योग कार्यक्रमाची घोषणा केली होती. ग्रामीण तरुणांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून संधी उपलब्ध करुन देणे हा याचा मूळ उद्देश होता. राज्यशासनाचे आर्थिक पाठबळ घेवून उद्योगांसाठी त्यांना प्रेरित करणे हे अपेक्षित होते. ग्राम उद्योगाची आखणीच अशी केली आहे की, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळावी आणि सूक्ष्म वित्त योजनेच्या माध्यमातुन आर्थिक समावेशन व्हावे आणि ग्रामीण समाजाला आर्थिक स्वयंपूर्तता यावी हा उद्देश पूर्ण होईल. केंद्र शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाच्या अखत्यारीत 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनाधार' कार्यक्रम राबवला जातो. या कार्यक्रमाकडून याची अंमलबजावणी व्हावी असे प्रथमत: ठरेलेले होते. सन २०१५ ते २०१९ या कालावधीत या योजनेने आपले योगदान द्यायला सुरवात देखील केली आहे. २४ राज्यांमधील १२५ विभागाव्दारे १.८२ लाख गावात ३.७८ लाख गामीण रोजगार निर्मितीची शक्यता आहे. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी रुपरेखा आखावी लागेल. शाश्वत ग्रामिण उद्योगशीलतेसाठी विभागवार अंमलबजावणी करणे ही गरजेचे आहे.

**स्टँड अप योजनेचाच मुद्रा योजना हा एक भाग आहे. मुद्रा हे एक कार्यकारी मंडळ आहे. लघुविकास घटक आणि पुन:र्वितपुरवठा हा या मंडळांचा मूळ उद्देश्य आहे. देशाअंतर्गत लहान लहान उद्योग घटकांना वित्तपुरवढा करणाऱ्या आर्थिक संस्थाना वित्त सहाय्य करणे हा मुद्रा योजनेचा उद्देश आहे. लघु घटकांसाठी 'क्रेडीट गॅरंटी फंड' सुरु करण्यात आला होता या व्दारे लघु घटकांना वित्त पुरवठा करणाऱ्या बँका एनबी एफसी, एमएफआय, आणि इतर वित्त संस्था यांना पतपुरवठा करण्यासाठी या निधीचा उपयोग केला जातो.**

**निष्कर्ष :**

समाजातील वंचित दीन, दुबळ्या, सामाजिक दृष्टया मागासलेल्या वर्गातील उद्योजकतेला वाव देऊन त्यांच्या क्षमतांचा विकास हा बहूआयामी प्रगतीच्या दृष्टीने टाकलेले पाऊल होय. (त्यातही निम्नजातीच्या समाजातील दुर्बल स्त्रिया याना संधी देणे ही महत्वाची बाब आहे.) हे एक हत्यार असून सामाजिक दुजाभावात याचा वापर करता येईल. सातत्यपूर्ण उद्योजकतेचा विकास, वेळोवेळी केलेले परिक्षण, सुक्ष्म उद्योजकतेसाठी एकात्मिक धोरण, सुक्ष्मवित्त पुरवठा करुन स्वयंपूर्णता, त्याचप्रमाणे स्वयं सहाय्यता गट स्थापन करुन मागासवर्गीय जनतेला प्रोत्साहीत करुन उद्योगांमध्ये स्पर्धात्मकता आणता येईल. हेच आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देवू शकतील. त्याही पूढे जावून रोजगार प्रशिक्षण आणि जीवनाधारासाठीची कौशल्ये हा दुहेरी उद्देश साध्य करुन उद्योगांना प्रोत्साहित करुन एका बाजुला रोजगार निर्मिती साध्य करता येईल तर दुसऱ्या बाजूला न वापरात आलेल्या स्त्रोतांचा शोध घेणे आणि नवनविन संधी शोधणे शक्य होणार आहे.

■■■

*लेखक भारतीय उद्योजगता विकास संस्थेचे संचालक आहेत.*

*ई मेल: sunilshukla@ediindia.org*

विशेष लेख

# आर्थिक सर्वसमावेशकतेतून कमकुवतांचे सक्षमीकरण

- डॉ. मुनीराजू- एसबी



**सुरूवातीच्या टप्प्यात बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकांच्या माध्यमातून प्रमुख क्षेत्रात कर्जसुविधा सुरू करण्यात आल्या. बँकांनी सरकारच्या धोरणांना मूर्त स्वरूप देण्यासाठी योजना राबवल्या. प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना यात करण्यात आली. ग्रामीण भागातील लोकांना बँकिग व्यवस्थेत जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. बँक सेवा त्यांच्या दारात पोहोचली. क्षेत्रीय सेवा दृष्टिकोन अंमलात आणण्यात आला. स्वमदत गट या कार्यक्रमांना जोडण्यात आले. त्यातून गरजू लोकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत झाली.**

भारतीय राज्यघटनेच्या कर्त्यांनी आधीच विचार करून सामाजिक सुरक्षा, आर्थिक सुरक्षा यावर पुरेशा व अनिवार्य तरतुदी केल्या आल्या आहेत. त्यानंतर अनेक सरकारांनी ही धोरणे पुढे नेली. वेळोवेळी धोरणात अभिनव बदल करण्यात आले. गरिबांना इतर समाजाच्या बरोबरीने आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. विविध सरकारांनी त्यासाठी घटनेत व कायद्यांमध्ये बदल केले. समाजातील शेवटच्या माणसाचे आर्थिक व सामाजिक हित जपण्यासाठी प्रयत्न केले गेले.

सुरूवातीच्या टप्प्यात बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकांच्या माध्यमातून प्रमुख क्षेत्रात कर्जसुविधा सुरू करण्यात आल्या. बँकांनी सरकारच्या धोरणांना मूर्त स्वरूप देण्यासाठी योजना राबवल्या. प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना यात करण्यात आली. ग्रामीण भागातील लोकांना बँकिग व्यवस्थेत जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. बँक सेवा त्यांच्या दारात पोहोचली. क्षेत्रीय सेवा दृष्टिकोन अंमलात आणण्यात आला. स्वमदत गट या कार्यक्रमांना जोडण्यात आले. त्यातून गरजू लोकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत झाली. त्यांना त्यांच्या अभिनव कल्पना अंमलात आणता आल्या. त्यातून फायद्याचे आर्थिक व्यवहार शक्य झाले. समाजातील गरिबांना आर्थिक सेवा मिळाव्यात यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अनेक उपाययोजना केल्या. गरजू कमी उत्पन्न व कमकुवत गटांना वेळच्यावेळी कर्ज किफातशीर दराने उपलब्ध करून देणे आवश्यक असते. त्यातून आर्थिक सर्वसमावेशकतेची प्रक्रिया पूर्ण होते. सर्व समावेशक वाढ व विकास यासाठी आर्थिक सर्वसमावेशकता आवश्यक असते. यात सरकार, रिझर्व्ह बँक, राष्ट्रीयकृत बँका, शेड्यूल्ड बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सूक्ष्म वित्त संस्था यांचा सर्वसमावेशक वाढीतील अडथळे दूर करून आव्हाने स्वीकारण्यात मोठा वाटा आहे. सर्वसमावेशकतेतील पुरवठ्याच्या बाजूने असलेल्या अडचणी यातून दूर झाल्या.

जागतिक पातळीवर अनेक देश आता आर्थिक सर्वसमावेशकतेवर काम करीत आहेत त्याचा अर्थ सर्वंकष आर्थिक वाढ असा अपेक्षित आहे. त्यात देशातील लोकांना त्यांची आर्थिक पात्रता सुधारण्यासाठी आर्थिक साधने उपलब्ध होतात. त्यातून देशही आर्थिक उन्नतावस्थेकडे वाटचाल करतो. आर्थिक सर्वसमावेशकता हा केंद्र सरकारच्या धोरणातील एक महत्वाचा मुद्दा असून त्यात आर्थिक समानतेवर आधारित समाज निर्माण करणे महत्वाचे आहे. याचे कारण म्हणजे भारतातील बरीच जनता ही आर्थिक पातळीवर असुरक्षित आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी ६४९४८१ खेडी बँक सेवेने जोडली

गेली आहेत. मोठ्या लोकसंख्येसाठी ही सेवा आवश्यक होती.

### आर्थिक सर्वसमावेशकतेतील अडचणी

देशात अनेक कायदे, धोरण, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे, बँकांच्या योजना असूनही आर्थिक सर्वसमावेशकतेत अडचणी आहेत. भारती डी. बी (२०१६) यांनी केलेल्या संशोधनानुसार मागणीच्या बाजूने विचार करता जागरूकतेचा अभाव, कमी उत्पन्न व दारिद्र्य हे काही अडथळे आर्थिक सर्वसमावेशकतेत आहेत. पुरवठ्याच्या बाजूने विचार करता बँक शाखांची समीपता, वेळा, किचकट कागदपत्रे, प्रक्रिया, बँक कर्मचाऱ्यांचा दृष्टिकोन व भाषा हे मुद्दे विचारात घ्यावे लागतात, रंजनी व बापट (२०१५ म) मध्ये करण्यात आलेल्या संशोधनानुसार कागदपत्रांची पूर्तता, कर्ज मंजुरीच्या प्रक्रिया, लवचिक नसलेल्या परतफेड अटी, गरजांबाबत संज्ञापनाचा अभाव, कमी कर्जासाठी बँकांकडे न जाण्याची वृत्ती असे अनेक मुद्दे आर्थिक समावेशकतेच्या आड येतात.

चरण सिंह (२०१४ ) यांनी केलेल्या संशोधनानुसार रिझर्व्ह बँक व भारत सरकार यांनी आखलेल्या योजनांचे समाधानकारक परिणाम अजून दिसलेले नाहीत. ग्राहक व तंत्रज्ञान याच्याशी निगडित प्रश्नांचा त्यांनी यात विचार केला आहे. ग्राहकांशी संबंधित व तांत्रिक असे त्यांनी समस्यांचे वर्गीकरण केले आहे. मोबाईल क्रमांक नोंदणी व पिन नंबरची निर्मिती या यातील दोन महत्वाच्या अडचणी तर आहेतच शिवाय आर्थिक निरक्षरता हाही एक मुद्दा आहे. संपर्क मार्ग, मोबाईल सेवा पुरवठादारांशी समन्वय हे बँकांसाठी अडचणीचे मुद्दे आहेत. आर्थिक सेवांची कमी पोच, उद्योग प्रतिनिधींची कमी कार्यक्षमता या मुद्द्यांचा यात समावेश होतो. त्यामुळे आर्थिक समावेशकतेच्या यशात काही अडचणी आहेत.

राजीव गुप्ता (२०१४) व सचिंद्र जी.आर (२०१३) यांनी त्यांच्या संशोधनात म्हटले आहे की, मध्यम व कमकुवत शेतकरी, भूमीहीन शेतमजूर, स्वयंरोजगार असलले लोक, शहरी झोपडपट्टीवासीय, असंघिटत क्षेत्रातील उद्योग, स्थलांतरित, वांशिक अल्पसंख्याक, सामाजिक वंचित गट , ज्येष्ठ नागरिक, महिला हे या सगळ्या आर्थिक सर्वसमावेशकतेतून बाहेर आहेत. यातील आव्हाने स्पष्ट

**चरण सिंह (२०१४) यांनी केलेल्या संशोधनानुसार रिझर्व्ह बँक व भारत सरकार यांनी आखलेल्या योजनांचे समाधानकारक परिणाम अजून दिसलेले नाहीत. ग्राहक व तंत्रज्ञान याच्याशी निगडित प्रश्नांचा त्यांनी यात विचार केला आहे. ग्राहकांशी संबंधित व तांत्रिक असे त्यांनी समस्यांचे वर्गीकरण केले आहे. मोबाईल क्रमांक नोंदणी व पिन नंबरची निर्मिती या यातील दोन महत्वाच्या अडचणी तर आहेतच शिवाय आर्थिक निरक्षरता हाही एक मुद्दा आहे.**

करताना ते म्हणातात की, १) प्रतिनिधी व बँकेची एक संस्था म्हणून जोखीम २) वस्तूंच्या खपानुसार खर्चाची विभागणी ३) बंद पडलेली खाती ४) पुरेशी जागरूकता नसणे ५) पायाभूत सुविधांचा अभाव ६) कमी साक्षरता ७) बचतीच्या सवयींचा अभाव ८) परतफेडीचे प्रश्न ९) लहान रकमांचे व्यवहार, जास्त रकमांच्या व्यवहारांचा खर्च १०) शाश्वततेचा मुद्दा.

आंशू (२०१४) यांनी म्हटल्याप्रमाणे ग्रामीण भागात बँक शाखांचा प्रसार अवघड आहे. कारण बँक व्यवहारांचा खर्च अधिक असतो. व्यवहार प्रतिनिधी प्रारूप हे ग्रामीण भागापुरते मर्यादित आहे. आर्थिक साक्षरता नसणे व आर्थिक उत्पादनांचे वाईट पद्धतीचे विपणन त्यामुळे अनौपचारिक कर्ज स्त्रोतांबबातची गरिबांना असलेली माहिती अपुरी असते. अनौपचारिक कर्जाच्या साधनांमुळे लोक बँकांकडे कर्ज घ्यायला जात नाहीत कारण सावकार त्यांना सहज कर्ज देतो. गुंतागुंतीच्या आर्थिक सेवा बाजारपेठेत अनेक उत्पादने आहेत पण त्यांच्या वापराबाबत अज्ञानच आहे.

राव एस.के (२०१०) यांनी अभ्यासातून असे सुचवले आहे की, सर्वसमावेशक विकास हा १९६९ मध्ये झालेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा मोठा परिणाम आहे. त्यांनी रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे असे म्हटले आहे की, बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंगचा प्रसार ग्रामीण भागात झाला. जिथे बँका नव्हत्या तिथे त्या झाल्या. बँकाचा मोठा शाखा विस्तार झाला असला तरी आर्थिक समावेशकतेचे उद्दिष्ट हवे तेवढे मात्र साध्य झालेले दिसत नाही. देशात पूर्ण आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी नवीन मार्ग शोधण्याची गरज आहे.

बडाजेना एस.एन व प्रा, गुंडीमेडा एच (२०१०) यांनी केलेल्या अभ्यासात स्वमदत गटांचा २००८ च्या काळात सोळा राज्यातील आर्थिक सर्वसमावेशकतेशी असलेला संबंध तपासण्यात आला. औपचारिक बँकिंग प्रणाली उपलब्ध असूनही मूलभूत आर्थिक सेवा समाजाच्या मोठ्या भागापर्यंत पोहोचलेल्या नाहीत.

सध्याची परिस्थिती- भारत सरकार आर्थिक सर्वसमावेशकतेचे सर्व पैलू हाताळत आहे. गेल्या पाच वर्षात

परिस्थिती खूप बदलली आहे. सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणात सुधारणा झाली आहे. नागरी सहभागात्मक विकास प्रारूपाकडे आपण वळलो आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या आर्थिक प्रणालीत वेगाने बदल घडवून आणण्याचा पुनरूच्चार केला आहे. तसे वचनच त्यांनी देशाला दिले आहे.

**आर्थिक सर्वसमावेशकता व सरकार**

राष्ट्रीय अनुसूचित जाती अर्थ व विकास महामंडळ (एनएससीएफडीसी)- एनएससीएफडीसी ही संस्था भारत सरकारने १९८९ मध्ये सुरू केली होती. ना नफा ना तोटा तत्वावर कलम २५ अन्वये कंपनी कायदा १९५६ नुसार तिला कंपनीचा दर्जा देण्यात आला. या संस्थेचा व्यापक उद्देश. अनुसूचित जाती जमातीच्या दुप्पट दारिद्र्य रेषेखालील लोकांना आर्थिक सक्षमीकरणासाठी अर्थपुरवठा, निधीचे वाटप किंवा उपलब्धता हा होता. एनएससीएफडीसी या संस्थेने मध्य मुदतीची. सूक्ष्म वित्त, शिक्षण व व्यावसायिक शिक्षण कर्जे सवलतीच्य दरात दिली. राज्यातील संस्था व प्रादेशिक ग्रामीण बँका यांच्या माध्यमातून त्यांना पुनर्वित्ताची सोय करून देण्यात आली. यात प्रोत्साहनपर योजनात कौशल्य विकास व विपणन यासाठी मदत देण्यात आली. ३१ मार्च २०१५ अखेरीस एनएससीएफडीसीने एकूण ३०१९.८७ कोटींची कर्जे राज्य वितरण संस्थांना दिली. त्यातून अनुसूचित जाती जमातीच्या डीपीएल (डबल पॉव्हर्टी लाइन) खालील ९४१०३४ लोकांना लाभ देण्यात आला.

राष्ट्रीय अनुसूचित जमाती अर्थ व विकास महामंडळ (एनएसटीएफडीसी)- ही संस्था २००१ मध्ये सुरु करण्यात आली तिचे स्वरूप सरकारी कंपनी असेच होते. कंपनी कायदा १९५६ अन्वये कलम २५ अनुसार कंपनीस परवाना देण्यात आला. यात अनुसूचित जमातीच्या लोकांना आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी कर्जे देण्यात आली.

एनएसटीएफडीसीच्या वतीने स्वमदत गटांना सहाय्य केले जाते. २५ लाख रूपयांच्या स्वमदत गटाच्या प्रकल्पांना नव्वद टक्के आर्थिक मदत दिली जाते. प्रत्येत सदस्यामागे पन्नास हजार रूपयांचे कर्ज वितरित केले जाते. आदिवासी कारागीरांना प्रकल्पाशी निगडित सामुग्री खरेदीसाठी

**राष्ट्रीय मागास वर्ग वित्त व विकास महामंडळ (एनबीसीएफडीसी) - ही संस्था भारत सरकारने कंपनी कायदा १९५६ च्या कलम २५ नुसार १३ जानेवारी १९९२ रोजी स्थापन केली असून तिचे अधिकृत भागभांडवल हे १५०० कोटी रूपये आहे. महामंडळाला ११२४ कोटींचे खेळते भांडवल २०१७ पर्यंत देण्यात आले. मागास जातींचा विकास व गरीब लोकांचा कौशल्य विकास हा यातील हेतू आहे. महामंडळाने ४६ राज्य संस्थांना विविध राज्यात हाताशी धरून ३१ मार्च २०१७ अखेर ३५७५.५२ कोटी रूपयांचे वाटप केले असून त्याचा लाभ इतर मागासवर्गीयातील २३००३६३ जणांना झाला आहे.**

खेळते भांडवल म्हणून हे पैसे उपयोगी पडतात. योग्य त्या प्रकल्पांना युनिटमागे २५ लाखांचे कर्ज देण्यात येते त्यात प्रकल्पाच्या नव्वद टक्के अर्थसहाय केले जाते. उर्वरित रक्कम ही अनुदाने, प्रवर्तकांचे योगदान, अतिरिक्त पैसे यातून भरून काढली जाते. पाच लाखांपर्यंत व्याजदर हा ६ टक्के तर १० लाखांसाठी ८ टक्के १० लाखांच्या पुढे १० टक्के असतो. आदिवासी महिला सशक्तीकरण योजना (एएमएसवाय) योजनेत अनुसूचित जमातीच्या महिलांचे सक्षमीकरण केले जाते एनएसटीएफडीसी ही संस्था १ लाखांपर्यंतच्या प्रकल्पात नव्वद टक्के कर्ज ४ टक्क्यांनी देते. एनएसटीएफडीसी या संस्थेने आतापर्यंत १२ वर्षात म्हणजे ३१ मार्च २०१७ अखेर १६५४.९२ कोटी रूपये कर्ज वितरित केले आहे. एनएसटीएफडीसी अनुसूचित जमातींच्या कौशल्य विकासासाठी आदिवासी शिक्षा ऋण योजना (एएसआरवाय), जनजागृती यासारख्या योजना आणल्या.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एनएसकेएफडीसी)- एनएसकेएफडीसी या संस्थेची स्थापना कंपनी कायदा १९५६ च्या कलम २५ नुसार २४ जानेवारी १९९७ रोजी झाली असून ती सरकारी मालकीची आहे. त्यात भारत सरकारचे सहाश कोटींचे भागभांडवल आहे. एनएसकेएफडीसीने राज्य संस्थांच्या मार्फत तसेच प्रादेशिक ग्रामीण बँका व राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून लाभार्थींना मदतीचे वाटप केले. राज्यसंस्थांनी त्यात जिल्हा समाज कल्याण खात्याची मदत घेतली. साधारण योजनेत १५ लाख तर स्वच्छता उद्यमी योजनेत २५ लाखांपर्यंत कर्जे देण्यात आली.

राष्ट्रीय मागास वर्ग वित्त व विकास महामंडळ (एनबीसीएफडीसी) - ही संस्था भारत सरकारने कंपनी कायदा १९५६ च्या कलम २५ नुसार १३ जानेवारी १९९२ रोजी स्थापन केली असून तिचे अधिकृत भागभांडवल हे १५०० कोटी रूपये आहे. महामंडळाला ११२४ कोटींचे खेळते भांडवल २०१७ पर्यंत देण्यात आले. मागास

जातींचा विकास व गरीब लोकांचा कौशल्य विकास हा यातील हेतू आहे. महामंडळाने ४६ राज्य संस्थांना विविध राज्यात हाताशी धरून ३१ मार्च २०१७ अखेर ३५७५.५२ कोटी रूपयांचे वाटप केले असून त्याचा लाभ इतर मागासवर्गीयातील २३००३६३ जणांना झाला आहे.

राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्त व विकास महामंडळ (एनएमडीएफसी)- कंपनी कायदा १९५६ च्या कलम २५ अनुसार ३० सप्टेंबर १९९४ रोजी ही संस्था स्थापन झाली असून अल्पसंख्याकांना कमी व्याजदरात स्वयंरोजगार व उत्पन्नाची साधने पुरवणे हा त्याचा हेतू आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायदा १९९२ नुसार मुस्लिम, जैन , ख्रिश्चन, शीख, बौद्ध पारशी, यांचा अल्पसंख्याकात समावेश आहे. जैन समाजाचा यात जानेवारी २०१४ मध्ये समावेश करण्यात आला होता. एनएमडीएफसी कार्यक्रमात महिला व कारागीर यांना प्राधान्य देण्यात आले. १९९४ ला ही संस्था स्थापन झाल्यापासून ३० जून २०१८ अखेर त्यांनी ४६८०.१६ कोटी रूपयांचे वाटप १४२६३०८ लाभार्थींना केले आहे. २०१७-१८ मध्ये एकूण ५७०.८३ कोटींचे वाटप लाभार्थींना करण्यात आले. २०१८-१९ मध्ये ३० जून २०१८ अखेर एनएमडीएफसीने १०८०० लाभार्थींना ११२ कोटींचे कर्ज वाटप केले.

राष्ट्रीय विकलांग वित्त व विकास महामंडळ (एनएचएफडीसी) या संस्थेची स्थापना कंपनी कायदा १९५६ च्या कलम २५ अनुसार झाली. त्यात विकलांग व्यक्तींच्या आर्थिक विकासाचा हेतू आहे. २४ जानेवारी १९९७ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेचे भागभांडवल ४०० कोटींचे असून विकलांग म्हणजे दिव्यांगजनांसाठी काम करणारी ही सर्वोच्च संस्था आहे. दिव्यांगांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यासाठी ही संस्था आर्थिक मदत करीत असते. त्यांना उच्च शिक्षणासाठी सवलतीच्या दरात कर्जे दिली जातात. एनएचएफडीसीने आतापर्यं ३१ मार्च २०१७ अखेर १४२३४९ दिव्यांगांना ८०१.६६ कोटींचे वाटप केले आहे.

राष्ट्रीय महिला कोश- राष्ट्रीय महिला कोश ही स्वयंसेवी संस्था असून ती महिला व बालविकास मंत्रालयाअंतर्गत काम करते तिची नोंदणी सोसायटी नोंदणी कायदा १८६० अनुसार झाली असून ती सर्वोच्च सूक्ष्म वित्त संस्था आहे. त्याचा प्रमुख उद्देश हा गरीब महिलांना रोजीरोटीसाठी अर्थसाह्य देणे हा आहे. त्यातून या महिला उत्पन्न मिळवून गुजराण करू शकतात. ग्राहकस्नेही प्रक्रियेने सवलतीच्या दरात यात कर्जे दिली जातात. त्यातून सामाजिक व आर्थिक विकास साध्य होतो. राष्ट्रीय महिला कोशातून गरीब व संपन्नहीन महिला उद्योजकांना मध्यस्थ संस्थांमार्फत (इंटरमिजीयरी आर्गनायझेशन्स) कर्जे दिली जातात. सहा टक्के व्याजाने ही कर्जे दिली जातात नंतर या संस्था स्वमदत गटांना १४ टक्के दराने कर्ज देतात.

मुद्रा योजना- अर्थमंत्री अरूण जेटली यांनी २०१५-१६ मध्ये मुद्रा बँकेची घोषणा केली. ८ एप्रिल २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचे उदघाटन केले. कंपनीतर, कृषी बाह्य लघु व सूक्ष्म उद्योगांना यात १० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. व्यावसायिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, लघु वित्त बँका, सहकारी बँका, एएफआय व एनबीएफसी यांच्या माध्यमातून ही कर्जे दिली जातात. यात लाभार्थी यातील कुठल्याही संस्थेकडून कर्ज घेऊ शकतो त्यासाठी मुद्रा पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागतो. पीएमएमवाय, अंतर्गत मुद्रा बँकेची तीन उत्पादने आहेत. शिशु, कशोर व तरूण. त्यात वाढीच्या अवस्थानुसार लाभार्थीला कर्ज दिले जाते.

पीएमएमवायची सामाजिक गटनिहाय कामगिरी ८ एप्रिल २०१५ ते २९ जून २०१८ (रक्कम कोटीत)

**स्त्रोत –मुद्रा मिशन**

स्टँड अप इंडिया योजना- प्रत्येक बँक शाखेतून अनुसूचित जाती व जमातीच्या प्रत्येकी एका उमेदवाराला १० लाख तर महिलेस १ कोटी कर्ज ग्रीनफिल्ड उद्योगांसाठी दिले जाते.

| अनु क्रमांक | प्रवर्ग | खात्यांची संख्या | मंजूर रक्कम | प्रवर्गनिहाय कर्ज घेणारांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | साधारण | ५९२३३५५२ | ३९५०५६.९४ | ४५.२०% |
| २ | अनुसूचित जाती (एससी) | २३३५७४६६ | ६२९८२.९५ | १७.८२% |
| ३ | अनुसूचित जमाती (एसटी) | ६६२०७३७ | २००३५.२५ | ५.०५% |
| ४ | इतर मागास (ओबीसी) | ४१८३४२०४ | १३७०८४.२९ | ३१.९२% |
| ५ | एकूण | १३१०४५९५९ | ६१५१५९.४३ | |



त्यात उत्पादन, सेवा किंवा व्यापार क्षेत्रातील प्रकल्पांचा समावेश आहे. यात एमएसएलआर प्लस ३ असतो. यात मार्जिन मनी २५ टक्के असून तो केंद्र व राज्य योजनांच्या माध्यमातून दिला जातो. सार्वजनिक, खासगी व प्रादेशिक बँकांनी स्टँड अप इंडिया अंतर्गत ७ मार्च २०१८ अखेर अनुक्रमे ५१८८८, २४४५, १००९ इतक्या लाभार्थींना कर्जे दिली आहेत. प्रादेशिक ग्रामीण बँकांनी अनुसूचित जातीच्या १८० लाभार्थींना कर्जे दिली आहेत.

उद्यम भांडवल निधी योजना- ही योजना सामाजिक न्याय मंत्रालयाने सुरू केली असून त्यातून अनुसूचित जातीतील लोकांमध्ये उद्योजकता वाढवण्याचा उद्देश आहे. त्यांना यात सवलतीच्या दरात अर्थसाह्य दिले जाते.

**२७ जून २०१८ अखेर स्थिती**

कर्ज विस्तार हमी योजना - अर्थमंत्री अरूण जेटली यांनी जुलै २०१४ मध्ये २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय भाषणात २०० कोटींची तरतूद या योजनेत केली होती. तरूण व नव उद्यमींना हे अर्थसाह्य केले जाते. नव मध्यमवर्गात प्रवेश करू इच्छिणाऱ्या कमकुवत सामाजिक गटातील लोकांसाठी ही योजना असून सामाजिक न्याय व सक्षमीकरण खात्याने कर्ज विस्तार हमी योजना (अनसुचित जातींसाठी) ही योजना प्रायोजित केली आहे. यातील पात्र कर्जदार व जोखीम हमी ३१.१२.२०१७ अखेर पुढीलप्रमाणे एकूण २१.२७ कोटींचे कर्ज १४.४० कोटींच्या हमीनुसार देण्यात आले आहे. याबाबत जनजागृती सुरू असून त्यात दलित चेंबर्स ऑफ कॉमर्स, स्टेट लेव्हल बँकर्स कमिटी, सार्वजनिक बँका सहभागी आहेत.

पंतप्रधान जनधन योजना – (पीएमजेडीवाय)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी ही योजना जाहीर करून कमकुवत गटांच्या आर्थिक सर्वसमावेशकतेचा प्रयत्न केला त्यात या समाजाला बँकिंग, पेन्शन व विमा या सुविधा देण्यात आल्या. मागील योजनांचे नकारात्मक परिणाम यात टाळून १.५ कोटी बँक खाती सुरू करण्यात आली. कमकुवत गटांच्या आर्थिक सर्व समावेशकतेसाठी सरकार प्रयत्नशील असल्याची खात्री या योजनेतून पटली आहे. सध्याच्या सरकारने कमकुवत गटातील लोकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मोठे प्रयत्न केले असून त्यात समाजातील वंचित गटांची गरिबी दूर करण्याचा प्रयत्नही आहे.

| विवरण | सध्याची स्थिती |
|---|---|
| अर्थसाह्य मंजूर केलेल्य कंपन्यांची संख्या | ७१ कंपन्या |
| मंजूर रक्कम | रू. २५५.३७ कोटी |
| पैसे मिळालेल्या कंपन्यांची संख्या | ५६ कंपन्या |
| एकूण वितरण | १७६.७६ कोटी |


■■■

*लेखक हे निती आयोगाचे सामाजिक क्षेत्र गटातील उप सल्लागार आहेत.*

*ई मेल: mraju.sb@gov.in, / mrajusb@gmail.com*

# दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास

-राजकुमार बडोले



**समाजातील दुर्बल वंचित घटकाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक असा सर्वांगिण विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गेल्या साडेतीन वर्षात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. याचा लाभ घेऊन अनेकांचे जीवनमान उंचावत आहे. नव्याने काही योजना सुरु करण्यात आल्या आहेत. पुढील काळातही कल्याणकारी योजना राबवून अनुसूचित जाती, जमाती, दुर्बल वंचित घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न राहिल.**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य खात्यामार्फत अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. अनुसुचित जाती, जमाती आणि दुर्बल, वंचित घटकांसाठी राबविल्या जात असलेल्या योजनांची माहिती पुढील प्रमाणे आहे. समाजातील दुर्बल वंचित घटकाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक असा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाने गेल्या साडेतीन वर्षात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. याचा लाभ घेऊन अनेकांचे जीवनमान उंचावत आहे. नव्याने काही योजना सुरु करण्यात आल्या आहेत. पुढील काळातही कल्याणकारी योजना राबवून अनुसूचित जाती, जमाती, दुर्बल वंचित घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न राहिल.

### स्वाधार योजना

ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही अथवा त्यांनी प्रवेश घेतला नाही अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 'स्वाधार' ही योजना नव्याने राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. इयत्ता ११ वी, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मुंबई, पुणे व नागपूर सारख्या शहरात वार्षिक खर्चासाठी ४८ हजार ते ६० हजार रुपये अनुदान देण्यात येते. गेल्यावर्षी या योजनेचा ७ हजार ११० इतक्या विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे. सन २०१७-१८ साठी २५ हजार विद्यार्थ्याची निवड करण्यात आली आहे. मागासवर्गीय शासकीय वसतीगृहात अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे.

अपंगांच्या खाजगी १२३ विशेष निवासी व अनिवासी शाळा व कार्यशाळांना अनुदान तत्त्वावर मंजुरी देण्यात आली आहे. नोकरी किंवा शैक्षणिक बाबींसाठी जात पडताळणी आवश्यक असल्याने जात पडताळणी जलद होण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

### शैक्षणिक प्रगतीसाठी

समाजातील दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना विविध स्तरावर आणि वेगवेगळ्या प्रकारची शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. ही शिष्यवृत्ती महा-डीबीटी या वेबपोर्टलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अनूसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी सुरु करण्यात आलेल्या परदेश शिष्यवृत्ती योजनेत सुधारणा करण्यात

आली आहे. यापूर्वी उत्पन्नाची मर्यादा रुपये ३ लाख होती. ही मर्यादा आता रुपये ६ लाख इतकी करण्यात आली आहे.तसेच या पुर्वी पन्नास विद्यार्थ्यांची असलेली मर्यादा वाढवून ती आता ७५ करण्यात आली आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातून इयत्ता १० वी आणि १२ वी परिक्षेत राज्यात व मंडळात (बोर्डात) प्रथम येणाऱ्या गुणवंत्त विद्यार्थी व विद्यार्थीनीस शासनाच्या वतीने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून स्व.वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनीस प्रत्येकी १ लाख तर विभागीय मंडळात (बोर्डात) प्रथम आलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थीनीस प्रत्येकी ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने ५० विद्यार्थ्यांना एम.फिल. व पीएच. डी. शिक्षणासाठी देशातील पहिली फेलोशिप सुरु करण्यात आली आहे.

### आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक

इंदू मिलच्या साडेबारा एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यात येत असून बांधकामास सुरुवात झाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेल्या ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धन आणि विकासाचा निर्णय घेतला आहे. आता ही सारी कामे प्रगतीपथावर आहेत. तळेगाव दाभाडे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान ऐतिहासिक स्मारक म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे आणि मुंबईतील घाटकोपर चिरागनगर येथे स्मारक उभारण्यात येणार आहे. तसेच क्रांतीवीर लहूजी साळवे यांचे पुण्यातील संगमवाडी येथे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव आहे.

### समता व सामाजिक न्याय वर्ष

सन २०१५-१६ हे वर्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष हे समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. मुंबई येथील गेट वे ऑफ इंडिया येथे विश्वशांती परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र शासनाने स्थापन केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे युपीएससीच्या अनुसुचित जाती प्रवर्गातील 50 स्पर्धा परिक्षार्थींसाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी नागपूर, पुणे आणि मुंबईत प्रत्येकी एक वसतीगृह सुरु केले आहे. जिल्ह्यात बेरोजगार तरुणांसाठी कौशल्यविकासाचे प्रशिक्षण केंद्रे सुरु आहेत. सर्वच महामंडळाच्या कारभारात एकसूत्रीपणा आणण्यासाठी सर्वच महामंडळे एका छत्राखाली आणणार आहोत. येथे सर्व महामंडळाचा कारभार एक खिडकीतून चालवला जाईल.**

फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानाची स्थापना करण्यात आली. मुंबई, पुणे व नागपूर या शहरात काम करणाऱ्या महिलांसाठी वर्कींग वुमन्स वसतीगृह सुरु करण्यात आली आहे. ५० तालुक्यांमध्ये मुलींसाठी वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत.

निवडक अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तींच्या सर्वंकष विकासाची योजना तयार करुन कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला. पाली-त्रिपीटकचे मराठी भाषांतर करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे.

### ज्येष्ठ नागरिक धोरण

ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी धोरण तयार करण्यात आले आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी समुपदेशन केंद्र, विरंगुळा केंद्र, आरोग्य सुविधा केंद्र, तक्रार निवारण केंद्र याचा समावेश आहे. ज्येष्ठांना आत्मसन्मानाने जीवन जगता यावे यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

### व्यसनमुक्ती संकल्प

व्यसनामुळे अनेक तरुणांचे जीवन उध्वस्त होते. म्हणून तरुणांनी व्यसनापासून लांब राहावे. त्यांना व्यसन लागू नये याकरिता जनजागृती करण्याच्या दृष्टीने व्यसनमुक्तीचा संकल्प करण्यात आला आहे. प्रत्येक वर्षी व्यसनमुक्ती साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत समाजसेवक आणि संस्थांचा सन्मान करण्यात येतो. व्यसनमुक्तीचे कार्य प्रभावी व्हावे, यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान देऊन व्यसनमुक्ती केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

सामाजिक न्याय विभागाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात यासाठी बार्टीमार्फत तालुका समन्वयक तसेच समतादूत यांची नेमणूक करण्यात आली आहे. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहांवरील नियंत्रणासाठी हे तालुका समन्वयक कार्य करणार आहेत.

औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे युपीएससीच्या अनुसुचित जाती प्रवर्गातील ५० स्पर्धा परिक्षार्थींसाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी नागपूर, पुणे आणि मुंबईत

प्रत्येकी एक वसतीगृह सुरु केले आहे. जिल्ह्यात बेरोजगार तरुणांसाठी कौशल्यविकासाचे प्रशिक्षण केंद्रे सुरु आहेत. सर्वच महामंडळाच्या कारभारात एकसूत्रीपणा आणण्यासाठी सर्वच महामंडळे एका छत्राखाली आणणार आहोत. येथे सर्व महामंडळाचा कारभार एक खिडकीतून चालवला जाईल. दलित उद्योजक उभा राहिला पाहिजे यासाठी औद्योगिक सहकारी संस्थांना कर्ज देतानाच, वैयक्तिक कौशल्यप्राप्त तरुणांसाठीही उद्योगाची योजना लवकरच सुरु करणार आहोत. औद्योगिक वसाहतीमध्ये दलित उद्योजकांसाठी राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला. एअरहोस्टेसच्या दिलेल्या प्रशिक्षणातून ३४ मुलींची निवड झालेली आहे. अशा प्रशिक्षणातून अधिकाधिक एअरहोस्टेस तयार व्हाव्यात असा प्रयत्न आहे.

कर्नाटक आणि आंध्रप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्र अनुसुचित जाती अधिनियम हा विशेष कायदा करण्याचे प्रस्तावित आहे. असा कायदा अस्तित्वात आल्यास विशेष घटक योजना तसेच इतर अनुसुचित जाती उपयोजनेसाठी असलेल्या निधी इतर विभागाकडे वळवता येणार नाही.

■■■

*लेखक महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय या खात्याचे मंत्री आहेत.*

*ई मेल: rajkumar.badole@gov.in*




## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

# दिव्यांगांसाठी सामाजिक सक्षमीकरण

- डॉ. संध्या लिमये



**सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात असलेल्या दिव्यांग व्यक्तींची संख्या, एकूण लोकसंख्येच्या २.२१ % इतकी म्हणजे २,६८,१४,००० आहे. त्यापैकी शारिरीक हालचालींवर मर्यादा आणणारे अपंगत्व सर्वात जास्त (५४.३७), बहिरेपणा(५०.७३) आणि दृष्टीदोष (५०.३३) यांचा समावेश आहे.आज दिव्यांगांच्या पुनर्वसन क्षेत्रातील व्यावसायिकांचा दृष्टिकोन बदलत असून, तो दिव्यांगांचे हक्क, त्यांना समान संधी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांचे एकीकरण असा आहे.**

वर्षानुवर्ष दुर्लक्ष, वंचना, अलिप्तपणा आणि वगळले गेल्याची भावना, याचे दु;ख सहन करणारा भारतातील सर्वात मोठा अल्पसंख्य गट म्हणजे दिव्यांग व्यक्तींचा (पी डब्ल्यू डी) गट. भारतामध्ये आजही, दिव्यांग असलेल्या व्यक्तींबाबत असलेल्या कनिष्ठ दर्जाचे, असमर्थ, अपुरे आणि कुटुंबावर आणि समाजावर ओझे अशाप्रकारच्या समाजाच्या साचेबध्द आणि पूर्वग्रहदूषित समजांमुळे दिव्यांगांना, अन्यायित, मर्यादित, संपूर्ण नागरिकत्वाच्या आणि सहभागाच्या संधी तसेच वाजवी दर्जाचे गुणवत्तापूर्ण आयुष्य नाकारण्यात येणारे असे दुर्लक्षित आयुष्य जगावे लागत आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात असलेल्या दिव्यांग व्यक्तींची संख्या, एकूण लोकसंख्येच्या २.२१ % इतकी म्हणजे २,६८,१४,००० इतकी आहे. त्यापैकी शारिरीक हालचालींवर मर्यादा आणणारे अपंगत्व सर्वात जास्त (५४.३७), बहिरेपणा(५०.७३) आणि दृष्टीदोष (५०.३३) यांचा समावेश आहे.

आज दिव्यांगांच्या पुनर्वसन क्षेत्रातील व्यावसायिकांचा दृष्टिकोन बदलत असून, तो दिव्यांगांचे हक्क, त्यांना समान संधी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांचे एकीकरण असा आहे. आता असे अधिकृतपणे मानले जाते की दिव्यांग ही देखील माणसेच असून इतर लोकांप्रमाणे त्यांनाही, आर्थिक, भावनिक, शारिरीक, बौध्दिक, अध्यात्मिक, सामाजिक आणि राजकीय अशा सर्व प्रकारच्या गरजा असतात. जरी या दिशेने बरेच मार्गक्रमण झाले असले तरीही, दिव्यांगांच्या सबलीकरणाद्वारे, सर्वसमावेशक, अडथळा-मुक्त आणि हक्कावर आधारित समाजासाठी अजून बरेच काही करण्याची आवश्यकता आहे.

सबलीकरण या संज्ञेचे, विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भानुसार, स्वयंशक्ती, नियंत्रण, स्वत:च्या हक्कांसाठी लढण्याची क्षमता, स्वातंत्र्य, तसेच स्वत:चे निर्णय घेण्याची क्षमता इत्यादी वेगवेगळे अर्थ असू शकतात. सबलीकरण हे वैयक्तिक किंवा सामाजिक पातळीशी संबंधित असू शकते, तसेच, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय माध्यमाद्वारे एखाद्याच्या आयुष्यावर परीणाम करणाऱ्या स्त्रोत किंवा निर्णयावर नियंत्रण आणि एखाद्याच्या अधिकारात वाढ करता येऊ शकते. सामाजिक कार्य तसेच समुदाय विकासाची तत्वे यांचा अवलंब करण्यासाठी सामाजिक सबलीकरण हे एक मोठे

क्षेत्र आहे. सामाजिक कार्यामध्ये, सबलीकरणामुळे, स्त्रोतकेंद्रीत हस्तक्षेपाचा एक व्यावहारिक दृष्टिकोन तयार होतो.

**दिव्यांग लोकांच्या सामाजिक सबलीकरणासाठी शासकीय पुढाकार**

दिव्यांगांचे कल्याण आणि सबलीकरणाचे लक्ष्य असलेल्या धोरणाच्या मुद्यावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी आणि त्याबाबतच्या कृतींना पाठबळ देण्यासाठी, सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाने, १२ मे २०१२ रोजी एक स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. सामाजिक सबलीकरणासह एडीआयपी, एसआयपीडीए, डीडीआरएस अशा प्रकारच्या योजनांच्या विविध पैलूंबाबत दिव्यांगांचे पुनर्वसन करणे हा या विभागाचा मुख्य उद्देश आहे.

**१. दिव्यांगांसाठी उपकरणांच्या खरेदी/ फिटिंगबाबत अनुदान योजना**

या योजने अंतर्गत गेल्या ३ वर्षात (२०१४-२०१७) ४३० कोटी ९८ लाख इतक्या रकमेचा विनियोग केला गेला असून त्यासाठी आयोजित केलेल्या ५२६५ शिबिरातून त्याचा लाभ ७ लाख ३ हजार दिव्यांगांना झाला आहे. पहिल्यांदा, सन २०१४ मध्ये जागतिक दिव्यांग दिनाच्या दिवशी देशातील १७२ रूग्णालयांमध्ये ए डी आय पी योजनेअंतर्गत कोचलर इंप्लांट कार्यक्रमाला सुरूवात झाली. या कालावधीत सुमारे ७९४ शस्त्रक्रिया (ए डी आय पी अंतर्गत ६६७ आणि सी एस आर अंतर्गत १२७) पार पडल्या आणि या सर्व प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन करण्यात आले होते. ए डी आय पी योजनेअंतर्गत, विभागाकडून रू. ३७,००० किंमतीची तीन चाकी सायकल दिव्यांगांना सवलतीच्या दरात रू.२५,००० ला देण्यात येते. (उरलेले रू.१२,००० खासदार निधी, आमदार निधी, राज्य सरकारचे सहाय्य किंवा स्वत: लाभार्थ्यांकडून घेतले जातात.) अशाप्रकारे गेल्या तीन वर्षात ३६३९ लाभार्थ्यांना ९ कोटी १० लाख रूपये किंमतीच्या मोटारसायकली मिळाल्या आहेत. अशाप्रकारे या अनुदानामुळे दिव्यांगांना अधिक स्वायत्तता आणि गतीशीलता मिळाल्यामुळे त्यांच्या सामाजिक सहभागात आणि समावेशामध्ये वाढ होते.

**दिव्यांगांचे कल्याण आणि सबलीकरणाचे लक्ष्य असलेल्या धोरणाच्या मुद्यावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी आणि त्याबाबतच्या कृतींना पाठबळ देण्यासाठी, सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाने, १२ मे २०१२ रोजी एक स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. सामाजिक सबलीकरणासह एडीआयपी, एसआयपीडीए, डीडीआरएस अशा प्रकारच्या योजनांच्या विविध पैलूंबाबत दिव्यांगांचे पुनर्वसन करणे हा या विभागाचा मुख्य उद्देश आहे.**

**तंत्रज्ञान विकास प्रकल्प मोहीम:** दिव्यांगांना रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी आणि त्यांचा समाजातील सहभाग वाढण्यासाठी, योग्य आणि खर्चाला अनुसरून, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने, मदत पुरविण्याच्या दृष्टिकोनातून १९९०-९१ मध्ये ही योजना सुरू केली होती. या योजनेअंतर्गत, योग्य ते संशोधन आणि विकास प्रकल्प सुरू करून, सहाय्य आणि अनुदानासाठी निधी पुरविण्यात येतो. या योजना भारतीय तंत्रज्ञान संस्था, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविल्या जातात. यामध्ये १००% आर्थिक निधी पुरविला जातो. हे चार सल्लागार गट, प्रकल्प निवडणे, त्यातील दिव्यांगत्वाच्या विविध प्रकारच्या पातळ्यावरील प्रगती, यावर लक्ष ठेवतात. दिव्यांगत्त्वाच्या विविध प्रकारांमध्ये, ऑर्थोपेडिक अर्थात हाडांच्या विकृती संदर्भात (सेरेब्रल पाल्सी सह) डोळ्यांच्या, बोलण्याच्या, ऐकण्याच्या, तसेच मानसिक विकृतींचा समावेश आहे. यामध्ये तांत्रिक सल्लागार गटाने सुचविलेले प्रकल्प, सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयाच्या सचिवाच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च पातळीवरील समिती समोर ठेवण्यात येतात.

**२. माध्यमिक स्तरावरील दिव्यांगांसाठी समावेशी शिक्षण (आयईडीएसएस)**

या योजनेद्वारा १४ वर्षांवरील दिव्यांग मुलांना नववी ते बारावी पर्यंतचे माध्यमिक शिक्षण, सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच अनुदानित शाळांमधून पूर्ण करण्यासाठी मदत करण्यात येते. या योजनेद्वारे, मूल प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत येताना, त्याच्या दिव्यांगत्वच्या ओळखपत्राची तरतूद केली जाते, तसेच त्यांच्या दिव्यांगत्वासाठी मदत आणि उपकरणे, शैक्षणिक साहित्य, वाहतुकीची सोय, निवासाची सोय, शिष्यवृत्ती, पुस्तके, मदत करणारे तंत्रज्ञान आणि लेखनिक तसेच वाचक पुरविले जातात. दिव्यांग विद्यार्थ्यांना, त्यांचे उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी विविध शिष्यवृत्या दिल्या जातात. या सर्वसमावेशक शिक्षणामुळे, दिव्यांग विद्यार्थ्याला सर्वसाधारण विद्यार्थ्यांमध्ये सहभागी होण्यासाठी मदत होते तसेच समावेशाचा मार्ग खुला होतो.

**३. सुलभ भारत मोहिम-**

दिव्यांगांना, निर्मित वातावरणात, परीवहन सेवेत, माहिती आणि संभाषण तंत्रज्ञानात (आय सी टी) तसेच पर्यावरणामध्ये सार्वत्रिक प्रवेशयोग्यता मिळावी म्हणून प्रधानमंत्र्यांनी ३.१२.२०१५ रोजी या मोहीमेला सुरुवात केली. दिव्यांगता ही, व्यक्तीची मर्यादा आणि अपात्रता यावर अवलंबून नाही तर ज्या प्रकारे समाज संघटित आहे त्यावर अवलंबून असते या दिव्यांगतेच्या सामाजिक आदर्श सिध्दांतावर ही मोहीम, आधारीत आहे. बांधकाम व्यावसायिक आणि कार्यकर्ते यांच्यासह सर्व प्रमुख भागधारकांना संवेदनशील करण्यासाठी जागरूकता कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजित करण्याच्या दृष्टीने तज्ञांचा एक गट, विस्तृतपणे कार्य करत आहे. कोणत्याही इमारतीच्या उपलब्धतेबाबत लोकांना फोटो आणि मते मांडण्यासाठी एक वेब पोर्टलही बनविण्यात आले आहे.

**४. दिव्यांग लोकांसाठी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी योजना (एसआयपीडीए)**

ही एक विस्तृत श्रेणी योजना आहे, ज्यामध्ये कौशल्य विकास, अडथळामुक्त वातावरण निर्मिती, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ते संबंधित उपक्रम आणि त्या क्षेत्रात काम करणारी संस्था चालविणे इत्यादींसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. उदाहरणार्थ, दिव्यांगासाठीच्या कायद्याच्या ४६ व्या कलमानुसार, सरकारी इमारतींमध्ये, दिव्यांगांसाठी अडथळामुक्त वातावरण आवश्यक आहे. यासाठी रॅम्पस्, रेल्स, लिफ्ट्स, व्हीलचेअरच्या वापरायोग्य शौचालये बनविणे, ब्रेल लिपीमध्ये चिन्हे बनविणे, श्रवणसंकेत, स्पर्शाने जाणवेल असे टॅक्टाइल फ्लोअरींग इत्यादींची तरतूद करणे.

**५. दिव्यांगांसाठी दीनदयाळ पुनर्वसन योजना (डी डी आर एस)**

दिव्यांगांच्या पुनर्वसनाचे कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य पुरविले जाते; १८ उप-घटकांद्वारे त्यांच्या चांगल्या भौतिक, संवेदनाक्षम, बौद्धिक, मानसिक आणि / किंवा सामाजिक कार्यात्मक पातळीपर्यंत पोहचविणे आणि त्यांचे पालन करणे, त्यांना सक्षम करणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे.

**६. माहिती, संवाद आणि तंत्रज्ञान (आयसीटी) –**

शहरामध्ये सार्वजनिक उपयोगितेच्या

**मोबाईलवरील संवादामुळे अपंगांना अनेक नव्या संधी उपलब्ध होवू शकतात. संगणकासाठी आवाज ओळखणाऱ्या प्रणाली सारखी नवीन साधने या क्षेत्रात सतत विकसित होत आहेत. याचा उपयोग ए टी एम, बॅंका, मॉल्स, शौचालये इत्यादी ठिकाणी करण्यात येइल, आणि ही ठिकाणे किती प्रमाणात दिव्यांगांना अनुकूल आहेत याबद्दल वापरकर्त्यांकडून मते विचारण्यात येतील.**

दृष्टीने दिव्यांगांना अनुकूल असे, माहिती पुरविणारे, मोबाईल ॲप सुरू करण्यात येणार आहे. मोबाईलवरील संवादामुळे अपंगांना अनेक नव्या संधी उपलब्ध होवू शकतात. संगणकासाठी आवाज ओळखणाऱ्या प्रणाली सारखी नवीन साधने या क्षेत्रात सतत विकसित होत आहेत. याचा उपयोग ए टी एम, बॅंका, मॉल्स, शौचालये इत्यादी ठिकाणी करण्यात येइल, आणि ही ठिकाणे किती प्रमाणात दिव्यांगांना अनुकूल आहेत याबद्दल वापरकर्त्यांकडून मते विचारण्यात येतील.

दृष्टीदोष असणाऱ्या माणसालाही उपयोगी पडतील असे दूरचित्रवाणीचे कार्यक्रम तयार करणारे सेट टॉप बॉक्स बनविण्याचा विचारही सरकार करीत आहे. सध्या असे खुणांच्या भाषेत दिले जाणारे एकच बातमीपत्र आहे. पुढच्या पाच वर्षांसाठी म्हणून सरकारकडून, प्रत्येक वर्षी २०० जणांना खुणांच्या भाषेचे प्रशिक्षण दिले जाईल. दिव्यांगांना अनुकूल असे दूरचित्रवाणी वरील कार्यक्रम बनविण्याच्या दृष्टीने दूरदर्शन पासून सुरूवात करून २५ टक्क्यापेक्षा जास्त कार्यक्रमांसाठी खुणांची भाषा वापरण्यास सुरूवात करण्यात येईल.

दृष्टीदोष असलेल्या अपंगांसाठी सरकारी वेबसाईट वरील माहितीचे स्क्रीन रीडर प्रणालीच्या सहाय्याने मजकुराचे भाषणामध्ये रूपांतर करण्यात येईल.

**७. जागरूकता निर्मिती आणि प्रसिद्धीसाठीची योजना**

दिव्यांगांच्या कल्याणासाठी तसेच त्यांना समाजात सामावून घेण्याच्या दृष्टीने, सक्षम वातावरण तयार करण्यासाठी, केंद्र तसेच राज्य सरकार तर्फे आयोजित केलेले कार्यक्रम किंवा योजना यांची इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, छपाई माध्यमातून, चित्रपट माध्यम, किंवा मल्टी मीडियाद्वारे कार्यक्रम आधारित मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी करण्याच्या हेतूने ही योजना २०१४ मध्ये सुरू करण्यात आली. दिव्यांगांच्या कायदेशीर अधिकारांबाबतच्या माहितीचा प्रसार करणे, दिव्यांग व्यक्तींच्या विशेष गरजांवर नियोक्ते आणि अन्य तत्सम गटांना संवेदनशील करणे, विविध प्रकारच्या दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी सामग्री विकसित करणे, त्यांना हेल्पलाईन पुरविणे इत्यादी या योजनेची उद्दीष्टे आहेत.

**निष्कर्ष**

दिव्यांगांचे आयुष्य गुणवत्तापूर्ण



होण्याच्या दृष्टीने सामाजिक सबलीकरण हे अपरिहार्य आहे आणि ही एक निरंतर प्रक्रिया तसेच परिणाम दोन्ही आहे. सामाजिक सबलीकरण हे विशेष करून चार पातळ्यांवर अंमलात आणले जाते: (१) वैयक्तिक पातळी,- जेथे व्यक्ती स्वत:ला मान देते आणि सक्रीयपणे जीवनात सहभागी होऊ इच्छिते, (२) कौटुंबिक पातळी- जेथे कुटुंब त्यांच्यातील दिव्यांग व्यक्तीला सामाजिक पुनर्वसनासाठी मार्गदर्शन करते तसेच आधार देते, (३) समुदाय पातळी- जेथे जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जातात. सरकारी धोरणांबरोबर समुदायाकडून सामाजिक आधार मिळाल्यास सामाजिक समावेश शक्य होतो आणि एका व्यक्तीची त्याच्या/तिच्या वैयक्तिक परिस्थितीत आणि समावेशक वातावरणांमध्ये भरभराट होण्यास मदत होते आणि (४) सामाजिक धोरण पातळी- जेथे दिव्यांगांसह सर्व व्यक्तींच्या सामाजिक न्याय आणि समावेशासाठी स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरून प्रयत्न केले जातात. असे असले तरी, समावेशक शिक्षण आणि सामाजिक-आर्थिक एकत्रीकरण, यासारख्या इतर मार्गानीही सामाजिक सबलीकरणासाठी प्रयत्न होवू शकतात. सामाजिक सबलीकरणास मदत करण्यासाठी साधने, पद्धती आणि दृष्टीकोन या सुविधा आहेत. अशाप्रकारे, सामाजिक धोरणे आणि सुविधा दिव्यांगांना सामाजिक सबलीकरणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी प्रभावी साधने होऊ शकतात.

■■■

*लेखिका मुंबई येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत दिव्यांग विषयक विभागात सहयोगी प्राध्यापिका आहेत. मागील ३२ वर्षापासून दिव्यांग विषयक विविध उपक्रमात त्या सक्रिय आहेत.*

*ई मेल: limaye.sandhya@gmail.com*




**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

# आधारभावात वाढ - एक आश्वासक पाऊल

- रमेश पाध्ये



**या वर्षीच्या अर्थसंकल्पापूर्वी म्हणजे २०१४ सालच्या सार्वजनिक निवडणुकीच्या तोंडावर श्री नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, सत्तेवर आल्यास स्वामिनाथन् आयोगाच्या शिफारसीनुसार शेतमालाचा उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा अशी किमान किंमत मिळण्याची व्यवस्था केली जाईल या मार्गावरील पहिले पाऊल सरकारने जुलै २०१८ मध्ये उचलले आहे. सरकारने किमान आधार भावात घसघशीत वाढ केली आहे. परंतु खरा प्रश्न आहे तो शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारामध्ये प्रत्यक्षात हे भाव पदरात पडण्याचा!**

केंद्र सरकारने २०१८-१९ सालच्या खरीप हंगामातील १४ पिकांचे किमान आधार भाव आधी अर्थसंकल्प सादर करताना घोषणा केल्याप्रमाणे उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा आकारून निश्चित केले आहेत. या वर्षीच्या अर्थसंकल्पापूर्वी म्हणजे २०१४ सालच्या सार्वजनिक निवडणुकीच्या तोंडावर श्री नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, सत्तेवर आल्यास स्वामिनाथन् आयोगाच्या शिफारसीनुसार शेतमालाचा उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा अशी किमान किंमत मिळण्याची व्यवस्था केली जाईल. या मार्गावरील पहिले पाऊल सरकारने जुलै २०१८ मध्ये उचलले आहे. सरकारने किमान आधार भावात घसघशीत वाढ केली आहे. परंतु खरा प्रश्न आहे तो शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारामध्ये प्रत्यक्षात हे भाव पदरात पडण्याचा! कृषी मूल्य आयोगाच्या २०१८-१९ या वर्षासाठीचा खरीप हंगामाचा अहवाल वाचला तर सरकार पुढील या घोषित धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या मार्गावरील अडचणींचा लांबलचक पाढा दिसेल. तरीही खरीप हंगामातील पिके बाजारात विक्रीसाठी येण्यापूर्वी सरकार या संदर्भातील धोरण निश्चित करील अशी आशा आपण बाळगूया.

आज पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने शेतमालाचे भाव घसघशीत वाढवून एक क्रांतिकारी नसले तरी मोठे पाऊल टाकले आहे. २००६ साली स्वामिनाथन् आयोगाचा अहवाल हातात पडल्यावर २००७-०८ च्या रब्बी हंगामात संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने गव्हाच्या आधार भावात ३३,१/३ टक्क्यांची वाढ केली होती. तसेच २००८-०९ च्या खरीप हंगामात तांदुळाच्या आधार भावात सुमारे २२ टक्क्यांची वाढ केली होती. कृषी मूल्य आयोग व सरकार यांच्या कृतीमुळे देशात महागाईचा आगडोंब उसळला होता. या वाढत्या महागाईच्या प्रश्नावर विरोधी पक्षांनी संसदेत सरकारवर खरपूस टीका केली होती. परंतू हा महागाईचा आगडोंब प्रामुख्याने सरकारने गहू आणि तांदुळ यांच्या किमान आधार भावात वाढ केल्यामुळे उसळला होता ही बाब त्यावेळी विरोधकांच्या नजरेमधून सपशेल सुटली होती. सदर भाववाढीची कारणमीमांसा करणारी माझी पुस्तिका भारतीय कम्युनिस्ट पक्षाने प्रकाशित केली होती.

अर्थशास्त्राच्या परिघात सरकारच्या या कृतीचा विचार करायचा तर सरकारच्या या निर्णयामुळे भाववाढीच्या प्रक्रियेला स्वाभाविकपणे चालना मिळणार आहे. अनेक अर्थतज्ज्ञांनी सरकारच्या या कृतीमुळे महागाई

वाढण्याचा दर एक टक्क्याने वाढेल असे सुचित केले आहे. सध्या म्हणजे मे २०१८ या महिन्यात महागाई वाढण्याचा दर पाच टक्क्यांच्या जवळ पोहचला होता. तो नजिकच्या काळात सहा टक्के व्हावा अशी कृती मोदी सरकारने केली आहे. रिझर्व बँक आणि सरकार यांनी महागाई वाढण्याचा दर २ ते ६ टक्के या दरम्यान राखण्याचे धोरण आधीच जाहीर केले आहे. त्यामुळे महागाई वाढण्याचा दर सहा टक्के झाला म्हणजे त्यात आणखी वाढ होऊ नये यासाठी रिझर्व बँकेला आपल्या पैसा विषयक धोरणानुसार व्याज दरात वाढ करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. तसे झाले की उद्योगधंद्यासाठी दिल्या जाणाऱ्या कर्जासाठी व्याज्याच्या दरात वाढ झाल्यामुळे उद्योजक भांडवली गुंतवणुकीचा निर्णय पुढे ढकलण्याची शक्यता आहे.

सरकारने शेतमालाचे भाव वाढविण्याच्या कृतीला हिरवा कंदील दाखविल्यामुळे मोटारी व दुचाकी अशी उत्पादने करणारे उद्योगपती सधन शेतकऱ्यांप्रमाणेच खूष झाले आहेत. कारण नजिकच्या भविष्यात त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठेत असणारी मागणी वाढणार आहे. व्यापार व व्यवसाय यांच्या संदर्भात माहिती पुरविणाऱ्या वर्तमान पत्रात या विषयावर सविस्तर चर्चा मला वाचायला मिळाली. सधन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले की ते स्वत:साठी अलिशान मोटार व आपल्या सज्ञान मुलामुलीसाठी दुचाकी खरेदी करणार हे निश्चित. उत्पन्नात वाढ झालेले काही शेतकरी अद्यावत बंगला बांधण्याच्या कामाला सुरुवात करतील. त्यामुळे सिमेंट, पोलाद, विटा या सारख्या उत्पादनांच्या मागणीत वाढ होईल.

वाढती महागाई हा गोरगरीब लोकांवर लादलेला व त्यांना न चुकविता येणारा कर असतो असे अर्थशास्त्र सांगते. आपल्या देशात अशा गोर-गरीब लोकांची टक्केवारी किमान ७५ टक्के असेल असा निष्कर्ष डॉक्टर अर्जुन सेनगुप्ता यांनी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला सादर केलेल्या अहवालाच्या आधारे काढता येतो. अशा असंघटित क्षेत्रात राबणाऱ्या लोकांना महागई वाढली म्हणून महागाई भत्ता मिळत नाही. त्यामुळे खाद्यान्न महाग झाले की त्यांच्यावर पोट आवळण्याची वेळ येणार हे उघड आहे. असे झाले म्हणजे देशात अन्नधान्याच्या खपात घट होऊन धान्याचे साठे वाढत जातील

**सरकारने शेतमालाचे भाव वाढविण्याच्या कृतीला हिरवा कंदील दाखविल्यामुळे मोटारी व दुचाकी अशी उत्पादने करणारे उद्योगपती सधन शेतकऱ्यांप्रमाणेच खूष झाले आहेत. कारण नजिकच्या भविष्यात त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठेत असणारी मागणी वाढणार आहे. व्यापार व व्यवसाय यांच्या संदर्भात माहिती पुरविणाऱ्या वर्तमान पत्रात या विषयावर सविस्तर चर्च मला वाचायला मिळाली. सधन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले की ते स्वत:साठी अलिशान मोटार व आपल्या सज्ञान मुलामुलीसाठी दुचाकी खरेदी करणार हे निश्चित.**

आणि ते जागतिक बाजारपेठेत विकून सरकारला खनिज तेल आयात करता येईल. तसेच सरकारलाही अबकारी कराच्या माध्यमातून चार चव्वल अधिक मिळतील. राजकोषीय तूट (fiscal deficit) नियंत्रणात ठेवण्यासाठी हा पैसा अर्थमंत्र्यांना मदतकारक ठरेल.

खाद्यान्नाचे भाव वाढले म्हणजे ग्राहक मूल्य निर्देशांकात घसघशीत वाढ होईल. कारण सदर निर्देशांकात खाद्यान्नाचा भार सुमारे पन्नास टक्के एवढा जास्त आहे. ग्राहक मूल्य निर्देशांकात वाढ झाली की संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या व गलेलठ्ठ पगार असणाऱ्या लोकांच्या दैनंदिन खर्चात होणाऱ्या वाढीपेक्षा त्यांच्या महागाई भत्त्यात अधिक वाढ होईल. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून ही महागाई वाढण्याची प्रक्रिया काही प्रमाणात मंदावली होती. त्यामुळे संघटित क्षेत्रातील खास करून पाच सहा अंकी पगार घेणाऱ्या लोकांनी सरकारच्या या बदललेल्या पवित्र्याचे स्वागतच करायला हवे. कारण त्यांना वाढीव महागाई भत्त्याच्या रुपाने भरपूर पगारवाढ मिळणार आहे.

अर्थशास्त्राच्या चौकटीमधील सर्वात अवघड असणारा भाग म्हणजे मूल्य विषयक सिद्धांत. अभिजात अर्थशास्त्रानुसार कॉर्न इज इनपुट ॲण्ड कॉर्न ॲज आऊटपुट अशी शेती क्षेत्राची अवस्था असते. याचा अर्थ शेती क्षेत्रात काम करणारे लोक धान्य खाऊन उपजिविका करतात आणि धान्याचे उत्पादन करतात. त्यामुळे धान्यांच्या किमती वाढल्या की आर्थिक प्रक्रियेच्या दुसऱ्या आवर्तनात उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे धान्याच्या किमती पुन्हा वाढतात. त्यामुळे पुन्हा महागाई वाढते. अर्थव्यवस्थेतील आर्थिक प्रक्रियेचे स्वरूप असे राहिल्यामुळे धान्याच्या वा खाद्यान्नाच्या किमती सतत वाढतात तेव्हा त्याचा खरा लाभ भांडवल सधन उद्योगांना होतो. श्रमसधन उद्योग दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येतात. ही गुंतागुंतीची आर्थिक प्रक्रिया आधुनिक गणिताचा वापर करून उलगडून दाखविण्याचे काम इटलीमध्ये जन्मलेल्या आणि केंब्रिज विद्यापीठात प्रोफेसर असणाऱ्या श्री पिअरो श्राफा यांनी समर्थपणे केले आहे. त्यांचे 'प्रोडक्शन ऑफ कमॉडिटीज' बाय मीन्स ऑफ कमॉडिटीज हे छोटे पुस्तक अभ्यासकाला वास्तव उलगडून

दाखविणारे आहे. शक्य असेल त्या वाचकांनी हे पुस्तक मिळवून श्री श्राफा यांचा विचार जाणून घेण्याचा जरूर प्रयास करावा.

२०१४ साली सत्तास्थानी आल्यापासून महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध उपाय योजण्याचे काम मोदी सरकारने केले. त्यात त्यांना काही प्रमाणात यशही मिळाले. २०१४-१५ आणि २०१५-१६ या पाठोपाठच्या महाभयंकर दुष्काळाच्या वर्षांत खाद्यान्नाच्या किमती वाढू नयेत यासाठी सरकारने योग्य ती पावले उचलली. त्यासाठी मोदी सरकारचे अभिनंदन करायला हवे. आज शेतकरी संकटग्रस्त झाले आहेत. ते खाद्यान्नाचे भाव वाढले नाहीत म्हणून नव्हे, त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे ती २०१४-१५ आणि २०१५-१६ या पाठोपाठच्या दोन वर्षांतील दुष्काळामुळे. भविष्यात शेतकऱ्यांवर अशी वेळ येऊ नये म्हणून सरकारने प्रधानमंत्री फसल बिमा योजना सुरू केली आहे. ही बाबही स्वागतार्ह आहे. परंतु या गोष्टीची पाहिजे तशी दखल प्रसार माध्यमांनी घेतली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

शेतकरी संघटनांनी या धोरणाचे मनापासून स्वागत केले आहे का? मुळीच नाही. सरकारने केवळ उत्पादनाचा खर्च विचारात घेतला, शेतजमिनीचे आभासी भाडे (imputed rent) विचारात घेतले नाही म्हणून ते नाराज आहेत. शेतकऱ्यांच्या नेत्यांना उत्पादनखर्च म्हणून सर्वसमावेशक खर्चाच्या, म्हणजे कृषी मूल्य आयोगाच्या C2 या संकल्पनेच्या दीडपट एवढे शेतमालाचे भाव सरकारने वाढवायला हवे होते. शेतकरी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांचेही सरकारच्या घोषणेमुळे समाधान झालेले नाही. परंतु त्यांनी स्वत: लिहिलेला अहवाल नीट वाचला तर त्यात C2 खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याची शिफारस सदर अहवालात करण्यात आलेली नव्हती हे त्यांच्या लक्षात येईल. सरकारने आज जाहीर केलेल्या हमी भावाच्या दीडपट किमान आधार भाव निधारित केले असते तर देशातील गोर-गरीब लोकांवर पोट आवळण्याची नव्हे तर टाचा घासत उपाशी मरण्यावाचून दुसरा पर्याय त्यांच्यासाठी उरला नसता.

शेतमालाचे भाव वाढले की असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांवर कुऱ्हाड कोसळते हे आपण पाहिले आहे. परंतु शेतकरी समुदायातील विविध गटांवर त्याचा काय परिणाम

---

**२०१४-१५ आणि २०१५-१६ या पाठोपाठच्या महाभयंकर दुष्काळाच्या वर्षांत खाद्यान्नाच्या किमती वाढू नयेत यासाठी सरकारने योग्य ती पावले उचलली. त्यासाठी मोदी सरकारचे अभिनंदन करायला हवे. आज शेतकरी संकटग्रस्त झाले आहेत. ते खाद्यान्नाचे भाव वाढले नाहीत म्हणून नव्हे, त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे ती २०१४-१५ आणि २०१५-१६ या पाठोपाठच्या दोन वर्षांतील दुष्काळामुळे.**

---

होतो ते जाणून घेण्याचा आपण प्रयत्न करू या. शेतकरी समुहातील सीमांत शेतकरी, अल्प भूधारक शेतकरी आणि मध्यम आकारमानाची शेती असणारे शेतकरी यांच्या खिशात शेतमालाचे भाव वाढल्यामुळे चार चव्वल जास्त पडण्याची सुतराम शक्यता नाही. कृषी मूल्य आयोगाच्या ताज्या अहवालात ओडिसा राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध गटांत या भाव वाढीच्या लाभाचे वाटप कसे होईल हे दर्शीविणारा तक्ता देण्यात आला आहे. चोखंदळ वाचकांनी तो नीट समजून घ्यावा. अल्प भूधारक शेतकरी त्यांच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी खाद्यान्न खरेदी करायला ग्राहक म्हणून बाजारात प्रवेश करतात. त्यांची खाद्यान्नाचे भाव वाढल्यामुळे होरपळ होणार हे उघडच आहे. एवढेच नव्हे तर मध्यम आकारमानाची शेती असणारे कोरडवाहू शेतकरी खाद्यान्नाचे फक्त ग्राहक नसले तरी त्यांच्याकडे बाजारात विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शेतमाल नसतो. त्यामुळे शेतमाल महाग झाला म्हणून त्यांची ससेहोलपट होत नाही. इतकीच त्यांच्यासाठी जमेची बाजू.

■■■

*लेखका जेष्ठ स्तंभलेखक आणि कृषीक्षेत्राचे अभ्यासक आहेत.*

*ई मेल: padhyeramesh27@gmail.com*

**सुवर्णसंधी!**

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com

आढावा

# माता मृत्यू प्रमाणात आश्वासक घट

-मनिषा वर्मा / पूजा पस्सी



**MMR हे संपूर्ण राष्ट्रीय आरोग्य प्रणालीचे प्रतिबिंब आहे. त्याचे फायदे आणि तोटे यांचे फलित, आंतर क्षेत्रीय सहभाग, पारदर्शिता आणि विषमता या सर्वांना ते सूचित करते. याशिवाय ती समाजाची सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक विचारसरणी काय आहे, यावरही भाष्य करते. त्यामुळेच, या देशातील मातांना गर्भवती अवस्थेत वा प्रसूतीदरम्यान येणाऱ्या समस्यांना दूर ठेवण्यात वा निवारण करण्यात येथील आरोग्य व्यवस्था किती यशस्वी ठरली आहे, हे ते गुणोत्तर दर्शवते. त्याचप्रमाणे, एकंदर देशाच्या प्रगती व विकासाचे चित्रही रंगवते.**

भारतातील माता मृत्यूचे प्रमाण १९९० ते २०१५ या कालावधीत तीन चतुर्थांश इतक्याने कमी झाले आहे. माता मृत्यू दराच्या बाबतीतील सहस्त्रक विकास उद्दिष्ट ५.१ हे भारताने गाठले आहे आणि ही मोठीच प्रगती आहे. आत्ताच्या नमुना नोंदणी पध्दतीच्या माहितीनुसार भारताचे माता मृत्यू गुणोत्तर (MMR) आता १३० प्रति लाख जीवित प्रसूती असे आहे. २०११-१३ मध्ये हेच प्रमाण १६७ प्रति लाख जीवित प्रसूती असे होते. याचाच अर्थ तब्बल ३७ अंकांनी हे प्रमाण कमी झाले आहे.

सहस्त्रक विकास ध्येय (MDG) याचे उद्दिष्ट कसे गाठता आले, याचा विचार करण्यापूर्वी माता मृत्यू गुणोत्तर (MMR) याचे काय महत्त्व आहे, हे समजून घेऊया. गर्भारपण वा (अपघात किंवा प्रासंगिक कारण सोडून) गर्भारपण आणि प्रसूती या दरम्यानचे व्यवस्थापन अथवा गर्भपातानंतरचे बेचाळीस दिवस (गर्भारपणाचा कालावधी वा स्थान यांना विचारात न घेता) या सर्वांमुळे उद्भवलेले माता मृत्यू प्रति एक हजार संतती जन्म अशी माता मृत्यू गुणोत्तराची व्याख्या केली आहे. येथे हे गुणोत्तर आहे, दर नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. प्रसूतिक्षम महिलांची संख्या (साधारण १४ ते ४५) ही माता मृत्यू दर काढताना छेद संख्या म्हणून घेतली जाते. मात्र माता मृत्यू गुणोत्तर काढताना छेद संख्या ही संतती जन्म संख्या आहे. यामध्ये माता गर्भवती झाल्यावर तिच्या जीवनाला असलेल्या धोक्याची सूचना आहे. यामध्ये प्रजोत्पत्ती क्षमतेला विचारात घेतलेले नाही. त्यामुळे माता मृत्यू दरापेक्षाही याला प्रमाण मानण्यात आले आहे. यामुळे मग पुढील प्रश्न उद्भवतो. माता मृत्यू गुणोत्तर हा एक महत्त्वाचा निर्देशक का मानण्यात येतो? त्याचे महत्त्व काय? MMR हे संपूर्ण राष्ट्रीय आरोग्य प्रणालीचे प्रतिबिंब आहे. त्याचे फायदे आणि तोटे यांचे फलित, आंतर क्षेत्रीय सहभाग, पारदर्शिता आणि विषमता या सर्वांना ते सूचित करते. याशिवाय ती समाजाची सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक विचारसरणी काय आहे, यावरही भाष्य करते. त्यामुळेच, या देशातील मातांना गर्भवती अवस्थेत वा प्रसूतीदरम्यान येणाऱ्या समस्यांना दूर ठेवण्यात वा निवारण करण्यात येथील आरोग्य व्यवस्था किती यशस्वी ठरली आहे, हे ते गुणोत्तर दर्शवते. त्याचप्रमाणे, एकंदर देशाच्या प्रगती व विकासाचे चित्रही रंगवते.

आपल्याला MMR चे महत्त्व कळलेच असेल आणि आपल्या भारताने MDG दर्जाही प्राप्त केला आहे. आता या दर्जाला प्राप्त करण्याचा टप्पा पार करणे का विशेष आहे? २०१३ पासून २२% माता मृत्यू गुणोत्तर कमी झाले. याचा अर्थ

भारताने माता मृत्यूचे प्रमाण चांगलेच कमी केले आहे. २०१३ च्या तुलनेत २०१६ मध्ये वार्षिक माता मृत्यू बारा हजारांनी कमी झाले. पूर्वी ४४००० ही माता मृत्यूंची संख्या होती. ती आता ३२००० झाली आहे. म्हणजेच, प्रति दिवस २०१३ च्या तुलनेत ३० माता गर्भारपण वा प्रसूती दरम्यान दगावत नाहीत. उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि आसाम हे यात अग्रभागी आहेत. त्यांच्या MMR मध्ये ६० इतक्या संख्येने घसरण झाली आहे. (त्यांचा MMR हा MDG ध्येयापेक्षा जास्त आहे) टक्केवारीत सांगायचे झाल्यास उत्तरप्रदेश/उत्तराखंड (२९%), केरळ (२५%), मध्य प्रदेश/छत्तीसगड (२२%) यांच्या MMR मध्ये घट झाली आहे. ती घट राष्ट्रीय सरासरी २२% पेक्षा जास्त किंवा समान आहे. ही आकडेवारी फार आश्वासक आहे. आपले प्रयत्न योग्य दिशेने चालू आहेत, हे कळल्याने उत्तेजन मिळते. यामुळेच, संयुक्त वार्षिक MMR गुणोत्तरात घट या संख्येत ३८% वाढ झाल्याने आपण त्यात झेप घेतली आहे असे म्हणता येईल. पूर्वी तो ५.८ टक्के (२००७-०९ ते २०११-१३) होता. तो ८.०१ टक्के (२०११-१३ ते २०१४-१६) झाला आहे.

एकंदर १० राज्यांनी MMR, MDG उद्दिष्ट (१३९/प्रति लाख संतती जन्म) गाठले आहे आणि सहा राज्यांनी राष्ट्रीय आरोग्य धोरण उद्दिष्ट १०० प्रति लाख संतती जन्म इतके साध्य केले आहे. भारत SGD, MMR उद्दिष्ट ७०/१लाख संतती जन्म गाठण्याच्या मार्गावर आहे. कारण (केरळ (४६), महाराष्ट्र (६१) आणि तामिळनाडू (६६) यांनी हे आत्ताच साध्य केले आहे.

यातून एक विचार येतो की, हे सर्व साध्य करायला काय काय करावे लागले असेल, हे कदाचित सोपे वाटेल. परंतू, या बाबतीत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची भूमिका बहूपेडी आहे. मंत्रालयाने पुरवठा, मागणी, सहज उपलब्धता, गर्भारपणासंबंधी आरोग्य व्यवस्थेचा खर्च, कार्यक्रमांतर्गत घटक अशा अनेक घटकांवर विचार केला आहे.

आता मागणी वाढवणे, याविषयी पाहू या. यामध्ये सुरक्षित प्रसूती या उद्दिष्टांतर्गत आरोग्य सुविधांकडे गर्भवती महिलेला घेऊन येणे, हे येते आणि आपत्कालीन प्रसूती काळजी इत्यादि मुद्दे येतात. जननी सुरक्षा योजना (JSY) ही योजना अंमलात आणली जात आहे. याचा फायदा १.०४ कोटी गर्भवती महिलांना झाला आहे. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम हा राबवला जात आहे. शासकीय आरोग्य केंद्रात प्रसूती होणाऱ्या प्रत्येक गर्भवती महिलेला मोफत औषध, निदान, आहार, मोफत प्रसूती वा शस्त्रक्रियेद्वारा प्रसुती, घरी आणणे व सोडणे इत्यादि सुविधा या कार्यक्रमांतर्गत पुरविल्या जातात. या सुविधा आजारी अर्भकांना साधारण १ वर्ष पुरविल्या जातात. १.३ कोटीहून जास्त गर्भवती महिलांना JSSK चे फायदे प्रतिवर्षी मिळतात. २४००० हून जास्त रूग्ण वाहिका यासाठी वापरल्या जात आहेत. एका टोलमुक्त क्रमांकावर आधारित (आणीबाणीसदृश परिस्थितीत) वाहतूक सेवा यासाठी यांचा वापर होतो. आता पुरवठा या मुद्दयाकडे पाहू. प्रसूतीसंबंधी माता, नवजात शिशु आणि पौगंडावस्थेतील बालक यांसाठी आरोग्य सेवेसाठी एकात्मिक निधी पुरविला जातो. यातून प्रसूती केंद्रांना भरभक्कम आधार मिळतो. अशा २०,००० प्रसूती केंद्रांना प्रसूती केंद्र म्हणून सुसज्ज केले आहे. बावीसशेहून अधिक सुविधा या प्रथम आधार केंद्रात (FRU) सुरू केल्या आहेत. यातून गंभीर प्रसूती सुरक्षा सेवा पुरवल्या जातात. याशिवाय, पन्नासहून अधिक प्रसूतीसंबंधी HDUS / ICUS (अतिदक्षता विभाग) उभारले आहेत. यातून, मातांना गुंतागुंतीच्या जिवावर बेतू शकतील अशा आरोग्य समस्यांमध्ये उपयोगी सेवा पुरवल्या जातात. गर्भवती महिला व बाळांना अत्युत्तम दर्जाच्या आरोग्य व्यवस्था पुरवण्यासाठी शंभर, पन्नास वा तीस खाटांच्या माता व शिशु आरोग्य (MCH) कक्षांना मंजुरी मिळाली आहे. जेथे जास्त खाटा गर्भवती महिलांसाठी लागत असतील, तेथे एकंदर ३२,००० जास्त खाटा या एकंदर २५ राज्यांतील ५९० आरोग्य केंद्रात पुरवल्या आहेत. पुरेसा आणि सुरक्षित रक्ताचा व रक्तघटकांचा पुरवठा हा घटक, पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वाचा ठरतो. यासाठी, १३३ रक्त पेढी आणि १३५२ रक्त साठवणूक केंद्रेही कार्यरत आहेत. केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर २.२७ लाखाहून अधिक मानव संसाधने ही अस्तित्त्वात आहेत. यात,

**प्रसूतीसंबंधी माता, नवजात शिशु आणि पौगंडावस्थेतील बालक यांसाठी आरोग्य सेवेसाठी एकात्मिक निधी पुरविला जातो. यातून प्रसूती केंद्रांना भरभक्कम आधार मिळतो. अशा २०,००० प्रसूती केंद्रांना प्रसूती केंद्र म्हणून सुसज्ज केले आहे. बावीसशेहून अधिक सुविधा या प्रथम आधार केंद्रात (FRU) सुरू केल्या आहेत. यातून गंभीर प्रसूती सुरक्षा सेवा पुरवल्या जातात. याशिवाय, पन्नासहून अधिक प्रसूतीसंबंधी HDUS / ICUS (अतिदक्षता विभाग) उभारले आहेत. यातून, मातांना गुंतागुंतीच्या जिवावर बेतू शकतील अशा आरोग्य समस्यांमध्ये उपयोगी सेवा पुरवल्या जातात.**

विशेषज्ञ, डॉक्टर, परिचारिका, आयुष (AYUSH), परावैद्यक अंतर्भूत आहेत. दुर्गम भागात सुविधा मिळाव्या यासाठी आणि उपलब्धता सुधारावी यासाठी १० लाख अधिकृत मान्यताप्राप्त आरोग्य कार्यकर्ते (ASHA'S) नेमलेले आहेत. मानवी संसाधने ही केवळ नेमलेली नाहीत, तर त्यांची पूर्ण क्षमता उपयोगात आणण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. MBBS पदवीप्राप्त डॉक्टरांना भूलतंत्र (LSAS) आणि प्रसूतिसंबंधी आस्था आणि सिझर शस्त्रक्रिया (EMOC) कौशल्ये यावीत, यासाठी प्रयत्न चालू आहेत. खूपदा या सर्व क्रियांतील विशेषज्ञांची ग्रामीण भागात टंचाई जाणवते. त्यावर यातून मात करता येईल. आत्तापर्यंत १८०० वैद्यकीय अधिकाऱ्यांना EMOC चे प्रशिक्षण दिले आहे, तर २२०० वैद्यकीय अधिकाऱ्यांना LSAS चे प्रशिक्षण दिले आहे. याचप्रमाणे, ५ राष्ट्रीय कौशल्य प्रयोगशाळा आणि ५४ कौशल्य शाळा आजपर्यंत स्थापन केल्या आहेत. यामध्ये प्रसूतिकेंद्रामध्ये १०,००० आरोग्य सुविधा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.

कार्यक्रम आघाडीवर विचार केल्यास सुरक्षेविषयक आस्था या धोरणाशी सुसंगत असेच धोरण आखले जात आहे. RMNCH+A या पूर्वीच्या धोरणाची चांगली आखणी करून त्यासोबत गर्भवती, स्तनदा महिला आणि पौगंडावस्थेतील मुली अशा आयुष्याच्या भिन्न अवस्थातील स्त्रियांना लोह आणि फॉलिक ॲसिडचे पूरक वाटप हे आरोग्य केंद्रात व दुर्गम भागात जाऊन केले जात आहे. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान २०१६ मध्ये सुरू झाले. यामध्ये प्रसूतीपूर्व काळजी घेण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला स्त्रियांची तपासणी होते. आजपर्यंत १.२५ कोटी स्त्रियांची प्रसूतीपूर्व तपासणी झाली आहे.

आरोग्य सुरक्षा माता व बालक यांची नोंदणी (MCTS) आणि माता व बालक नोंद सुविधा केंद्र यामध्ये वाढत्या प्रमाणावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. नाव, दूरध्वनी, पत्ता यावर आधारित Webenabled प्रणाली सुरू झाली आहे. यात प्रत्येक गर्भवती महिला (१३.५४ कोटी गर्भवती महिला) आणि मुले (११.७ कोटी मुले) यांची नोंदणी झाली आहे. यामुळे, त्यांना

**आरोग्य सुरक्षा माता व बालक यांची नोंदणी (MCTS) आणि माता व बालक नोंद सुविधा केंद्र यामध्ये वाढत्या प्रमाणावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. नाव, दूरध्वनी, पत्ता यावर आधारित Webenabled प्रणाली सुरू झाली आहे. यात प्रत्येक गर्भवती महिला (१३.५४ कोटी गर्भवती महिला) आणि मुले (११.७ कोटी मुले) यांची नोंदणी झाली आहे. यामुळे, त्यांना वेळेवर दर्जेदार आरोग्य सुविधा (ANC, JSY) व लसीकरण इत्यादि मिळेल.**

वेळेवर दर्जेदार आरोग्य सुविधा (ANC, JSY) व लसीकरण इत्यादि मिळेल.

वरील समग्र विवेचन हे मंत्रालय करीत असलेल्या प्रयत्नांविषयी असले तरी ते फक्त हिमनगाचे शिखर आहे. आजचा MMR साध्य करताना वेगवेगळी राज्ये आणि विकासाचे भागीदार घटकही कारणीभूत आहेत. सर्व हितसंबंधींनी आपली ताकद एकवटली नसती, तर हे गुणोत्तर गाठता आले नसते. विशेषत:, आरोग्य अधिकारी व तळागाळातील गर्भवती महिलांपर्यंत आरोग्य सुविधा पोहचविण्यासाठी प्रयत्नशील आरोग्य कर्मचारी यांचा उल्लेख येथे केला पाहिजे.

माता मृत्यूसंबंधी धोरणात्मक विकास ध्येयाचे उद्दिष्ट गाठण्याचे वैश्विक साल जरी २०३० असले तरी आपला देश ते आधीच गाठण्यासाठी सज्ज आहे. हे आपण साध्य करण्यासाठी आता प्रत्येक राज्याने त्यांच्या प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण आव्हानावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. आपण बरेचदा म्हणतो, भारतातील प्रत्येक राज्य हे एक प्रकारे स्वतंत्र देश आहे आणि या प्रादेशिक भिन्नता ओळखून त्यावर आपण उपाययोजना केली पाहिजे, म्हणजे अजून काही मातांना वाचविता येईल.

■■■

*लेखका मनिषा वर्मा केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या माध्यम प्रमुख आहेत तर पुजा पस्सी याच मंत्रालयात वरिल सल्लागार आहेत.*

*ई मेल:* *v.manisha@gmail.com*
*drpooja.mohfki@yahoo.in*



विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# उत्पादक वृद्धत्व

- डॉ. शैलु श्रीनिवासन



**वार्धक्याचे शास्त्र आणि न्युरो मानसशास्त्रातील संशोधनाने हे दाखवून दिले आहे की, मानसिक हालचालीमुळे मज्जातंतुतून बाहेर पडणारे मज्जाधागे विकसित होतात जे इतर मज्जातंतुंशी संपर्क स्थापित करतात. हे मज्जाधागे जेव्हा मन विचारहीन असते तेव्हा आकुंचन पावतात. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर जेव्हा एखादी व्यक्ती प्रश्न सोडवण्याचे थांबवते तेव्हा जिथे प्रश्न सोडवता येत नाहीत अशा बिंदूपाशी येऊन पोहोचते. यातून मिळत असलेला धडा: सतत विचार करत रहा.**

उत्पादक वृद्धत्व (Productive Ageing) ही संकल्पना शरीरातील जोमदारपणाची पातळी आणि शारीरिक हालचाली करण्याची तसेच मानसिक कार्यक्षमता यांच्यातील सातत्यपूर्ण सुसंवादाच्या पातळी यातच सामावलेली आहे, या ठोस शास्त्रीय पुराव्यावर आधारलेली आहे. बहुतेक स्वरूपाच्या मानसिक कार्यक्षमतेत वाढत्या वयामुळे होणारे बिघाड परत फिरवले जाऊ शकतात. सध्या सिनेजेनिक्स हे अगदी अलीकडचे उदयास येऊ लागलेले शास्त्र वास्तविक रामबाण उपाय असून वास्तवात लासवेगास सारख्या शहरांत तर ही जोरदार लाट आली आहे. त्याचा नियमित सराव करणाऱ्यास त्याच्या अमूल्यपणाची खात्रीच मिळते. (टाईम, २५ एप्रिल, २०११) वार्धक्याचे शास्त्र आणि न्युरो मानसशास्त्रातील संशोधनाने हे दाखवून दिले आहे की, मानसिक हालचालीमुळे मज्जातंतुतून बाहेर पडणारे मज्जाधागे विकसित होतात जे इतर मज्जातंतुंशी संपर्क स्थापित करतात. हे मज्जाधागे जेव्हा मन विचारहीन असते तेव्हा आकुंचन पावतात. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर जेव्हा एखादी व्यक्ती प्रश्न सोडवण्याचे थांबवते तेव्हा जिथे प्रश्न सोडवता येत नाहीत अशा बिंदूपाशी येऊन पोहोचते. यातून मिळत असलेला धडा: सतत विचार करत रहा. तुम्ही जर सक्रीय राहिलात तर वृद्धत्व आणि त्याचे भीतीदायक ढासळत जाणे हा प्रकार राहणारच नाही. निवड तुमच्या हातात आहे.

या बाबतीत जे शैक्षणिक सिद्धांत आहेत - विअर अँड टिअर सिद्धांत, न्युरो इंडोक्राईन सिद्धांत, उत्क्रांती विरुद्ध जीवाचा इतिहास सिद्धांत, अनुवांशिक नियंत्रण सिद्धांत, फ्री रॅडिकल सिद्धांत, चरबी संचय सिद्धांत, कॅलरी मर्यादा सिद्धांत, उत्पादक वृद्धत्व- ज्या सिद्धान्तांमुळे आपण आज दीर्घायुष्याचा आनंद घेत आहोत आणि वृद्धांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यास वास्तवात मदत झाली आहे, त्या सिद्धांताचे स्वागत करण्याचा विचार काही गैर नाही. वस्तुत: अशा प्रकारच्या ज्ञानामुळे रोजच्या जीवनात काहीसे चैतन्य निर्माण करता येते आणि ज्येष्ठ नागरिक असा सकारात्मक पवित्रा घेऊन स्वत:ला प्रेरणा देऊ शकतात. मी जेव्हा वृद्धत्वावर संशोधनाचा धांडोळा घेतला तेव्हा मी अत्यंत उत्साहित झालो होतो.

वाढत्या वयावरील संशोधनाच्या क्षेत्रात गेल्या दशकात संपूर्ण संक्रमण झाले आहे. जेव्हा एकेरी गुणसूत्रे बदलली जातात तेव्हा जे प्राणी वृद्ध असायला हवेत ते तरुणच राहतात. मानवामध्ये उत्क्रांत झालेल्या गुणसुत्रांमुळे ९० वर्षाचा वृद्ध ४५ वर्षे वयाच्या व्यक्तीसारखा दिसतो आणि त्यालाही तसेच वाटते, असे होऊ शकेल. या आधारावर आम्ही असे विचार करण्यास

सुरुवात करतो की वाढते वय हा असा आजार आहे जो बरा करता येऊ शकतो किंवा किमान पुढे तरी ढकलता येतो. वृद्धत्वाचा अभ्यास करण्याच्या क्षेत्रात जणू संशोधनाचा स्फोट होण्यास सुरुवात झाली आहे कारण अनेक जण वृद्धत्वाची आणि कदाचित तारुण्याच्या कारंज्याची कारणे शोधण्याच्या आणि ती सापडण्याच्या शक्यतेने उत्तेजित झाले आहेत. वृद्धत्ववाद म्हणजे वृद्धांबद्दल जे काही चुकीचे ठराविक छापाचे गैरसमज आणि अफवा आहेत, त्या दूर करण्यास ज्ञान हाच सर्वात मुलभूत उपाय ठरेल.

परंतु या सर्व पाश्चात्य प्रबळ संकल्पना आहेत. भारतात आम्ही अजूनही देशातील साठीच्या वरील वयाच्या ९ कोटी दहा लाख लोकांसाठी अन्न, निवारा, वैद्यकीय सेवा, विमा, उत्पन्नाची सुरक्षा अशा प्रश्नांशी झुंज देण्याच्याच अवस्थेत आहोत. देशावर राज्य करणाऱ्या सरकारचा मोठ्या प्रमाणावर पुढाकार आवश्यक असला तरीही काही विषय असे आहेत की ज्यात एनजीओज आणि समूह कार्य करू शकतात. या लेखात त्याबाबत माझ्या कल्पना मांडल्या आहेत.

ज्या समाजात वृद्ध व्यक्तींबद्दल नकारात्मक प्रतिमा आहे आणि परिणामस्वरूप पक्षपात पराकोटीच्या वाईट स्तरावर आहे, त्या समाजात एखादा काय करू शकेल, हा मूळ प्रश्न आहे. एक उदाहरण म्हणून हे पहा. मुंबईतील ८१ वर्षांचे ई ए अब्राहम यांची दैना अशी की, त्यांना संस्कृत शिकण्यासाठी एका स्थानिक महाविद्यालयात नाव नोंदवायचे होते. सर्वत्र त्यांना वयाच्या मुद्यावर प्रवेश नाकारण्यात आला. अखेर त्यांनी मुंबई विद्यापीठात पीएच डी पदवीसाठी काम सुरु केले. कारण ती एकच शक्यता त्यांच्यासाठी उरली होती जिथे वय बाद होण्याचा प्रश्न नाही.

उत्पादक वृद्धत्वास संधी नाकारल्याची अनेक उदाहरणे डिग्निटी डायलॉग या भल्या मोठ्या ग्रंथात वृद्धत्व शास्त्रासंबंधी साहित्यात नोंद केलेली आढळतात. उत्पादक वृद्धत्ववरील मासिक असून त्यात वर्गणीदारांनी आपले दु:ख, निराशा, भ्रमनिरास आणि अगदी फसवणुकीलाही वाचा फोडली आहे.

वयस्कर लोकांचे जीवन अधिक सुकर होण्यासाठी त्यांना रचनात्मक संधी देण्याची तरतूद करणे हे मग आपल्यापुढील आव्हान आहे कारण देशाच्या वयासंबंधी कल्पनाचित्रात युरोप आणि जपान यांतील नेहमी आढळणारे कल गृहीत धरले आहेत. जुलै १९९६ मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित पहिल्या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवताना टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे माजी संचालक डॉ. पार्थनाथ मुखर्जी यांनी केवळ वृद्ध नागरिकांसाठी असलेल्या आमच्या संगणक वर्गात संगणकीय कौशल्य शिकून घेतले. त्यांनी सांगितले की, “भारताचा लोकसंख्याविषयक कल पाहता अशा उच्च अखेरीच्या संधी पुरवण्यासाठी वैयक्तिक एनजीओजचा पुढाकार अत्यंत महत्वपूर्ण आहे. सरकारपेक्षा एनजीओ क्षेत्र अधिक नाविन्यपूर्ण कल्पना घेऊन पुढे येत आहे असे दिसते.’’

**भारतातील मध्यमवर्गीय ज्येष्ठ नागरिक ज्ञान आणि उत्पादक वृद्धत्व उपक्रम अत्यंत जलद गतीने आत्मसात करून घेतात. पश्चिमेत जेथे निवृत्तीनंतर फावला वेळ घालवणे, सुट्ट्याचा आनंद लुटणे, उत्तम अन्न, मौजमजा आणि उड्या मारणे यावर जोर दिला जातो. त्याच्या अगदी विपरीत भारतीय ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यासाठी संधी स्वीकारतात. भारतातील निवृत्त व्यक्ती निवृत्तीनंतरचे जीवन वेळ घालवण्यासाठी विरंगुळा आणि मौजमजा यापासून दूर जात एखाद्या सामाजिक कार्यासाठी काम करण्याला उच्च प्राधान्य देते.**

सामाजिक कार्यकर्ता आणि समाजशास्त्राचा विद्यार्थी या नात्याने आणि ज्येष्ठ नागरिकांना संपन्न जीवन जगता यावे म्हणून सेवा चालवणारा म्हणून माझा अनुभवजन्य निष्कर्ष असा आहे की, भारतातील मध्यमवर्गीय ज्येष्ठ नागरिक ज्ञान आणि उत्पादक वृद्धत्व उपक्रम अत्यंत जलद गतीने आत्मसात करून घेतात. पश्चिमेत जेथे निवृत्तीनंतर फावला वेळ घालवणे, सुट्ट्याचा आनंद लुटणे, उत्तम अन्न, मौजमजा आणि उड्या मारणे यावर जोर दिला जातो. त्याच्या अगदी विपरीत भारतीय ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यासाठी संधी स्वीकारतात. भारतातील निवृत्त व्यक्ती निवृत्तीनंतरचे जीवन वेळ घालवण्यासाठी विरंगुळा आणि मौजमजा यापासून दूर जात एखाद्या सामाजिक कार्यासाठी काम करण्याला उच्च प्राधान्य देते.

वरील वाक्याचा पुरावा मुंबईत ६६३ वयोवृद्ध नागरिकांनी मुंबई महापालिकेशी सहकार्य करून ‘क्लीनिंग मुंबई विथ डिग्निटी’ या प्रकल्पात सहभाग घेतला त्यात पाहता येतो. त्यांचे सकाळचे फिरणे पालिकेच्या सफाई कामगारांशी चर्चेत परिवर्तीत झाले असून त्यांच्या साप्ताहिक बैठकीचे रुपांतर नागरी समस्या विषयक आपले अनुभव सांगून प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत त्या सोडवण्याच्या पध्दतीवर चर्चेत झाले आहे. स्वातंत्र्य दिन साजरा करताना त्याची सांगड कचऱ्यापासून मुक्ती आंदोलनाशी घातली गेली. समुदायाचे नेते म्हणून ज्येष्ठ नागरिकांना देण्यात

आलेल्या संधीचा त्यांनी पुरेपूर स्वीकार करत रहिवाशांना कचरा रस्त्यावर फेकण्यापासून परावृत्त करण्यात मदत केली. त्यांचे स्वत:चे आदर्श रस्ते इतर नागरिकांना अनुकरणासाठी दाखवण्याची त्यांनी तयारी दर्शवली जाते. कचऱ्याचे वर्गीकरण आणि इमारतीच्या आवारात कम्पोस्ट खत प्रकल्प म्हणजे ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या चमकदार सामाजिक सेवेच्या पाऊलखुणा आहेत. पर्यावरण रक्षणाप्रती प्रचंड उत्साह त्यांना सक्रीय आणि सामाजिक दृष्ट्या एकात्मिक राहण्याच्या गरजेला दिशा दाखवतो. वाढत्या वयाबाबत सहसा अस्तित्वात असलेल्या सामाजिक नकारावरील सामाजिक सेवा हाच जालीम उतारा आहे, या निष्कर्षाला पुष्टी देणारे हे ज्येष्ठ नागरिक साक्ष आहेत.

किंवा त्यांच्या हेल्पलाईनचे उदाहरण घ्या, जिथे २०० ज्येष्ठ स्वयंसेवक मुंबईतील एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठांना साहचर्य सेवा देण्याचे काम करत आहेत. हेल्पलाईनमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेविका नर्गिस ओलिया (७५) या सांगतात की, काही वेळा ज्येष्ठ नागरिक फोनवर तब्बल चाळीस मिनिटे बोलतात आणि आपल्या जीवनातील अनुभव सांगत असतात.'' सर्व स्वयंसेवक ५० वयाच्या वरील असून ते संपत्तीशी संबंधित मुद्यांवर मुले किंवा नातेवाईक यांच्याकडून छळ केल्या जाणाऱ्या वृद्ध नागरिकांशी संपर्क स्थापित करण्यात यशस्वी झाले आहेत. स्वर्गीय मेत्रानी (८५) यांनी सांगितले की, सामाजिक पाठिंब्याची गरज असलेल्या वृद्ध लोकांपर्यंत गेल्यावर आमचे स्वत:च्या आयुष्यातील कंटाळवाणेपण आणि निराशा जी मला चिंताजनक वाटत होती त्यापासून आमची सुटका झाली.''

उत्पादक वृद्धत्व या कल्पनेला लाभदायक काम इतक्यापुरतेच मर्यादित ठेवले जाता कामा नये. दुसरी कारकीर्द किंवा निवृत्तीनंतर उद्योग याची आदर्श व्याख्या काम आणि विरंगुळा यांचा सर्वोत्कृष्ट मिलाफ अशी केली पाहिजे. जेव्हा उत्पादकतेच्या कल्पनेचा विस्तार कामगार वर्गातील सहभागाच्या पुढे जाऊन अत्यंत आवडीने हाती घेतलेले उपक्रम (जे तुम्हाला नेहमीच करावे वाटत होते परंतु पहिल्या कारकिर्दीत तुम्ही करू शकत नव्हता) यांना सामाजिक महत्व प्राप्त होते.

**ज्येष्ठ नागरिकांमधील उत्पादकतेची सर्वोच्च अभिव्यक्ती म्हणजे स्वप्रतिष्ठा. भारतातील ज्येष्ठ नागरिकाला प्रसिद्धी, नाव, पैसा किंवा भाग्य हे काही नको असते, त्याला हवी असते प्रतिष्ठा. त्याची केवळ जाणीव असणेच नव्हे तर उत्पादक असलेले इतरांनी पाहण्याने त्याच्या स्व आदराच्या जाणीवेला प्रचंड मूल्य प्राप्त होते. जेव्हा नातू आपली आज्जी स्वत:चे आयुष्य काही तरी अर्थ आणि उद्देश्यासाठी जगत आहे, हे पाहतो तेव्हा त्याला आपल्या आज्जीबद्दल विशिष्ट प्रमाणात अभिमान तर वाटतोच परंतु आपल्या आज्जीच्या व्यस्त कार्यक्रमाबाबत तो अतिशयोक्ती करण्यात गुंतलेला असतो.**

प्रथम, वेगवेगळ्या पिढ्यांच्या समानतेच्या राजकारणातील युक्तिवादात याचा उपयोग होतो. वाढते वृद्धत्व हे अजूनही उत्पादक आहे हे दाखवून दिल्यास वृद्ध व्यक्ती या कौटुंबिक/ सामाजिक स्त्रोत खाऊन टाकणाऱ्या आहेत, ही समजूत नाकारण्यास मदत होते. दुसरे, वृद्ध वयात उत्पादकतेचे निश्चितच मानसिक फायदे आहेत जसे की, उत्तम आरोग्य, प्रेरणा मिळणे, आकलनात्मक कार्यरत असणे, जीवनात समाधान किंवा स्वयं वास्तविकीकरण इत्यादी. तिसरे, समाजाच्या किरकोळ लाभांवर जगण्यापेक्षा सामाजिक एकत्मिकता आणि सहभाग यामुळे त्याचे सामाजिक महत्वही आहे.

ज्येष्ठ नागरिकांमधील उत्पादकतेची सर्वोच्च अभिव्यक्ती म्हणजे स्वप्रतिष्ठा. भारतातील ज्येष्ठ नागरिकाला प्रसिद्धी, नाव, पैसा किंवा भाग्य हे काही नको असते, त्याला हवी असते प्रतिष्ठा. त्याची केवळ जाणीव असणेच नव्हे तर उत्पादक असलेले इतरांनी पाहण्याने त्याच्या स्व आदराच्या जाणीवेला प्रचंड मूल्य प्राप्त होते. जेव्हा नातू आपली आज्जी स्वत:चे आयुष्य काही तरी अर्थ आणि उद्देश्यासाठी जगत आहे, हे पाहतो तेव्हा त्याला आपल्या आज्जीबद्दल विशिष्ट प्रमाणात अभिमान तर वाटतोच परंतु आपल्या आज्जीच्या व्यस्त कार्यक्रमाबाबत तो अतिशयोक्ती करण्यात गुंतलेला असतो. नव्या पिढीला आपले उत्पादक आई वडील आणि आज्जी आजोबांबद्दल अभिमानी असण्यात आनंद वाटतो ज्यांनी संवादाच्या माध्यमातून स्वत:ची काळजी घेण्याचे शिकले आहेत आणि आपल्या अर्थपूर्ण उद्योगांत ज्यांनी स्वत:ला गुंतवून घेतले आहे. डिग्निटी फाऊंडेशनने घेतलेल्या मुलाखती, लेख, वैयक्तिक बैठका, पत्रव्यवहार यांतून समोर आलेले हे आमचे वास्तविक निष्कर्ष आहेत. ज्येष्ठ नागरिकांची इच्छा त्याचे/तिचे उरलेले आयुष्य आदर आणि प्रतिष्ठेने जगावे, हीच असते.

वृद्धत्व म्हणजे संन्यासावर भर दिलेला जीवनाचा अखेरचा भाग हा प्राचीन आणि मध्य युगीन दृष्टीकोन झपाट्याने बदलत असून आधुनिकतेचा ऐहिक, वैज्ञानिक आणि वैयक्तिक दृष्टीकोनासाठी मार्ग मोकळा करून देत आहे. किमान स्वातंत्र्योत्तर काळात जन्माला आलेली पिढीबाबत हे खरे

आहे जिला उदारमतवादी शिक्षणाचे लाभ झाले आहेत.

समाजाच्या उत्पादक क्षमतेत संभाव्य योगदान देणारे म्हणून वृद्ध लोकाना समजणे हा उपसिद्धांत तितकाच महत्वाचा आहे जितका की ते महत्वाची बाजारपेठ घडवू शकतात यास मान्यता देणे आहे. वॉल स्ट्रीट जर्नलने म्हणूनच असे जाहीर केले की, वृद्धत्व आणि त्यामुळे होणारे आजार यांचा समावेश करणारी वैद्यक शास्त्राची शाखा जराविज्ञान यात खूप सोन्याचा खजिना आहे- भारतात व्यावसायिकांनी या क्षमतेचा मोठ्या प्रमाणावर शोध घेतलेलाच नाही. विमा, गृहनिर्माण, आरोग्य, सुट्ट्या आणि सांस्कृतिक अभिमुख काळजी घेणाऱ्या सेवा खास ज्येष्ठ नागरिकांसाठी असण्याची गरज आहे. हे होत नाही तोपर्यंत एनजीओजना ज्येष्ठ नागरिक उत्पादक वृद्धत्वाच्या शक्यतांकडे वळतील, या दृष्टीने खतपाणी घालून बहुमुल्य सेवा द्याव्या लागतील. डिग्निटी फाऊंडेशन संस्थेने २०११ मध्ये मुंबई, चेन्नई, बेंगळूरू आणि पुण्यात सप्टेंबर मध्ये आयोजित केलेल्या निवृत्तीविषयक प्रदर्शनात वृद्ध लोकांना समोर ठेवून उत्पादने आणि सेवांच्या बाजारपेठीय क्षमता अधोरेखित केल्या होत्या.

भारतातील वृद्धांबद्दल असलेली मोठी जबाबदारी आणि वृद्ध लोकसंख्येचा होणारा परिणाम याची सरकारने दखल घेण्याची वेळ आली आहे. हा विषय अत्यंत गुंतागुंतीचा, विशाल असून त्याच्या आयामांचा विचार करण्यासाठी विशेष ज्ञान असण्याची आवश्यकता आहे. वृद्ध लोकसंख्येचा सर्व स्तरावर होणाऱ्या व्यापक परिणामांचा विचार करण्यासाठी एक विचार गट (Think Tank) नेमा, अशी आम्ही सरकारला विनंती करतो. १९९९ मध्ये वृद्धांसाठी तयार केलेले राष्ट्रीय धोरण अतिशय चमकदार असून प्रागतिक दृष्टीकोणाचे आहे. परंतु वृद्धत्वात नवीन आयामांची भर पडली आहे, उदाहरणार्थ ८० वर्षांच्या वरील वयाच्या लोकांची संख्या उच्च दराने वाढत असून हा दर आता ७०० टक्के इतका झाला आहे. वृद्ध लोकसंख्येचा वाढीचा दर साधारण लोकसंख्येच्या तुलनेत ३५० टक्के इतका उच्च आहे. त्यामुळे भारतातील वयस्कर लोकांच्या गरजा भागवणाऱ्या अनेक योजना त्वरित अमलात आणण्याची आवश्यकता आहे. अनेक एनजीओजनी सरकारकडे साधनसंपत्ती जमा करण्याची तयारी केली असून सरकारकडून पुढाकाराची प्रतीक्षा ते करत आहेत.

**१९९९ मध्ये वृद्धांसाठी तयार केलेले राष्ट्रीय धोरण अतिशय चमकदार असून प्रागतिक दृष्टीकोणाचे आहे. परंतु वृद्धत्वात नवीन आयामांची भर पडली आहे, उदाहरणार्थ ८० वर्षांच्या वरील वयाच्या लोकांची संख्या उच्च दराने वाढत असून हा दर आता ७०० टक्के इतका झाला आहे. वृद्ध लोकसंख्येचा वाढीचा दर साधारण लोकसंख्येच्या तुलनेत ३५० टक्के इतका उच्च आहे. त्यामुळे भारतातील वयस्कर लोकांच्या गरजा भागवणाऱ्या अनेक योजना त्वरित अमलात आणण्याची आवश्यकता आहे.**

राज्य सरकारच्या पातळीवर केरळ, तमिळनाडू, मध्य प्रदेश आणि हिमाचल प्रदेश यासारख्या राज्यांनी वृद्ध लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अनेक प्रशंसनीय योजना तयार केल्या आहेत. एकमेकाकडून शिकण्याला अत्यंत वाव आहे.

येत्या दशकात राजकीय वर्ग आणि नोकरशाहीला शिक्षित करणे हा एनजीओजचा अजेंडा असेल. भारतातील वृद्धत्वाकरता धोरण तयार करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांचा गट आणि मुठभर एनजीओज सरकारबरोबर काम करण्यासाठी अत्यंत सक्रीय आहेत. परंतु नवी दिल्लीतील अनेक मंत्रालयांना काम करण्यासाठी क्रियाशील करण्यास अधिक शाश्वत प्रयत्नांची आवश्यकता आहे. याची सुरुवात म्हणून उत्तम संघटीत अशा एनजीओज, समूह आणि ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना सरकारी विभागांकडे जाऊन एकत्रित आवाज उठवून संवाद साधू शकतील.

■■■

*लेखक डिग्निटी फाऊंडेशन आणि डिग्निटी लाईफस्टाईल फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून डिग्निटी डायलॉग या मासिकाचे संपादक आहेत.*

*ई मेल: sheilu.sreeninasan@dignityfoundation.com*

**आगामी अंक**
**विशेषांक**
**सप्टेंबर २०१८**
**'रोजगार आणि स्वयंरोजगार'**

# पंतप्रधानांनी साधला देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ ब्रिजच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. सुमारे २ लाखाहून अधिक सामान्य सेवा केंद्रे आणि ६०० कृषी विज्ञान केंद्रे व्हिडिओ ब्रिजच्या माध्यमातून जोडण्यात आली होती. सरकारी योजनांमधील विविध लाभार्थ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधण्याची पंतप्रधानांची ही सातवी वेळ होती.**




- ६०० हून अधिक जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांशी संवाद साधतांना आनंद होत असून, शेतकरी हे आपल्या देशाचे 'अन्नदाता' आहेत, असे पंतप्रधान म्हणाले. देशाच्या अन्नसुरक्षेचे संपूर्ण श्रेय शेतकऱ्यांना द्यायला हवे, असे ते म्हणाले.
- सेंद्रीय शेती, नीलक्रांती, पशुपालन, फलोत्पादन, आदि शेतीसंबंधी क्षेत्रांतील विविध मुद्यांवर पंतप्रधानांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.
- देशातील शेतकऱ्यांच्या सर्वंकष कल्याणाबाबतचे स्वप्न अधोरेखित करतांना पंतप्रधान म्हणाले की, २०२२ सालापर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढविण्यासाठी आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी कमाल भाव मिळावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. शेतीच्या सर्व टप्प्यांमध्ये पेरणीपासून विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे ते म्हणाले. कच्च्या मालाचा कमी दर, उत्पादनाला न्याय भाव,उत्पादनातील नासाडी थांबविणे आणि शेतकऱ्यांना उत्पन्नाचा पर्यायी स्रोत उपलब्ध होईल, याकडे सरकारचे विशेष लक्ष असल्याचे ते म्हणाले.
- 'बियाणे ते बाजारपेठ' या टप्प्यामध्ये विविध उपक्रमांद्वारे पारंपारिक शेती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांना मदत झाली असे शेतकऱ्यांना वाटायला हवे,यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले.
- कृषी क्षेत्राच्या परिवर्तनाबाबत बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले की, गेल्या ४८ महिन्यात कृषी क्षेत्राचा वेगाने विकास केला आहे. याकाळात देशात दुध,फळे आणि भाज्यांचे विक्रमी उत्पादन झाल्याचे त्यांनी सांगितले.
- (२०१४-२०१९) दरम्यान कृषी क्षेत्रासाठी सरकारने जवळपास दुप्पट म्हणजेच २,१२,००० कोटी रुपये इतकी अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. आधीच्या सरकारच्या पाच वर्षांच्या काळात ती १,२१,००० कोटी रुपये इतकी होती. त्याच प्रमाणे २०१७-१८ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन २७९ दशलक्ष टन पर्यंत वाढले. २०१०-२०१४ दरम्यान ते सरासरी २५५ दशलक्ष टन इतके होते. गेल्या ४ वर्षात नीलक्रांतीमुळे मत्स्य शेतीमध्ये २६ टक्के, तर पशुपालन आणि दुध उत्पादनात २४ टक्के वाढ दिसून आली.
- शेतकऱ्यांच्या सर्वांगिण कल्याणासाठी सरकारने मृदा आरोग्य कार्डे, किसान क्रेडिट कार्डाच्या माध्यमातून कर्ज पुरवठा, निमआच्छादित युरीया द्वारे दर्जेदार खत, पिक विमा योजनेद्वारे पिक विमा आणि प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे पंतप्रधानांनी शेतकऱ्यांशी संवाद साधतांना सांगितले. प्रधानमंत्री कृषी सिचाई योजनेअंतर्गत देशभरात आत्तापर्यंत सुमारे १०० सिंचन प्रकल्प पूर्ण केले जात आहेत

आणि सुमारे २९ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यात आली आहे.

- सरकारने शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल योग्य दराने विकता यावा, यासाठी ई-नाम हा ऑनलाईन मंच सुरु केला आहे. गेल्या ४ वर्षात ५८५ हून अधिक नियंत्रित घाऊक बाजारपेठा ई-नाम अंतर्गत आणण्यात आल्या आहेत. सरकारने सुमारे २२ लाख हेक्टर जमीन सेंद्रीय शेती अंतर्गत आणली आहे. २०१३-१४ मध्ये हे प्रमाण केवळ ७ लाख हेक्टर इतके होते. ईशान्य प्रदेशांना सेंद्रीय शेतीचे केंद्र म्हणून प्रोत्साहन देण्याचा सरकारचा विचार आहे.

- शेतकरी उत्पादक गट आणि शेतकरी उत्पादक संघटना स्थापनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी दाखवलेल्या सामुहिक सामर्थ्याबाबत पंतप्रधानांनी यावेळी आनंद व्यक्त केला. या गटांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारा माल कमी दरात उपलब्ध होईल, तसेच त्यांच्या मालाचे विपणन प्रभावीपणे होऊ शकेल. गेल्या ४ वर्षात ५१७ कृषी उत्पादक संघटना स्थापन करण्यात आल्या आणि शेतकऱ्यांमध्ये सहकार्यतेला प्रोत्साहन देण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्राप्तीकरातून सुट देण्यात आली.

**शेतकऱ्यांचे मनोगत**


❖ पंतप्रधानांशी संवाद साधतांना शेतकऱ्यांनी विविध कृषी योजनांच्या उत्पादन सुधारण्यासाठी विविध सरकारी योजनांची कशाप्रकारे मदत झाली याची माहिती दिली. तसेच मृदा आरोग्य कार्डाचे महत्व अधोरेखित केले आणि सहकारी चळवळीचे अनुभव विषद केले.तसेच एकात्मिक शेती पद्धतीचे फायदेही सांगितले.

■■■



# सामाजिक सुरक्षा योजनांच्या लाभार्थ्यांशी पंतप्रधानांनी साधला संवाद

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध सामाजिक सुरक्षा योजनांच्या देशभरातल्या लाभार्थ्यांशी व्हिडिओ ब्रीजच्या माध्यमातून संवाद साधला. अटल विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि वयवंदना योजना या चार महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांच्या लाभार्थ्यांचा यात समावेश होता. विविध सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांशी पंतप्रधानांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद मालिकेतला हा आठवा भाग होता.**




- संकटावर मात करुन उभे राहिलेल्यांशी संवाद साधताना आपल्याला आनंद होत असल्याचे पंतप्रधान म्हणाले. सामाजिक सुरक्षा योजना लोकांना सक्षम करतात. सध्याच्या सरकारच्या सामाजिक सुरक्षा योजना जीवनातील अनिश्चिततेचा सामना प्रभावीपणे करण्यात लोकांना साहाय्य करणाऱ्या आहेत. त्याचबरोबर कुटुंबाला वित्तीय विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी त्यांना सक्षम करत आहेत, असे पंतप्रधान म्हणाले.

- गरीब आणि असुरक्षितांसाठी वित्तीय सुरक्षा पुरवण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचे विविध पैलू पंतप्रधानांनी अधोरेखित केले. ते गरीबांसाठी बँकेची दारे उघडणारे आहेत, लघु उद्योगांसाठी आणि उदयोन्मुख उद्योजकांसाठी भांडवलाची ग्वाही देणारे आहेत आणि गरीब व असुरक्षितांना सामाजिक सुरक्षेचे कवच देणारे आहेत.
- २०१४ ते २०१७ या काळात प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत २८ कोटी बँक खाती उघडण्यात आली. जगभरात उघडण्यात आलेल्या एकूण बँक खात्यांच्या ती ५५ टक्के आहेत, असे पंतप्रधानांनी सांगितले. देशात आता अधिकाधिक महिलांची बँक खाती असल्याबद्दल आणि बँक खात्यांचे प्रमाण २०१४ च्या ५३ टक्क्यांवरुन ८० टक्क्यांवर पोहोचल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला.
- लोकांवर आलेली संकटे पंतप्रधानांनी जाणून घेतली. एखाद्या व्यक्तीच्या निधनामुळे झालेली हानी कधीही भरून काढता येऊ शकत नाही, पण संकटग्रस्त कुटुंबाला आर्थिक सुरक्षेची हमी देण्यासाठी सरकारने नेहमीच प्रयत्न केले असल्याचे पंतप्रधान म्हणाले. सुमारे ३०० रुपयांचा अत्यंत कमी हप्ता असलेल्या प्रधानमंत्री जीवनज्योती योजनेचा लाभ ५ कोटींहून अधिक लोकांना झाला आहे, असे त्यांनी सांगितले.
- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना या अपघात विमा सुरक्षा योजनेचा लाभ १३ कोटींहून अधिक जणांना मिळाला आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत वर्षाला १२ रुपयांचा हप्ता भरुन लोक दोन लाख रुपयांपर्यंत अपघात विमा सुरक्षेसाठी दावा करु शकतात, असे पंतप्रधानांनी सांगितले.
- वृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्यासाठी सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती पंतप्रधानांनी या




संवादादरम्यान सांगितली. ६० वर्षांवरील नागरिकांसाठी गेल्या वर्षी सुरु करण्यात आलेल्या वयवंदना योजनेचा लाभ ३ लाखांहून अधिक वृद्ध व्यक्तींना झाला आहे. या योजनेंतर्गत, १० वर्षांसाठी निश्चित ८ टक्के परताव्याची तरतूद आहे. या खेरीज प्राप्तिकर सवलतीची मर्यादा ज्येष्ठ नागरिकांसाठी २.५ लाखांहून ३ लाखांपर्यंत वाढवण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी सरकार प्रतिबद्ध असल्याची ग्वाही पंतप्रधानांनी दिली.

- सर्वांना सामाजिक सुरक्षा पुरवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधानांनी केला. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती योजना आणि पेन्शन योजना या तीन महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे कवच गेल्या तीन वर्षात २० कोटींहून अधिक लोकांना पुरवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.
- सर्व नागरिकांच्या कल्याणासाठी विशेषत: गरीब आणि असुरक्षित घटकातल्या नागरिकांच्या कल्याणासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न सुरु ठेवेल अशी ग्वाही पंतप्रधानांनी लाभार्थ्यांना दिली.
- अत्यंतिक गरज असताना या योजनांमुळे कशी मदत मिळाली हे विविध सामाजिक सुरक्षा योजनांच्या लाभार्थ्यांनी पंतप्रधानांना उलगडून सांगितले. सरकारच्या योजना अनेकांसाठी जीवन परिवर्तक ठरल्या असून या योजनांसाठी लाभार्थ्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

**लाभार्थ्यांचे मनोगत**

❖ विविध सामाजिक सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. अडचणीच्या काळात सरकारच्या योजनेचा फायदा कसा झाला हे यावेळी लाभार्थ्यांनी सांगितले. तसेच या विविध योजनांची सुरुवात केल्यामुळे त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले. पंतप्रधानांच्या विविध योजनांमुळे जीवनामध्ये आमूलाग्र बदल झाल्याचेही लाभार्थ्यांनी सांगितले.

### आपणास माहित आहे का?

## महिला सक्षमीकरणासाठी भारत सरकारच्या विविध योजना

कोणत्याही समाजाचा विकास महिलांच्या विकासाशिवाय अशक्य आहे. महिलांच्या विकासाठी केंद्र सरकारच्या बाल आणि महिला विकास विभागाकडून विविध योजना राबवण्यात येत आहेत. महिला सक्षमीकरणासाठी विविध योजनांची माहिती जाणून घेऊयात.


**मुलगी वाचवा, मुलगी शिकवा योजना** (BBMP)

मुलींचे शिक्षण आणि रक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरुवात करण्यात आली आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये लिंग गुणोत्तराच्या प्रमाणानुसार मुलींच्या कमी होत असलेल्या संख्येबद्दल जागरुकता निर्माण करणे हा आहे .

**पंतप्रधान मातृत्व वंदना योजना** (PMMVY)

पंतप्रधान मातृत्व वंदना योजना नवीन स्वरुपात सादर



करण्यात आली आहे. या योजनेत महिलांच्या पोषणाकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. गर्भवती आणि बाळंतीणींचे कुपोषण रोखण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य करण्यात येते

**किशोरवयीन मुलींसाठी योजना**

ही योजना ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींसाठी आहे. या योजनेअंतर्गत मुलींची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी विशेष जोर देण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. तसेच कुपोषण होऊ नये यासाठीही उपाययोजना करण्यात आली आहे.

**पंतप्रधान महिला शक्ती केंद्र योजना**

या योजनेत विद्यार्थी स्वयंसेवकाच्या सहकार्याने ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण केले जाते.

**राष्ट्रीय शिशुगृह योजना**

नोकरी करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांसाठी शिशुगृह उपलब्ध करुन देण्यात आले आहे. ६ महिने ते ६ वर्षापर्यंतच्या मुलांना या शिशुगृहात प्रवेश देण्यात येतो.

**राष्ट्रीय महिला कोष (RMK)**

या योजनेत गरीब महिलांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी लघु वित्त पुरवठा करण्यात येतो. महिलांना कमी दरात वित्त पुरवठा केला जातो. या वित्तपुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. तसेच त्या चरितार्थ चालवण्यासाठी लहान व्यवसाय करत आहेत.

**महिलांसाठी स्वआधार योजना**

निराधार, गरीब आणि पीडित महिलांसाठी स्वआधार गृह योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत पीडित महिलांचं पुनर्वसन करण्यात येते. महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय मदत, शिक्षण, प्रशिक्षण सुविधा आणि कायदेविषयक सल्ला देण्यात येतो.

**महिलांसाठी उज्ज्वला योजना**

महिलांची शारिरीक शोषण आणि देह व्यापारातून मुक्तता व्हावी यासाठी उज्ज्वला योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेत पीडित महिलांना मुक्त करुन पुनर्वसन करण्यात येते.

**नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे**

महिला सक्षमीकरणासाठी नोकरदार महिलांसाठी अद्ययावत सुविधा असणारी वसतिगृहे उपलब्ध करुन दिली जातात. या योजनेअंतर्गत हिमाचल प्रदेशात गेल्या तीन वर्षात दोन प्रकल्प सुरु आहेत. तर दोन नवीन प्रकल्पाचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत.

**पीडित महिलांसाठी हेल्पलाईन**

हिंसाचाराने पीडित महिलांसाठी एकाच छताखाली (OSC) हेल्पलाईनची सोय करण्यात आली आहे. पीडित महिलांना संरक्षण, वैद्यकीय मदत,समुपदेशन कायदेविषयक सल्ला देण्यात येतो. पीडित महिलांना शिक्षण प्रशिक्षणही देण्यात येते.

■■■



# अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या उपाययोजना

### अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्यता ) अधिनियम २००६

अंतर्गत सामूहिक वन हक्काच्या माध्यमातून वनाचे व्यक्तिगत व सामुहिक अधिकार दिले गेले आहेत. हा कायदा अशा वननिवासी अनुसूचित जमाती व पारंपारिक वननिवासींकरीता केला आहे, ज्यांचे वास्तव्य पिढ्यानपिढया जंगलात असूनही त्यांच्या हक्कांची कोणत्याही प्रकारची नोंद घेतली गेली नाही, आणि अधिकारांना मान्यता दिली गेली नाही. असे वनहक्क न्याय्यपणे नोंदवून त्याचे अभिलेख तयार करण्याची रचना निर्माण करुन त्यासाठी आवश्यक अशा विविध पुराव्यांचे स्वरुप सुनिश्चित करण्याची हमी हा कायदा देत आहे.

अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वन निवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरीता शेती कसण्यासाठी वन जमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क, निस्तार सारखे हक्क, गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरित्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क, पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादन, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधन संपत्ती करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

### अनुसूचित जमातींच्या विकास निधीची देखरेख

आदिवासींच्या उप योजनेसाठी केंद्र सरकारकडून शंभर टक्के अनुदान देण्यात येते. या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जमाती आणि इतर जातींमधील विकासाची दरी कमी करुण मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. शिक्षण,आरोग्य,स्वच्छता,पाणी पुरवठा, जीवनमान उंचावणे, कौशल्य विकास, लहान पायाभूत सुविधा यासारख्या योजना राबवण्यात येत आहेत. आदिवासींच्या या उपाययोजनांच्या प्रभावीपणे अंलबजावणीसाठी केंद्र सरकारची ३७ मंत्रालये आणि विभागांची स्थापना करण्यात आली आहे. आदिवासी उप योजनांसाठी(TSP) निधीची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासींच्या विकासासाठी विविध क्षेत्रातल्या २९८ योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### भारतीय घटनेच्या अधिनियम २७५(१) अनुसार अनुदान

राज्य सरकारकडून अनसूचित जाती व जमातींच्या विकासासाठी योजना राबवण्यात येत आहेत. या योजनेला केंद्र सरकारकडून शंभर टक्के अनुदान मंजूर केले जाते. केंद्र सरकारकडून राज्यांना विविध क्षेत्रातील योजनेसाठी अनुदान दिले जाते. त्यासोबतच अनुसूचित जमातींच्या महामडंळाचा कारभार चालवण्यासाठीही अर्थसहाय्याची तरतूद आहे. महामंडळामार्फत स्वयंव्यवसायासाठी अर्थसहाय्य पुरवले जाते. ढाबा, वीटभट्टी, किराणा दुकान, चहा, थंडपेय दुकान, फळे व भाजापाला विक्री, ऑटो वर्कशॉप, घरगुती दुग्धव्यवसाय, प्रवासी वाहने खरेदी यासाठी कर्ज दिले जाते.

### गौण वन उत्पादनासाठी हमीभाव

गौण वन उत्पादनातून मिळणारे उत्पन्न गरीबातल्या गरीब आदिवासींसाठी फार महत्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. देशभरातील सुमारे १० कोटी आदिवासींना वन उत्पादन हमीभावातून अन्न,पशुखाद्य, निवारा, औषधी आणि उत्पन्नाचे हे महत्वाचे साधन आहे. गौण वन उत्पादन हमीभावाचा महिला आदिवासींना मोठा फायदा होत आहे. गौण उत्पादन गोळा करणे आणि विक्री करणे यात आदिवासी महिलांचा सहभाग असल्याने आदिवासी महिलांना आर्थिक आधार मिळतोय. हमीभावामुळे देशभरात वार्षिक एक कोटी दिवस रोजगार उपलब्ध झाला आहे. केंद्र सरकारने जंगलामधून गोळा करण्यात येत असलेल्या वस्तूंना हमीभाव देण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला आहे. सुरुवातीला या योजनेअंतर्गत ९ राज्यामध्ये १० केंद्र सुरु करण्यात आली आहेत. त्यानंतर देशभरात २४ हमीभाव केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत नैसर्गिक साधन संपत्तीचे रक्षण आणि शाश्वत कापणी तंत्र आणि मार्केटिंगसंदर्भात प्रशिक्षण दिले जाते. त्यासोबतच जंगलातून गोळा करण्यात आलेल्या वस्तूंचे मूल्यवर्धन करण्यासाठीही प्रोत्साहन दिले जाते. या सर्व उपाययोजनामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यात येतो.

■■■

# आदिवासींसाठी विकास योजना



केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाकडून आदिवासी जनजातींच्या (आदिम जमाती) विकासासाठी विशेष योजना राबवत आहे. ही योजना ८ राज्ये आणि अंदमान निकोबार या केंद्रशासीत प्रदेशातील ७५ आदिवासी जाती-जमातींसाठी राबवण्यात येत आहे. आदिवासींच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी जमिनीचे वाटप, घरेबांधणी,जमिन विकास,कृषी आणि पशुसंवर्धन,रस्ते निर्मिती, वीज पुरवठ्यासाठी अपारंपरिक ऊर्जा स्रोत निर्मिती ,तसेच आदिवासींना विम्याचे कवच मिळावे यासाठी जनश्री विमा योजना राबवण्यात येत आहे.

**शैक्षणिक कार्यक्रम**

आदिवासी विभागाकडून गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची सोय केली आहे. ही शिष्यवृत्ती दहावीपर्यंत शिक्षण (प्रीमॅट्रिक) तसेच दहावीनंतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. प्री मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेमुळे शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. शिष्यवृत्ती योजनेमुळे पाल्यांना आर्थिक सहाय्य मिळत असल्याने पालकांच्या आर्थिक बोज्यात घट होते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याच्या प्रमाणात कमालीची घट होत आहे. त्यासोबतच दहावीनंतर शिष्यवृत्ती दिल्याने आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढत आहे.

**आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सुविधा**

आदिवासी विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे यासाठी केंद्र सरकारच्या आदिवासी विभागाकडून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची योजना आहे. अभियांत्रिकी, आयटी तसेच इतर उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. उच्च शिक्षणासाठी असलेल्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आणि संस्थांना थेट अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते.

**भागभांडवलाव्दारे एनएसटीएफडीसी/ एसटीएफडीसींना अर्थसहाय्य**

या योजनेअंतर्गत केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाकडून राष्ट्रीय आदिवासी विकास महामंडळ आणि विविध राज्यातील आदिवासी विकास महामंडळांना आर्थिक सहाय्य करण्यात येते. विविध राज्यातील आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाकडून योजना राबवण्यात येत आहेत. काही योजनांसाठी एनएसटीएफडीसीकडून अर्थसहाय्य करण्यात येते. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, फळबाग लागवड कृषीपंप, सूक्ष्म सिंचन यासाठी आदिवासींसाठी योजना आहेत. बांबू फर्निचर निर्मिती युनिट, राईस मिल,स्टील फेब्रिकेशन या व्यवसासायासाठी सहाय्य करण्यात येत आहे. सेवा क्षेत्रात वाहन दुरुस्ती वर्कशॉप,बुक बायडिंग,डाटा प्रोसेसिंग,टेंट हाऊस या व्यवसायांना अर्थसहाय्य उपलब्ध आहे. ऑटो रिक्षा आणि इतर वाहतूक वाहनांसाठी अर्थसहाय्याची सोय करण्यात आली आहे.

■■■

# भगीरथ परिवारातील यशवंत



## निरंजन दिवाकर
**UPSC 2018 (IFS)**
**All India Rank 3**



## भुवनेश्वर पाटील
**UPSC 2018**
**All India Rank 59**



## किरण सावंदकर
**UPSC 2018**
**All India Rank 459**

**UPSC** Foundation Batch 2018-19 | Batch Starts 3 July 2018

Bhagirath IAS Academy
UPSC • MPSC

ऑफिस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफिस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **August,** 2018
Date of Posting : 16th **August,** 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.